

शोध

डॉ. सुहास पेठे

* शोध *

(जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही

विचारांचा सोपा अभ्यास)

डॉ. सुहास पेठे

(एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* शोध

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : जून २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

*

जिज्ञासू, तळमळीच्या साधकांना -
जे आदरणीय कृष्णजींच्या
अमूल्य विचारांना सामोरे जाऊन
शोध -
घ्यायला तयार आहेत...
आणि
आपापल्या साधनमार्गात आपली खरी प्रगती
साधायला उत्सुक आहेत...

- सुहास पेठे

शोध

अनुक्रमणिका

* शोधाची पार्श्वभूमी / ६

१. थोडं कृष्णजींबद्दल ..११
२. शोध कशाचा आणि कशासाठी ? ..१४
३. वेगळेपण : गिरवणं आणि पुसणं ..१७
४. देवभक्ती की देवभीती ..२०
५. पोपटपंचीचं फोलपण ..२३
६. देव : देवळातला आणि देवळाशिवायचा ..२६
७. वाटा - पळवाटा ..२९
८. सत्तेची अभिलाषा ..३२
९. व्यावहारिक संबंधांपलीकडं ..३५
१०. समाजकार्य ? ..३८
११. खऱ्या बदलाचा मार्ग ..४१
१२. खरं पारमार्थिक जीवन ..४४
१३. भक्ती म्हणजे अदाकारी नव्हे ! ..४७
१४. आध्यात्मिक चौर्य ..५०
१५. दुसऱ्या तुरुंगाकडं ..५३

१६. एक समर्थ, अत्यावश्यक नकार ..५६
१७. खरे धोके ..५९
१८. पदाविना प्रवास ..६२
१९. दंभाचं वय ..६५
२०. सूक्ष्म गुलामगिरी ..६८
२१. मुक्ततेची विधायक तयारी ..७१
२२. अपूर्व मदत ..७४
२३. असमाधानाकडून ईश्वराकडं ..७७
२४. जीवनाचं निर्मळ रोप ..८०
२५. गुरू नको, सांगाती हवा ..८३
२६. नव्या युगाचा देव ..८६
२७. आपण काय करू या ? ..८९

*

शोधाची पार्श्वभूमी

१९९५ मध्ये श्री जे कृष्णमूर्तींच्या जन्मशताब्दीवर्षाच्या निमित्तानं 'जीवनजिज्ञासा'मधून कृष्णजींच्या विचारांचा सर्वसामान्य माणसाला दैनंदिन जीवनात कुठं उपयोग होऊ शकेल, हे स्पष्ट करण्याचा मी नम्र अभ्यास केला. त्या पुस्तकाची चौथी आवृत्ती वाचकांच्या उत्कृष्ट व निरंतर प्रतिसादामुळं प्रसिद्ध झाली आहे. कृष्णजींचे विचार समजून घ्यायला अवघड वाटतात, अनेक जण या कल्पनेनं त्याकडं जातही नाहीत. थोडी भाषेची अडचण आणि त्यांची तीव्र तर्कनिष्ठ मांडणी यांमुळं हे सकृतदर्शनी खरं असलं तरी त्यामुळं विचारांची मौलिकता आणि उपयोग यांची विशेषतः सामान्यांना असणारी निकड कमी होत नाही. म्हणून सोप्या उदाहरणांनी आणि प्रसंगांनी कृष्णजींचे काही संबंधित विचार व त्यांची गरज समोर ठेवण्याचा तो प्रयास आहे. त्याचा प्रतिसाद आजही मिळतो आहे.

त्याच्या प्रास्ताविकात मी कृष्णजींच्या वाङ्मयाचा इ.स. १९७२-७३ पासून आलेला संपर्क, एकदा मुंबईत ऐकलेलं आणि पुरेसं वाटलेलं व्याख्यान, अपूर्व दर्शन इत्यादी गोष्टींचा उल्लेख केला आहे. तत्त्वज्ञान आणि विशेषतः परमार्थाच्या वाटचालीत कृष्णजींचा विचार आणि त्यांनी विशेषतः दैनंदिन व्यवहारातल्या पारमार्थिक वाटचालीची मांडलेली कल्पना, जीवन एकसंध आहे - अशा दृष्टीनं यांचा सातत्यानं उपयोग होत होता. पारंपरिक परमार्थात अकारण वाढलेली अवडंबरं, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा, शब्दज्ञानाची अरण्यं नि पोथीनिष्ठता अशा असंख्य गोष्टींनी अडणारी परमार्थाची वाट मला स्वतःपुरती स्वच्छ व मोकळी होत होती. सगुण-निर्गुणाचा उलगडा नि अनुभव येऊन मागं पडले. पण माझ्यापुरती नाममार्गाच्या वाटचालीत सदैव तत्पर व सावधान जीवनाची गरज आणि जिज्ञासेची ज्योत तेवत राहिली. याला कारण श्री कृष्णजींनी आजन्म केलेलं विचारमंथन आणि दर्शवलेल्या दिशा, हे होय.त्याबाबतीत कृष्णजींच्या विचारमंथनाचा उपयोग कुठल्याही मार्गातल्या साधकाला किंवा नुसतं भ्रममुक्त, निकोप जीवन जगू इच्छिणाऱ्याला कसा व कितपत होऊ शकतो, हे या पुस्तकात स्पष्ट केलं आहेच. आपापली वाट आपल्याला आपल्या

कल व कुवतीनुसार चालावी लागतेच. पण त्यात कृष्णजींच्या विचारांची बॅटरी (टॉर्च) कुठल्याही मार्गातले खाचखळगे कळण्यासाठी तरी नक्की उपयोगी पडेल असं वाटतं.

त्यातल्या काही मुद्यांचं विवरण विशेषतः साधकांसाठी आहे. कृष्णजींच्या अनुयायांना (?) साधना शब्द वापरणंही उचित वाटणार नाही. त्यांनीही तो टाळलाच आहे. पण म्हणणं कळायला तो सोपा आहे. एक तर मी साधना ही स्वतंत्र गोष्ट समजत नाही, म्हणून घरी असणं, समाजात असणं, ऑफिसमध्ये असणं-सर्व साधनाच आहे आणि त्याच पातळीवर ते समरसपणे चालतं असं मानतो. त्याचा उपयोग व आनंदही आहे आणि दुसरं म्हणजे कृष्णजींचा साधना शब्दाला विरोध आहे तो का, ते समजून घेऊ. आपल्याला आज सुधारायचं नाही, बदलायचं नाही त्यासाठी मध्ये काळ आणायचा आहे, मग ते आपोआपच अनिश्चित होतं, काही केल्यासारखंही वाटतं आणि करावंही लागत नाही, मग साधना ही स्वतःला सुधारण्याची कायम उद्यावर ढकललेली कारवाई ठरते - पोस्टपोनमेंट ठरते, या कारणांनी त्यांना हा शब्द अभिप्रेत नाही. पण त्यांचं स्वतःचं आयुष्य पाहिलं, बारकाईनं पाहिलं तर त्यांची ध्यान-योग-अवधान यांची साधना किती तरी वर्षांची आणि खूप कष्ट नि धैर्याची आहे, हे आपल्याला दिसून येईल. जसं जरी हा प्रवास भौतिक प्रवासासारखा विषय नसला, वेळी तो क्षणात होऊ शकत असला, एक दिवसात होऊ शकत असला तरी शंभराव्या मैलावरचं गाव येतं ते शंभरावा एकच मैल चालताना, पण आधीचे नव्याण्णव चाललेले असतात हे उघडच आहे. तसा हा विषय साधर्म्यानं असल्यामुळं हा शब्द मी जीवनसाधना अशाही अर्थानं वापरला आहे. तसे थोडे सावध झालेले व जिज्ञासेनं जाणीवपूर्वक प्रयोग करणारे, प्रत्यक्ष चालणारे, ते साधक असंही अर्थातच गृहीत धरून हे सारं इथं मांडलेलं आहे.

यात अनेकांच्या कृष्णजींबद्दलच्या काही समजुती असतात, त्याही दूर व्हाव्या, त्यांच्या खऱ्या म्हणण्यापर्यंत जाता यावं यासाठी प्रथम शोधाची गरज दिली

आहे. पुढंही सातत्यानं प्रत्येक विषयात त्यांच्या विशिष्ट शब्दांची नि वाक्यांची अवतरणं, अनुवाद देणं टाळलं असून ते कोणत्या संदर्भात काय म्हणतात याचा अभिप्राय दिला आहे. तो अर्थातच स्वतः निरीक्षण, प्रयोग करून पडताळून पाहून पटलेला भावार्थ आहे. अन्यथा त्यांचं मूळ पुस्तक, मूळ विषय त्यांच्या शब्दांत पाहणंच चांगलं.

त्यासाठी फार वाचायची गरज आहे, असं नाही. फर्स्ट ॲण्ड लास्ट फ्रीडम, फ्रीडम फ्रॉम द नोन इत्यादी किंवा अधिक क्लिष्ट पण महत्त्वाचे विषय वाचू इच्छिणाऱ्यांनी एंडिंग ऑफ् टाईम, ट्रूथ ॲण्ड ॲक्चुॲलिटी - सारखी पुस्तकं पाहिली तरी चालतील. कृष्णजींचं मूळ लेखन सुमारे साठ पुस्तकांतून प्रसिद्ध झालं आहे. इथं आलेले विषय किंवा संबंधित प्रश्नोत्तरांसाठी कॉमेंटरीज् ऑन लिव्हिंग : भाग दुसरा, धिस मॅटर ऑफ् कल्चर, दि अर्जन्सी ऑफ् चेंज, लाइफ अहेड एवढी पुस्तकं मुळातून वाचली तर यातले विषय आणखी स्पष्ट होऊ शकतील. आता अधिक जिज्ञासापूर्तीसाठी कृष्णजींच्या विविध चरित्रांबरोबरच आठवणींचीही अनेक पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. उदाहरणार्थ किचन क्रॉनिकल्स, इनर लाइफ ऑफ् जे. कृष्णमूर्ती इत्यादी. आता थीम बुक्स म्हणजे विशिष्ट विषयावरच्या कृष्णमूर्तींच्या विविध ठिकाणच्या म्हणण्याचं एकत्रीकरण देणारी पुस्तकंही जिज्ञासूंसाठी प्रसिद्ध होत आहेत. जसं ऑन गॉड, रिलेशनशिप्स इत्यादी.

एक महत्त्वाचा मुद्दा जाताजाता सांगणं आवश्यक आहे की, स्वतः अध्ययन व अनुभव दोन्हीही दृष्टींनी पाहताना हे स्पष्ट होतं की, कृष्णजींची मूळ भूमिका लक्षात घेण्याची गरज मोठी आहे. तिथंही पुन्हा त्यांनी ज्याला विरोध केला ती ग्रंथप्रामाण्य न आणणं बरं. त्यांनी काही विषयांची उत्तरं केवळ आपल्यावर सोडली आहेत. ती अर्थातच त्यांना माहीत नाहीत म्हणून नव्हे तर आपल्याला स्वतःला विचाराला प्रवृत्त करावं, शोधायला प्रवृत्त करावं म्हणून. त्यामुळं त्या दृष्टीनं स्वतंत्रपणे पाहिलं तरी हे कित्येकदा जाणवण्यासारखं आहे की, उद्धृत करण्यासाठी म्हणून नाही पण जिज्ञासूंसाठी हे देणं आवश्यक आहे की, सत्यविषयक, जीवनविषयक कृष्णजींचे स्वानुभवाचे

उद्‌गार हे अनेक ग्रंथांशी, परंपरागत ज्ञानाशी अत्यंत सुसंवादी, किंबहुना शब्दशः तसेच आहेत. यावर स्वतंत्र संशोधनही झालं आहे. सत्य, प्रेम हे शाश्वत व एकच आहेत. एवढा त्याचा अर्थ. ते कुणालाही तेवढ्या शोधानं सापडू शकतं. कृष्णमूर्ती वाचताना आपलं किंवा जगाचं सगळंच चुकलं आहे की काय असं वाटून काहींना निराशा येते, त्यावेळी हे जरूर लक्षात ठेवावं.

कृष्णजींचं 'वर्तमानात जगणं' आणि अवधूत गीतेतलं 'वर्तमानेषु वर्तेत', तुम्ही प्रेम शिकू शकत नाही, शिकवू शकत नाही हे त्यांचं म्हणणं आणि श्री तुकोबांचं 'सकळ कळा शिको येती, प्रेम नाही कवणा हाती' हे वचन काय, कृष्णजींचं वाक्य 'द मॅन हू सेज ही नोज, डझ नॉट नो' आणि केन उपनिषदातलं 'मतं यस्य, न वेद सः', कृष्णजींनी दाखवलेला मनाचा कल्पनामय व्यवहार आणि श्री ज्ञानेश्वर माउलींची 'वाया मन हे नाव । एऱ्हवी कल्पनाचि सावेव' इत्यादी मनविषयक मांडणी, कृष्णजींचा वर्तमानावरचा भर आणि श्रींचा अत्यंत सोप्या भाषेतला उपदेश 'कालचे विसरावे, उद्याची काळजी करू नये व आज कर्तव्य व नाम सोडू नये'- अशी असंख्य सत्यसाम्यं अनुभवायला येतात. कृष्णजींनी यांतलं काहीही वाचलेलं नसलं आणि यांचाही त्यांच्याशी कुठला संबंध आला नसला तरी सत्याचा नि खऱ्या ईश्वराचा संबंध साधनेनं सर्वांशीच येत असतो, हे साधक म्हणून लक्षात ठेवण्यासारखं आहे. हा अनुभव श्रींचे कृपांकित आत्मसाक्षात्कारी पू. तात्यासाहेब केतकर महाराज यांची प्रसादयुक्त वाणी ऐकताना, वाचताना विशेषतः येतो. अर्थात हा एकूण विषय खूप व्यापक असल्यानं फक्त इथं त्याचा उल्लेख करतो. असो.

शोध व्यापक असला तरी स्वानुभव व चिंतन यांतून गवसणारी काही तत्त्वं मुखपृष्ठावर छोट्या फुलांच्या रूपानं दर्शवली आहेत. मागील पृष्ठापासून येणारी प्रदीर्घ रेघ शोधाची शाश्वतता व निरंतरता दर्शवते. या पुस्तकापुरती या शोधाची सुरुवात व उद्दिष्ट यांचा निर्देश ती रेघ मागील पृष्ठावरून सुरू होताना केला आहे. पुस्तकाच्या आवरणावरचा विस्तृत रंग एकूण शोधाच्या भूमिकेची मोकळी पार्श्वभूमी दर्शवतो तर

त्यात येणारी एक रंगछटा या शोधानं पडणारी भर दर्शवते.

'शोध'मधून हाताळलेले विषय वाचून कुणाला आत्मशोध, खऱ्या ईश्वराचा, खऱ्या प्रेमाचा, आनंदाचा शोध घ्यायची तळमळ उत्पन्न झाली, सुरू असलेल्या आपापल्या साधनेत अधिक सावधानतेनं जायची बुद्धी झाली तरी या अत्यल्प आणि संतकृपेनं घडलेल्या प्रयत्नांचं ते प्रसादफलित मानतो व अशा वाचकांचे आधीच मनःपूर्वक आभार मानतो.

पुस्तकाच्या या पुढच्या आवृत्तीचा योग आणणाऱ्या सर्व वाचकांचा व ही आवृत्ती सिद्ध करण्यात मदत करणाऱ्या अन्य सर्वांचा मी ऋणी आहे.

संतनगरी, सातारा *- सुहास पेठे.*

१. थोडं कृष्णजींबद्दल

कृष्णजी हे जागतिक कीर्तीचे थोर तत्त्वचिंतक होते. त्यांचं मूळ साहित्य इंग्रजीतून उपलब्ध आहे. त्यांनी स्वतः प्रमाणित केलेलं त्यांचं तीन भागातलं चरित्र व शिकवणुकीचं सार, अनेक प्रवचनं, चर्चा, उद्‌बोधनं या साहित्याबरोबरच दृक्‌श्राव्य अशा माध्यमांतलं विपुल साहित्यही उपलब्ध आहे. १८९५ ते १९८६ असा जवळपास एक्क्याण्णव वर्षांचा त्यांचा जीवनकाल. वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतचं मद्रासजवळ सर्वसामान्य मुलाचं जीवन ते जगले.

१४ ते ३४ व्या वर्षापर्यंतचं जगद्‌गुरू होण्यासाठी घडवण्यात आलेलं विशेष जीवन त्यांच्या वाट्याला आलं. ते यायला मुख्यतः कारणीभूत झालेल्या थोर थिऑसॉफिस्ट डॉ. ॲनी बेझंट यांचं मातृतुल्य प्रेमही. या टप्प्यात शेवटी सत्यदर्शन. त्यासाठी कुठलीही तडजोड न करता ३४ व्या वर्षी केलेली जगप्रसिद्ध उद्‌घोषणा. पुढं या सत्यज्ञानाच्या अभिव्यक्तीसाठी आणि जिज्ञासूंना ते स्वबळावर मिळावं म्हणून केलेली मुख्यतः अविश्रांत धडपड. सत्यदर्शनाच्या क्रांतिकारी उद्‌घोषणेबरोबरच त्यांनी त्यांच्या सर्व स्थावर-जंगम संपत्तीचा व पदांचा केलेला विलक्षण त्याग.

आता या पुस्तकाच्या संदर्भात कृष्णजींची थोडी वेगळी ओळख करून घेणं आवश्यक आहे. कृष्णजींचं लेखन इंग्रजीत असल्यानं असंख्य व्यक्तींपर्यंत ते मुळात पोचत नाही. पोचलं तरी कृष्णजी शुद्ध ज्ञानमार्गी असल्यानं त्यांचं म्हणणं वाचता आलं तरी ते दुर्बोध वाटतं. सर्वसामान्य माणसाला एवढी निर्गुणाची झेप पेलत नाही. त्यामुळं ते सामान्यांसाठी नाही अशीही एक समजूत ऐकायला मिळेल.

त्यांतही ज्यांना हे बौद्धिकदृष्ट्या कळतं असं वाटतं, त्यांतल्या बऱ्याच लोकांना त्यातल्या अपेक्षित जीवन-परिवर्तन-आत्मपरीक्षा या खऱ्या गरजेच्या गोष्टींपेक्षा त्यातली विलक्षण बौद्धिक झेप, वैचारिक क्रांतिकारकता, रूढ अध्यात्मावरचे स्पष्ट प्रहार अशा गोष्टींचंच आकर्षण वाटतं. मग ते त्यावरच्या चर्चा, बौद्धिक आकलन, भेदमतभेद, काही वेगळं करीत असल्याचं खोटं समाधान एवढ्याच वर्तुळात राहातात. किंबहुना कृष्णमूर्तींचं वाचन, श्रवण, चर्चा हे सारं उच्चभ्रू फॅड म्हणूनही मिरवण्याची

गोष्ट वाटते.

त्यात आणखीही एक वर्ग आढळतो. कृष्णजींनी काही कारणांसाठी अनेक रूढ गोष्टींना टाळलं, वेळी नकार दिला. उदाहरणार्थ पंथ, धर्म, परंपरा, गुरू, शब्दज्ञान, मंत्र, तंत्र, नाम, साधना, राजकीय-सामाजिक चळवळी, संस्था, प्रादेशिक-राष्ट्रीयता यांची अभियानं, कोणत्याही प्रश्नांची थेट उत्तरं देणं - अशा अनेक गोष्टींना त्यांनी सकारण नकार दिला. त्यामुळं एक विलक्षण बंडखोरी आली. तिची खरी कारणं, कृष्णजींना त्यामागं काय अभिप्रेत आहे ते समजून घेण्याऐवजी अशा वैचारिक बंडखोरीमुळंही काही बुद्धिप्रधान वर्ग आकृष्ट झाला. तो नुसताच तसा झाला नाही तर त्यांची त्या नावाखाली स्वतःला सुधारण्याच्या, निदान कृती तपासण्याच्या किमान साधनेपासूनसुद्धा सुटका झाली. इतरांना नावं ठेवणंही सोपं झालं.

हे सगळं अर्थातच कृष्णजींना अभिप्रेत नाही हे वेगळं सांगायला नको. त्यांनी त्या त्या गोष्टी नाकारल्या, त्या त्यात सुधारणा करण्याचा उपयोग होत नाही हे सत्य ओळखून, गुरू नको म्हणतात ते त्याच्यावर जबाबदारी सोपवून स्वतः आहे असे राहायला मोकळे होणारे शिष्य नको म्हणून, धर्मपंथ नको कारण त्याच्या नावावर होणारे अनाचार, रक्तपात यांचे अनुभव व त्यांची समर्थनं पाहून - असं खूप काही.

मनाचा कारभार असा सगळ्याच क्षेत्रात चालत असल्यानं प्रत्येक क्षेत्र दूषित करण्याची शक्ती त्यात आहे. त्यामुळं त्या अर्थानं कृष्णजींना तसे अनेक प्रस्थापित गोष्टींविरुद्ध विचार अन् संघर्ष करावे लागले. त्यांतलीच एक म्हणजे संस्था. आपल्याला अगदी साध्यासाध्या गोष्टींपासून अध्यात्मापर्यंत सर्व बाबतीत संस्थांची सवय झाली आहे. मुक्तीसाठीसुद्धा व्यक्ती किंवा संस्था यांची गरज वाटते. काही प्रमाणात चार माणसं एकत्र आल्याशिवाय काम होत नाही, हे उघडच आहे. ते कृष्णजींना अमान्य नव्हतं. पण अखेर संस्थांचं रूपांतर सत्ताकेंद्रं, पैसाकेंद्रं असं होऊन व्यक्तीची, तिच्या स्वातंत्र्याची, मूळ उद्दिष्टांची गळचेपी होऊ लागते, हेही तितकंच विदारक सत्य अनुभवायला येतं. अनेक निःस्पृह, सत्यप्रिय, ध्येयवादी, निरिच्छ माणसं संस्था स्थापन करतात. पुढं त्यात पैसा, सत्ता यांचा वावर सुरू झाला की एकतर त्याच माणसांच्या वृत्तीवर परिणाम होतो. ती मूळ उद्दिष्टांऐवजी अशा गोष्टींच्या मागं लागतात. काही वेळा काही व्यक्ती तशाच निःस्पृह राहू इच्छीत

असतील तर बाकीची माणसं बहुमतानं अशा निःस्पृह माणसांना दूर करतात, हे पहायला मिळतंच.

म्हणून कृष्णजींनी एकप्रकारे संस्थाविरोधी भूमिका घेतली. तीही समजून घेणं गरजेचं आहे. ती भूमिका केवळ संस्थांतल्या भ्रष्टतेच्या शक्यतांच्या विरोधात, व्यक्तीचं स्वातंत्र्य हरपण्याच्या विरोधात होती. तांत्रिक कारणांसाठी संस्था त्यांनाही मान्य होत्या.आध्यात्मिक संस्थांबद्दल मात्र त्यांचा रास्त आक्षेप होता. धर्म ही तर एक सुसंघटित संस्थाच आहे. तिच्यामुळं इतरांपासून या धर्माच्या निमित्तानं माणसांना वेगळं पाडणं, मग इतरांनीही तेच करणं आणि पुढं त्यातून हजारो वर्षं संघर्ष, द्वेष नि विनाश हे चित्र आपण पाहिलं असेलच. म्हणून धर्मसंस्थेला त्यांचा रास्त विरोध होता.

आध्यात्मिक दृष्ट्या व्यक्तीच्या मानसिक मुक्तीसाठी तर धर्मच काय इतर कुठल्याही संस्थेची जरूर नसलेला हा प्रवास आहे, यावर ते अढळ राहिले. दुसरी व्यक्ती फारतर त्या शोधात मदत करू शकेल, सोबत करू शकेल पण कुणी कुणाला मुक्त करू शकत नाही, ते आपलं आपणच व्हावं लागतं यावरही ते अढळ राहिले. स्वतःच्या मागंही आपली शिकवण सर्वांसाठी त्यांनी खुली ठेवली आहे. त्यांच्या काळात आणि आजही त्यांचं साहित्य प्रकाशित करण्यासाठी त्यांची तांत्रिक संस्था होती, आहे. पण तिचा त्यांच्या शिकवणीवर पारंपरिक अर्थानं कुठला अधिकार त्यांनी ठेवला नाही. इतरत्र वेगवेगळ्या गुरूंच्या उपदेशावर त्यांच्यात्यांच्या बहुधा अपरिपक्व शिष्य, नातेवाईक, मठ, संस्थानं यांचा अधिकार आणि अर्थातच पुढं विघटन घडतं, ते घडू नये याची त्यांनी दक्षता घेतली.

कृष्णजी इतर अनेक निःस्पृह संतसत्पुरुषांप्रमाणंच अत्यंत प्रगल्भ आणि काळाच्या खूप पुढं होते. त्यांचं म्हणणं एवढंच होतं की अशा कुठल्याही दंभ, मिथ्या आधार-आचार यांपासून मुक्त असलेलं मन कसं घडेल हा खरा मूळ प्रश्न आहे. त्याकडं लक्ष वेधणं. हे काम करायला कृष्णजींनी जीवन अक्षरशः दान दिलं, शरीर झिजवलं. त्यांची तळमळ लक्षात घेऊ इच्छिणाऱ्या 'खऱ्या साधकां'साठी हे पुस्तक हा एक छोटासा प्रयास आहे. खऱ्या अर्थानं सत्याकडं, सत्यस्वरूप ईश्वराकडं जायला साधकांना त्यातला एखादा कण उपयोगी पडला तरी आनंद आहे.

२. शोध कशाचा आणि कशासाठी ?

दुःख हा माणसाचा सार्वत्रिक अनुभव आहे. सुखाचा आणि त्यासाठीचे उपाय यांचा शोध हा अर्थातच त्यावरचा प्रयत्न सामूहिक व व्यक्तिगतपणे सुरू असलेला पुरातन काळापासून दिसून येतो. सामाजिक परिवर्तन चळवळी, नवनवीन धर्म-प्रणाली-पंथ, राष्ट्रविचार, इतकंच काय ते सर्व घडावं म्हणून लढाया, संघर्ष, युद्धच नव्हे तर रक्तपातापर्यंत समाज जाताना दिसतो. त्याचेच व्यक्तिगत पातळीवरचे प्रयत्न जिज्ञासा, साधना, कर्मयोगादी मार्ग, चिंतन, ग्रंथाभ्यास, लेखन - अशाही असंख्य प्रकारे सुरू असून असे प्रयत्न दुःख टाळणं, त्यापासून पळणं, इतरांवर, व्यवस्थांवर दुःख ढकलणं इथंपासून सुखासाठी प्रामाणिक प्रयत्न, विवेक, विचार इथंपर्यंत सर्व प्रकारचे आहेत.

तसे हे प्रयत्न हजारो वर्षं सुरू असूनही माणूस सुखाच्या बाबतीत थोड्याफार फरकानं पुन्हा त्याच ठिकाणी आहे. दुःखाचं तेच पुराण अन् महाभारत आजही घडताना आपण पाहातोच आहोत. याचं अत्यंत कुशाग्रतेनं, मूलभूत, विज्ञाननिष्ठ, अनेकदा रूढ कल्पनांना स्पष्ट छेद देणारं विवरण व शोध श्री कृष्णमूर्तींनी साधनकाळात केलेला आपल्याला आढळेल. दुःखाला कशाही प्रकारे टाळून मिळणारं सुखही अस्थायी ठरतं हा अनुभव आहे.

दोन महत्त्वाच्या गोष्टी हा शोध घेताना लक्षात येतील की हा शोध दुःख टाळून फक्त सुख हवं असा आहे. त्या दोन्हींचंही स्वरूप पुन्हा जास्त करून इंद्रियं, मतं, मोठेपणा, जगातलं स्थान, पैसा, प्रतिष्ठा असल्या स्वरूपाचं आहे. त्यामुळं ते कदाचित काही काळ सुख किंवा सुखाचा आभास निर्माण करू शकलं तरी शाश्वत आनंद निर्माण करू शकलं नाही. कृष्णजी म्हणतात त्याप्रमाणं या साऱ्या सुखदुःख व त्यावरच्या अशा असंख्य अयशस्वी उपायांच्या केंद्रस्थानी असलेलं मन अनेक कारणांनी बद्ध आहे, हेच त्याचं खरं कारण आहे. म्हणून कृष्णजींनी या सूक्ष्म, अथांग, फसव्या पण गरजेच्या मनाचा अविश्रांत शोध घेतला. या अर्थानं ते मुक्त झाले. पण उपदेशाची रूढ परंपरा निर्माण न करता, कुठलंही गुरुपद स्वतःकडं न घेता

लोकांच्या बरोबरीनं मनाचा शोध घ्यायला ते त्यांना मदत करीत राहिले. जगभर अविरत भ्रमण करीत खऱ्या जिज्ञासूंना हा शोध घ्यायला प्रवृत्त करीत राहिले. स्वतःचा मार्ग स्वतः शोधा, आता तरी कुणावर सारं सोपवून राहाण्याच्या सवयींपासून मुक्त व्हा, सावध व्हा, सावध रहा - असं आत्यंतिक तळमळीनं सांगत राहिले.

मनाच्या या गुंत्याचा, मुक्ततेचा विषय हाताळणारं आपल्याला परिचित पारंपरिक शास्त्र अध्यात्म किंवा तो शब्द वापरून गुळगुळीत झाल्यानं अधिक बरोबर म्हणायचं तर परमार्थ. पण त्यातही हा मनाचा शोध घेणारं पुन्हा मनच ! त्यामुळं जो घोटाळा आणि दिशाभूल करण्याचं मनाचं सामर्थ्य अनुभवायला इतर सर्वत्र येतं, तोच घोटाळा ते या अध्यात्म आणि परमार्थात केल्याशिवाय कसं राहील ? उलट इतर शास्त्र-विषय-व्यवहार एक वेळ मर्यादित क्षेत्रापुरते असतात, दिशाभूल मर्यादित असते. इथं अध्यात्मात त्याच मनानं त्याचाच अभ्यास, पुढं निरास आणि वेळी नाशही करायचा असतो. त्यामुळं तिथं तर मनाचा चकवा सर्वांत मोठा राहणार हे खरं लक्षात घेण्यासारखं आहे. म्हणून इथं सावधानतेची गरज किती असेल याची कल्पनाच केलेली बरी ! म्हणून इतर असंख्य विषय कृष्णजींनी मनाच्या संदर्भात हाताळले असले तरी अध्यात्म, परमार्थाच्या बाबतीत - कदाचित हे शब्द न वापरताही - त्यांनी हाताळलेला व सावध करणारा मनाचा व्यवहार हा अत्यंत अस्वस्थ करणारा पण सत्य आणि त्यामुळं उपयोगी पडणारा आहे, हे खचितच.

परमार्थातला भोंगळपणा, बुवाबाजी, स्वतःची फसवणूक, वेगवेगळ्या पातळीवर पैसा, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य अशा अनेक प्रकारची फसवणूक, व्यावहारिक हानी, अकारण निर्माण करण्यात येणारी गूढतेची वलयं, नंतर येणाऱ्या निराशा - अशा असंख्य गोष्टी जर टाळायच्या असतील तर कृष्णजींनी सुचवलेल्या असंख्य गोष्टी उपयुक्त ठरतात.

कृष्णजींनी रूढ अर्थानं कुणाला कोणतीच गोष्ट कधी करा असं अधिकाराच्या पद्धतीनं म्हटलं नाही. ते स्वतः मुक्ततेचा स्वतःसिद्ध आविष्कार असूनही. त्याचं मुख्य कारण असं की आजवरचा हा अनुभव आहे की कुणी मार्ग दाखवायला लागला की चालणाऱ्याची एका बाजूनं सोय होत असली तरी दुसऱ्या बाजूनं तो स्वतः विचार करणं हळूहळू सोडून देतो. नाही तरी मनाला कुठले असे मनाविरुद्ध जाण्याचे कष्ट तर नकोच असतात. त्यातच तयार उत्तरं मिळत गेली तर काम अधिकच

सोपं होतं आणि माणूस बेसावध होत जातो.

हे एवढ्यावर भागत नाही. त्याला हळूहळू अवलंबून राहाणं इतकं आवडतं की तो वैचारिकदृष्ट्या पांगळा होऊन जातो, असमर्थ होतो. मग हा मार्ग दाखवणारी व्यक्ती हयात असेपर्यंत जरा बरं चालतं पण पुढं एकदम हात सुटल्यासारखं होतं. भरकटून जायला होतं. असलं परावलंबन हे एक प्रकारचं पारतंत्र्यच आहे, हे कृष्णमूर्तींनी दाखवून दिलं आहे. त्याचा अनुभव अनेकांना येत असतो.

त्यासाठी त्यांनी मार्ग अवलंबला तो मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना विचाराला, सत्याच्या शोधाला स्वतंत्रपणे प्रयत्न करण्याला प्रवृत्त करण्याचा. सत्य-असत्य, शाश्वत-अशाश्वत आपण स्वतःच शोधून काढावं, सतत सावध राहून सत्यशोध घेत असावं, आपल्या भाषेत खऱ्या देवत्वाचा, उच्चतर आनंदी जीवनाचा शोध घेण्याचा, त्यासाठी लागेल एवढी विचार व कृती यांनी व्यक्ती समर्थ व्हावी म्हणून त्यांनी आजन्म चर्चा केली. त्यात अनेक सावध करणाऱ्या गोष्टी येऊन जातात.

त्यांचा शोध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. त्या त्या विचारांची उपयुक्तता आपल्या आजच्या परमार्थात ताडून पाहाण्याचा व ते अंमलात आणून त्याचा प्रयोग करण्याचा नम्र प्रयास हा या मागचा प्रत्यक्ष अनुभव आहे. कुणाला उपयोगी पडला, प्रयोगानं खरा ठरला तर ते परमार्थमार्गाच्या शुद्धीकरणाचंही काम आहे आणि व्यक्तिगत प्रगतीला मदतही ! शोधानंतर समर्थपणे वाटचाल करायची आहे ती स्वतः, स्वतंत्रपणे, आजन्म !

*

३. वेगळेपण : गिरवणं आणि पुसणं

एखादा लग्नकार्यासारखा समारंभ असतो. सगळीकडं आमंत्रित लोक येतजात असतात, एकमेकांना भेटत असतात. अशा वेळी काही माणसं आपलं वेगळेपण जाणवेल अशा पद्धतीनं इकडंतिकडं करताना दिसतील. कधी वेगळ्या वेषभूषा, कधी आखडून किंवा कधी जरबेनं बोलणं, कधी सूचना करणं, कधी निर्णय स्वतःच्या हातात ठेवणं, कधी पैशाच्या बाबी स्वतःकडं ठेवणं - अशा वेगळेपणाला प्रतिष्ठा असते. त्यातला काही उथळपणा किंवा पोकळपणा सोडला तर एका दृष्टीनं ते कुठल्या तरी लौकिक कर्तृत्वाचं लक्षण असतं, मानलं जातं.

असं वेगळेपण स्वतःला मिळावं, इतरांनी द्यावं असं प्रत्येकाला कळत-नकळत वाटत असतं. घरचा-बाहेरचा सर्व संस्कारही तसाच असतो. जे लग्न कार्यात तेच सार्वजनिक ठिकाणी, सभासमारंभांत, मंडळं-उपक्रम यांतही सतत घडत असतं. लहानपणी स्वतःचं नाव पाटीवर गिरवून गिरवून सहीसाठी शिकावं, तसं हे वेगळेपण सर्व आयुष्यभर गिरवून गिरवून जपलं जातं. त्यासाठी अनेक माणसं काही आचार-अनावश्यक कामं करायलासुद्धा तयार होतात. विक्रम करतात. वृत्तपत्र-टी.व्ही.-प्रसिद्धीची माध्यमं अशा वेगवेगळ्या प्रकारांनी हे वेगळेपण पुन्हा लोकांसमोर कसं आणता येईल याचे प्रयत्नही ते स्वतःच करतात. प्रपंचात बाह्य प्रतिष्ठेला असलेलं मोल पाहाता याची अनेकांना गरज वाटली तर नवल नाही.

कृष्णजी लक्षात आणून देतात की, या साऱ्या गोष्टी मूळच्या खऱ्या मोठेपणाचा अभाव आणि मनाचा उथळपणा दर्शवतात. आपण समजा काही कारणानं विद्या, पैसा, वय, अनुभव-कशानं मोठे असू तर ते हे प्रदर्शन करून काही आणखी मोठे होत नाही. उलट तसं करण्यानं या मनाच्या उथळपणाची, प्रसिद्धीची हौस निर्माण होऊन, एक दोषच पदरात पडतो. व्यक्तित्वाच्या वेगळेपणानं व्यवहार चालत असला तरी या वेगळेपण गिरवण्यानं 'मी'पणाच वाढत असतो. मुळात ते म्हणत की, वेगळेपण हा मनातल्या मीपणाचाच अधिक विस्तार आहे. जो शेवटी घातक ठरतो, व्यक्तीला अस्वास्थ्याचे चटके देत राहातो.

ही तर प्रपंचाची कथा झाली. पण अशा अनेक माणसांची अध्यात्मातसुद्धा तीच अवस्था असावी हे केवढं विस्मयकारक व दुर्दैवी आहे. कारण प्रपंच मुळात निदान घरदार, नावगाव असा व्यावहारिक वेगळेपणा घेऊन सुरू होतो, त्यात तो पुढं गिरवला जातो इथंपर्यंत समजू शकतं पण जे अध्यात्म-देवाकडचा प्रवास मुळात माझं वेगळेपण नाहीसं व्हावं यासाठी करायचा - तोच हे वेगळेपण गिरवीत केला तर तो प्रवास फोल ठरेल हे काय सांगायला हवं का ?

आपण सुरुवातीला जे प्रपंचाचं एक चित्र पाहिलं तेच चित्र आपल्याला अशा लोकांच्या अध्यात्मामध्ये दिसेल. तिथंही ते मुद्दाम पहाटेच उठतील, भगवे नाहीतर मुद्दाम लक्षात येतील असे कुठलेतरी वेष घालतील, स्वतःच्या स्वभावाचं, वेगळ्या सवयींचं कौतुक करतील-करवून घेतील, आपल्या योग्यतेप्रमाणं मान-प्रतिष्ठा, आध्यात्मिक सभा-शिबिरातही मिळते आहे की नाही याची काळजी घेतील. जमलं तर तिथंही माईक-स्टेज-उच्चस्थान असल्या गोष्टींची अपेक्षा ठेवतील. सगळ्यांच्या बरोबर आरती करीत असले-भजन म्हणत असले तरी मुद्दाम इतरांपेक्षा आपला आवाज जाणवेल एवढा मोठा काढतील, एखादा टाळ-ताल-चाल काही चुकला तर रागानं त्याच्याकडं तुच्छतेनं नजर टाकतील.

म्हणजे स्वतःला पुसण्याच्या, भगवंत ठेवील तसं राहाण्याच्या, भगवंताच्या झाडपानफुलं, माणसं अशा निर्मितीशी सुसंवाद साधून नम्रतेनं जगण्याच्या - या परमार्थाच्या प्रांतातही पुन्हा ते तोच घातक 'मी' गिरवीत राहातील. पूर्वी प्रापंचिकदृष्ट्या महत्त्व हवं होतं, आता पारमार्थिकदृष्ट्या ते हवंसं वाटतं. मग प्रतिष्ठेची, मानाची अपेक्षा, वेगळेपणाची अपेक्षा फक्त विषय बदलून 'मी' बळकट करण्याचं कार्य करते. म्हणूनच या बाबतीत सावध राहिलो तर पुढं जाऊ, खऱ्या अर्थानं भगवंताच्या जवळ जाऊ. नाही तर कृष्णजी म्हणतात ते लक्षात घेतलं तर आध्यात्मिक माणसं पैसा-मोठेपण-प्रसिद्धी, वेगळेपण याला भुललेली दिसतात आणि त्यांची प्रगती झालेली दिसत नाही. त्याची कारणंही स्पष्ट कळतात.

अनेक आध्यात्मिक माणसंसुद्धा या मानाच्या बाबतीत, पैशाच्या बाबतीत, वेगवेगळ्या संधींच्या बाबतीत मनानं अत्यंत निकृष्ट अवस्थेत दिसतात.साधनी माणसांनी याचा जरूर अभ्यास करीत असावं. एखादी गोष्ट प्रतिभेमुळं, निसर्गाच्या इच्छेमुळं वेगळी घडणं ही गोष्ट समजू शकते. पण त्यातलं वेगळेपण हे मुद्दाम घडवलेलं नसतं.

एखादे वेळेस आपण सहज माळावर, रानात फिरून यावं. एकासारखं दुसरं झाडपानसुद्धा दिसणं कठीण असतं. साधी फुलंसुद्धा वेगवेगळी उगवतात. पण ती तशी अत्यंत सहजपणे घडलेली असतात. आज घडीला जगात कोट्यवधींची लोकसंख्या आहे. अर्थातच कोट्यवधी चेहरे आहेत. पण त्यांतसुद्धा एकासारखा दुसरा मिळणं कठीण जातं. हे वेगळेपण निसर्गानं निर्माण केलेलं आहे, ते आपण समजू शकतो. माणूस निर्माण करायला जातो ते वेगळेपण मात्र मनाच्या साच्यातून निर्माण झालेलं आणि अर्थातच अहंकारापोटी जन्माला आलेलं असतं. ते कितीही आकर्षक वाटलं तरी दिखाऊ असतं आणि अखेर व्यक्तीला दुःखदच ठरतं.

माणसांच्या बाबतीतही सहज उगवणाऱ्या वेगवेगळ्या फुलांसारखं काही वेगळं घडू शकतं. उदाहरणार्थ एखाद्याचं साधन वेगळं घडेल, भजन वेगळं घडेल, आध्यात्मिक वाटचाल वेगळी घडेल. पण ते सहजतेनं घडलेलं असावं. ती ईश्वराची निर्मिती असावी, मग त्यात अपार आनंद आहे. एरवी स्वतः मुद्दाम वेगळेपण करायला, दाखवायला जाणं हे मनाच्या उथळपणाला आणि अहंकाराला बळी पडणं आहे. निदान खऱ्या साधकाला तरी असं वेगळेपण उलट शक्य तेवढं पुसण्याची गरज आहे. पाण्याचा थेंब समुद्रात मिसळतो, तो समुद्रही होतो, पण तो स्वतःचं थेंबपण-वेगळेपण ठेवीत नाही म्हणूनच, हे लक्षात घ्यावं.

म्हणून कृष्णजी म्हणतात तसं मानाच्या, वेगळेपणाच्या जाळ्यात सापडणं प्रपंचात असो वा परमार्थात ते हानीच घडवील. म्हणून निदान साधनेतल्या माणसानं तरी स्वतःचं मीपण बळकट करणारं कुठलंही वेगळेपण पुसण्याचे प्रयत्न सावधगिरीनं केले तर त्यांचंच हित होईल.

*

४. देवभक्ती की देवभीती

अनेक लोक 'देवाचं करतात'. म्हणजे अर्थात नक्की काय करतात कुणास ठाऊक. कारण चराचरात भरून राहिलेल्या देवाचं करणं म्हणजे काय करणं हे ठरवणं खरं तर किती सूक्ष्म आणि कठीण आहे, नाही का ? तरीही आपण जे काही करतो, त्याला आपण देवाचं करणं समजू. कुणाची पूजा आहे, कुणाची स्तोत्रं आहेत, पाठपारायणं आहेत, कुणाच्या यात्रा आहेत, कुणाचे कुलधर्म-कुलाचार आहेत. वार्षिक पूजा, दिंड्या आहेत.

या असण्याबद्दलही काही म्हणणं नाही. त्यातलं मनापासून, प्रेमानं, आवडीनं किती नि कुठलं आहे, समजून घेऊन कुठलं आहे आणि इतर कारणांसाठी कुठलं आहे, हा खरा प्रश्न आहे. तिकडं कृष्णजी लक्ष वेधीत आहेत. कारण कित्येक घरी असं चित्र दिसत असतं की माणसांना वयपरत्वे रोजचे स्वतःपुरते व्यवहार करणंसुद्धा शक्य राहिलेलं नाही, स्वतःचं आवरणंही परस्वाधीन आहे, देव्हाऱ्यापर्यंत जाणं, कुठले उपचार करणं तर दूर आहे. दुसरं कुणी घरात नाही किंवा त्यांना कुणाला त्याचं महत्त्व, प्रेम नाही, आवश्यकता नाही. अशा वेळी ही वृद्ध माणसं अंथरुणावर काळजीत असतात. आज पूजा झाली नाही, काही विपरीत तर घडणार नाही ना ?

कुलधर्म, कुलाचारांची अवस्था तर आणखीन बिकट आहे. वर्षाला कुठल्या त्या तिथीला अमुक एक गोष्ट केली नाही, कुठल्या तारखेला त्या त्या यात्रेला गेलं नाही तर पुढं जाईपर्यंत रोज अनामिक भीती मनात घर करून बसलेली आढळते. कुणाला अपघात तर होणार नाही ना, कुणी आजारी तर पडणार नाही ना, आपल्या कुणाला मुलंबाळं झाली नाहीत असं तर होणार नाही ना, धंद्यात खोट तर येणार नाही ना, घरात भांडणं अन् तंटे तर होणार नाहीत ना ? अशा एक ना दोन अनेक भीती या कुलधर्म कुलाचारांच्या पाळण्यामागं आणि तेही विशेषतः न पाळता आले तर वावरत असताना आढळतात.

त्यात कुणाचंतरी काहीतरी व्यवहारात होतच असतं, कुणाला अपघात होतो, कुणी अकाली जातं, कुणी नापास होतं - आता अशा घटना तर आपण सारं

देवाचं करीत असतानासुद्धा घडतच असतात. पण देवाचं करतानाही झाल्या तर करण्यात आपलं काही चुकलं असेल आणि केलंच नसेल तर न केल्यानंच हे घडलं असेल, असले विचार पिच्छा सोडीत नाहीत. त्या पगड्याखाली माणूस असला म्हणजे अपघाताची त्यावेळची सरळसरळ कळणारी कारणं - संबंधितांनी वाहनं न पाहता रस्ता ओलांडणं, अचानक कुणी आडवं येणं, पुढच्या वाहनानं अचानक ब्रेक मारणं, आपला वेग नियंत्रणात नसणं - असल्या अनेक कारणांतलं कुठलं तरी कारणही त्यावेळी घडलेलं असतं. पण देवाच्या त्या 'राहिलेल्या' गोष्टींचं स्मरण काही डोक्यातून जात नाही. वाटतं देवाचं ते करायचं राहिलं म्हणूनच देवानं आपल्याला ही शिक्षा केली.

त्यात पुन्हा कुणी सल्लागार, करणी करणं-उतरवणाऱ्यातले, बाधा वगैरेतले तज्ज्ञ भेटले तर मग देव हा भक्तीचा विषय संपून पूर्णपणे भीतीचा विषय कधी बनून जातो हे कळत नाही. भल्याभल्यांना या भीतीच्या सापळ्यातून सुटणं कठीण जातं.

गृहीत धरू की देव नावाची काही नियामक शक्ती आहे, संजीवक आहे, संहारकही आहे. ती कार्यकारण भावानं काम करते. पण ती 'देव' असल्यानं तिला माणसासारख्या असल्या भयभीती, दंडशिक्षेच्या भावना असू शकत नाहीत. असेलच तर तो सर्वत्र आहे. कल्याणकारी आहे आणि वात्सल्य व प्रेमाचा स्रोत आहे. एखादं चुकीचं काम करणाऱ्या लहान मुलाला आपणही फटका देतो, त्यानं कुठं आगीशी खेळू नये म्हणून मागं ओढतो, भाजेल याचा धाक दाखवतो त्यात भ्रमाचा आणि थोडा भीतीचाही वापर होतो, हेही गृहीत धरलं तरी ते मूल अजाण आहे, मूल आहे हेही गृहीत आहे. एकदा त्याला निसर्गनियम कळले, स्वतःचं मन, त्याचे व्यापार कळले की या गोष्टींची गरज लागत नाही.

पण कदाचित हा लहानपणचा भयाचा कायदा पाळण्याचा संस्कारच अधिक बळकट होतो. पुढं देवाचंसुद्धा प्रेमानं, कृतज्ञतेनं करण्याऐवजी भीतीनं केलं जातं. म्हणून कृष्णजी एका उत्तरात मुलाला म्हणाले की, आपण भीतीपोटी पूजा करतो, देवाचं करतो. माझ्या व्यक्तित्वाच्या, समजुतीच्या आपल्या भाषेत देहात, देहबुद्धीत असण्याच्या मर्यादा म्हणून अगदी सगुण मूर्तीचीही पूजा आपण करीत असू पण आपण निदान मोठेपणी तरी ती समजून, प्रेमानं करायला हवी ना ? ती आपण पुढंही भीतीपोटी का करावी ?

अनेकदा यात्रा करण्याएवढी आपली प्रकृती राहिली नाही, पूजा करायला उठवत नाही-बसवत नाही, आता तर आपण खरं तर साधे मोठेही नव्हे तर वृद्ध झालो आहोत अशा वेळी लहानपणच्या भीतीचं पुढं प्रेमात, कृतज्ञतेत रूपांतर व्हायला हवं तसं आता संन्यस्त वृत्तीत आणि निर्भयतेत व्हायला हवं, हे नैसर्गिकच आहे. मग देव मांडले तसं विसर्जन करायची भीती वाटणार नाही. यात्रेला न गेल्यानं कुणी देव शिक्षा करील, असले बालिश विचारही मनात येणार नाहीत.

उलट या वयात देव आता आपण फक्त प्रेमानं, साक्षित्वानं साऱ्या प्रपंचात,व्यवहारात परिपक्वपणे कसे राहू शकतो, निराग्रही, निर्भय, आनंदी कसे राहू शकतो त्याचीच अपेक्षा करीत असेल कारण तो अंतर्यामी आहे, सर्वांत जुना आणि शेवटपर्यंत साथ देणारा समग्र परमात्मा आहे. तो जसं सारं पाहू शकतो, सर्वांत प्रेमानं राहू शकतो, भयरहित वावरतो तसं आपण वावरतो का ते तो पाहातो आहे. त्याला असलीच तर आपल्या परिपक्वतेची ओढ आहे. पण त्यासाठी देव आपला भीतीचा नसून प्रीतीचा विषय व्हायला हवा आहे.

*

५. पोपटपंचीचं फोलपण

पोपटाला जेवढ्या गोष्टी-जेवढे शब्द शिकवले जातात तेवढे तो म्हण म्हटलं की किंवा आपण होऊन संधी मिळाली की म्हणून दाखवतो. त्याचे अर्थही त्याला माहीत नसतात आणि त्याच्या जीवनाशी त्याचा संबंधही नसतो. मात्र ऐकणारा उथळ असला तर तो एका प्राण्याच्या तोंडी एवढे मोठमोठे शब्द आणि ते पाठांतर पाहून थक्क होतो. त्याला वाटतं हा किती विद्वान, किती शहाणा असेल. त्यातून अशी जर शाबासकी मिळाली तर पोपट खुलून जातो, काही डाळमिरच्या, खाणं अशी बक्षिशी मिळाली तर मग आणखीनच खूश होतो. पुन्हा केव्हाही, कितीही वेळा म्हणून दाखवायला तयार होतो. पण खरा शहाणा त्यातला फोलपणा जाणून असल्या शब्दोच्चाराला 'पोपटपंची' म्हणतो. त्यातूनच पोकळ पण प्रभावी बडबड अशा अर्थाचा हा शब्दही रूढ झाला.

आपण थोडं पुढं जाऊया. घरात लहान मूल बोलू लागलं, खेळू लागलं की अपरिपक्व व उत्साही आईवडिलांची त्याला घडवण्याची धडपड सुरू होते. मग त्याच्या मागं लागून इतर मुलांपेक्षा वेगळ्या गोष्टी-गाणी पाठ करून घेण्याची जणू स्पर्धाच लागते. प्रत्येक पाठांतराबरोबर आणि विशेषतः इतरांसमोर म्हणून दाखवण्यावर बक्षिसाचं आमिष असतं. कुणी नवीन पाहुणा-नातेवाईक, विशेषतः बरोबरीची मुलं असलेले लोक आले की चहापाणी देऊन का होईना मुलांकडून हे सारं ऐकवण्याचा कार्यक्रम सुरू होतो. मुलांना मुळात यात रस नसतो. त्यांना खेळायचं असतं, बागेत उड्या मारायच्या असतात पण आधी धाक आणि नंतर हळूहळू पुढं मिळणाऱ्या कौतुक व बक्षिशीमुळं मुलंही या कार्यक्रमाला तयार होतात. पुढं तर त्यांना ते आवडू लागतं. मोठेपणाचं वाटतं.

आता यातही त्यांच्या पदरचं काही नसतं. त्यांना त्या शब्दांचे अर्थ माहीत नसतात. विचार केला तर लक्षात येईल की हीसुद्धा अशीच पोपटपंची आहे. आश्चर्य पुढं आहे की पुढं आपली सध्याची तथाकथित शिक्षणपद्धतीही याच पोपटपंचीला प्राधान्य देणारी आहे. स्मरणशक्तीच्या जोरावर, पाठांतरावर फक्त फीड केलेलं,

भरवलेलं अचूकपणे तोंडी-लेखी म्हणून दाखवू शकण्याला हुशारी व मेरिट-गुणवत्ता समजणारी आहे. पालकांनाही स्वतंत्र विचारांपेक्षा 'घडाघड' म्हणून दाखवता येण्याच्या अपेक्षा आहेत. मग यश, गुणवत्ता, पैसा देणाऱ्या शाखांना प्रवेश, भविष्याची तथाकथित सुरक्षितता दिसते आहे. म्हणजे आता ही पोपटपंची नेहमीच्या जीवनाला किती व्यापत चालली आहे, याची कल्पना येईल. महत्त्व येतं ते फक्त फोल घोकंपट्टी आणि यश यांना.

अशा तऱ्हेनं शिकलेल्या व्यक्तीला स्वतःच्या अंतर्मनाविषयी माणुसकीविषयी, सर्वोच्च मानवी मूल्यं आणि त्यांसाठी जगण्याविषयी काहीही माहीत नसलं तर नवल नाही. मग पुढं विसंवाद, अपेक्षाभंग, स्वप्नाळूपणा, भ्रमनिरास, मनोदौर्बल्य, विकारांचं थैमान, अविचारी कृती - अशा असंख्य गोष्टी असल्या 'शिक्षित' लोकांतही दिसतात. म्हणून कृष्णजी याला दूषित-कुजलेली शिक्षणपद्धती का म्हणतात ते कळतं, अनुभवायलाही येतं.

हा विषय एवढाच असता तर त्याची एक मर्यादा राहिली असती पण हीच फोल पोपटपंची परमार्थातही मोठं मानाचं स्थान मिळवून बसली आहे, ही साधकांनी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आपण आपला अनुभव पाहा. एखादे कीर्तनकार आहेत. पाच वाक्य बोलले की गाथांमधले, कुणाच्या प्रसिद्ध भाषणांतले, गीतेतले, ज्ञानेश्वरीतले उतारेच्या उतारे घडाघड पाठ म्हणून दाखवताना दिसतील. वाक्यावाक्याला पाठांतर दाखवून देतील. वाईट हे की हे 'पाठांतरकार'च श्रोत्यांवर-साधकांवर जास्त प्रभाव टाकून आहेत. ते कीर्तनकार-प्रवचनकार जी उत्तम तत्त्वं पाठ म्हणून दाखवीत असतात त्यांचा आणि त्यांच्या जीवनाचा अर्थाअर्थीसुद्धा संबंध आढळत नाही. पण हे लक्षात न येणारे उथळ श्रोते यालाच श्रेष्ठ, थोर समजतात ना ?

प्रवचन-कीर्तन निरिच्छतेवर, निर्लोभतेवर आणि बिदागी व्यावसायिक दरानं, रोख आणि आगाऊ वसूल, कीर्तन शांतीवर आणि घरात पदोपदी तणतण, श्रोत्यांतलं मूल बोललं तरी राग अनावर होतो, ही जर स्थिती असली तर मग सुरुवातीच्या पक्ष्याच्या शिकविलेल्या शब्दांच्या उच्चारणापेक्षा यांत फरक तो कोणता ? यात बाह्यतः किंवा तात्कालिकपणे माणूस त्या गीता-कुराण-बायबल अशा मोठमोठ्या ग्रंथांतल्या अवतरणांनी भारून गेला तरी श्रोत्यांच्या अंतरंगात फरक पाडण्याचं सामर्थ्य त्या शब्दांत नसतं. कारण ते हृदयापासून उस्फूर्तपणे आलेले शब्द नसतात आणि

त्यांच्यामागं प्रत्यक्ष परिवर्तन झालेल्या अंतःकरणाचं पाठबळही नसतं. मग उरतात ते पोकळ शब्द. म्हणून ते श्रोत्यांत परिवर्तन घडवून आणू शकत नाहीत.

तीच गोष्ट त्या सांगणाऱ्याचीही. ते सांगतात ते शब्दच मुळात त्यांना पढवलेले, त्यांनी घोकून पाठ केलेले असतात. ते त्यांच्या जगण्यातून, प्रयोगातून, सत्याच्या साक्षात्कारातून आलेले नसतात म्हणून ते फोल ठरतात. त्या सांगणाऱ्यांच्या जीवनातही कुठला विधायक बदल त्या सांगण्यानंसुद्धा होऊ शकत नाही. वरवर ते शब्द किती आकर्षक, रुपेरी, सजवलेले असले तरी अगदी बारकाईनं पाहिलं तर कृष्णजी ही सारी पोपटासारखी बडबड आहे असं म्हणतात ते का, ते कळतं. त्यातलं पाठांतर, त्यात अनुभवाचा अभाव, त्यात कौतुक-मान-पैसा असली बक्षिशी, कितीही वेळा तेच म्हणून दाखवण्याची तयारी - या साऱ्यातलं साम्य आपल्याला जाणवत जाईल.

मग खरे शब्द कुठले, खरं ऐकणं कुठलं, खरी दाद कशाला द्यायची, खरे शब्द कोणते बोलायचे याचा शोध आपल्याला अंतरंगात सुरू होतो. त्यातून हळूहळू आत्मदर्शनाची सुरुवात होते तीच खरी प्रगती असते. मग अशा आकलनानंतर बोलले आणि ऐकले जातात ते शब्द पोकळही नसतात, फोलही नसतात.

*

६. देव : देवळातला आणि देवळाशिवायचा

आपल्याला देव म्हटलं की कुठली तरी मूर्ती, प्रतिमा आणि देवघर किंवा देऊळ डोळ्यांसमोर येतं. त्याला जोडून त्यामुळं देवळात जाणं, देवाला जाणं, पूजाअर्चा, पुजारी, देणग्या, पैसा अशा असंख्य गोष्टीही येतात. आजवर हजारो काय लाखो देवळं झाली, देवही अगणित झाले पण आपण कृष्णमूर्ती म्हणतात म्हणून तरी क्षणभर विचार करून पाहावं की त्याच्या निदान काही प्रमाणात तरी माणसातल्या 'देवत्वा'ची वाढ झाली का ? आजूबाजूला पाहिलं तरी असुरक्षितता, अत्याचार, अमानुष वर्तनं यांच्यातच उलट अपरिमित वाढ झालेली स्पष्ट दिसून येईल. खरं चांगुलपण, देवत्व हे उलट आता दुर्लभ होत चाललं आहे. शोधावं लागतं आहे. प्रामाणिकपणानं, निःस्वार्थीपणानं व्यवहार घडताना पाहिला की आनंद होतो पण आश्चर्य वाटतं, चांगलाच पण धक्का बसतो.

असं का झालं असावं ? निःस्वार्थाची, प्रामाणिकतेची, चांगुलपणाची, सामंजस्याची प्रेरणा देणारा देव नि देवत्व, देऊळ हे चुकलं का ? तर ते तसं नाही. मूळ अत्यंत उच्च तत्त्वाचा आपला व्यवहार करताना तत्त्वही हरवलं आणि व्यवहारही दूर गेला. इतका दूर की साखर कारखाना जीवनावश्यक वस्तूच्या रास्त निर्मितीचं स्थान बनण्याऐवजी त्यातल्या नफ्यामुळं सत्ताकेंद्र व्हावा, शिक्षणातल्या नोकरीपासून पदवीपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर पैसा उकळण्याच्या संधींमुळं माणसाला सुजाण बनवण्यासाठी निर्मिलेली शिक्षणव्यवस्था राजकारणाचा बळी ठरावी - तशी मंदिरंही व्यवस्थापन, जातिभेद, पंथभेद, अनेक ठिकाणी दर्शनापासून देणग्यांपर्यंत हातपाय पसरलेल्या अमाप पैशांमुळं पुन्हा न्यायालयाला किंवा सरकारला ताब्यात घेण्याची व्यवस्थापनं झाली. इथंपर्यंत हा देव नि देवळं आज देशभर पसरलेली पाहायला मिळतात. याला विदेशही अपवाद नाहीत.

याचा विचार केला तर कृष्णमूर्ती स्पष्टपणे एकदा म्हणाले की आपल्याला देवळांची गरज नाही, ते का, ते कळू शकतं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणं एखाद्या व्यक्तीला घरात किंवा तुरुंगात, खोलीत बंद करून कुलूप लावून ठेवावं तसं आपण देवाचं केलं

आहे ! देव जितका देवळात आहे तितकाच नव्हे तर त्याहीपेक्षा जास्त तो बाहेर उघड्या जगात अगणित रूपानं नांदतो आहे याची जाणीव त्यामुळं विसरून गेली. इतकंच नव्हे तर तो माझ्या ठिकाणीसुद्धा आहे तितकाच तो प्रत्येकाच्या ठिकाणी आहे याचाही विसर पडला. नाहीतरी कृष्णजी म्हणतात ते खरंच आहे. अनेक मंदिरांना भक्कम कुलुपं घालूनच ती जपावी लागतात. त्यासाठी सुरक्षा-व्यवस्था लागते. शिवाय मग कुणाला कुठल्या मंदिरात प्रवेश असावा की नाही याच्या चर्चा आणि संघर्ष घडू शकतात. ज्यात सामाजिक द्वेष, हानी, विध्वंस यांपलीकडं काही पदरात पडलं नाही, हा इतिहास दुर्लक्षित करण्यासारखा नाही.

म्हणून १९३२ मध्ये अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाच्या प्रश्नात पत्रकारांना उत्तर देताना कृष्णजी एकच वाक्य म्हणाले, मुळात मंदिरांचीच गरज नाही. हे वाक्य धक्कादायक आणि एखाद्या नास्तिक व्यक्तीनं उच्चारावं तसं वाटलं तरी ते तसं तर नाहीच पण उलट देवमार्गी साधकांनाही सावध करणारं आहे. कारण त्या बाबतीत स्वतःची परिस्थिती तपासून बघण्याची गरजच उलट अधिक आढळेल. त्यांनी देवाची गरज नाही म्हटलं नाही, मंदिराची गरज नाही म्हटलं हे उद्‌बोधक आहे. देवाला मंदिरात ठेवून उलट आपण बाहेर देवाला विसरून, देव विसरून असुरासारखा व्यवहार करायला मोकळे होतो. त्यात पुन्हा या मंदिराचं-प्रवेशाचं-मध्यस्थ संस्कृतीचं-पैशाचं-धर्मांचं, सत्तेचं राजकारण करतो आहोत याकडं वेधलेलं ते लक्ष आहे.

सत्‌प्रवृत्तीला पुढं सद्‌वर्तनाला आणि सत्यस्वरूप ईश्वरप्राप्तीची प्रेरणा द्यायला समर्थ असलेली मूर्ती-देव अन् मंदिर आपण बेसावधपणानं कुठं घेऊन गेलो आहोत -जात आहोत याचा नुसता विचार जरी मनात आला तरी आपल्याला कृष्णजींनी उपस्थित केलेल्या वस्तुस्थितीचं भान येईल. त्यात पुन्हा मूळ चांगल्या आचारांची कल्पना देण्यासाठी निर्माण झालेल्या आचारपद्धतींना लेबल लागल्यानं तुमचे देव आमचे देव या दऱ्या आणखी वाढून विघटनं आणि हिंसाचार यापलीकडं काय पदरात पडलं तोही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्यामुळं माणसाला देवत्व हा निर्भय होऊन सदाचाराचा विषय होण्यापेक्षा देव हा भीतीचा, भेदाचा, श्रेष्ठकनिष्ठतेचा, द्वेष अन् लढायांचा, अंतर्गत संघर्षांचा विषय होतो.

कृष्णजी एके ठिकाणी म्हणाले की, मंदिरातली मूर्ती ही देवाची छाया आहे. दर्शनानं माणसाच्या कृतींची शुद्धी होत असेल तर ती गोष्ट उपयोगी आहे. पण शेवटी

ती छाया आहे हे ओळखून असलं तर दोन-दहा-शंभर अशा ज्या हजारो छाया उभ्या राहिल्या आहेत त्यांच्यावरून भांडणं नि वाद करण्याचं कारण नाही, हे आपण ओळखू शकतो. त्याच बरोबर याच छायांचा कुणी बाजार मांडला तर ते ओळखून विरोध करू वा दूर तरी राहू. कारण शेवटी ज्याची ती छाया तो तिथं नाही ही उमज आपल्याला पडलेली असते.

कृष्णजींना याच दृष्टान्तात जेव्हा एका जिज्ञासू मुलानं विचारलं होतं की जर मूर्तीत छाया असेल तर ती ज्याची तो असलाच पाहिजे. कृष्णजींनी प्रतिक्रिया दिली होती की तुम्ही छायेवर समाधानी होता का ? तुम्हाला खरी भूक असेल तर अन्न पाहून समाधान होईल का ? त्यासाठी तुम्हाला छाया सोडून पलीकडं जायला नको का? यातच परमेश्वराच्या खऱ्या सर्वत्र भरलेल्या निर्गुणाचा निर्देश येऊन जातो. मग मूळ ईशतत्त्वाचं एकपणही कळतं. माझा देव, तुझा देव, अमका देव, तमका देव, या धर्माचा देव, त्या धर्माचा देव असल्या भांडणातली व्यर्थताही कळते.

ही सारी वस्तुस्थिती प्रामाणिकपणे पाहिली तर साधकाला जागृत करणारी आहे. खऱ्या देवाची ओढ असेल, प्राप्तीची इच्छा असेल तर निर्वैर राहाणं, उच्चनीचतेला थारा न देणं, देव हा भीतीचा नसून प्रेमाचा विषय आहे हे लक्षात ठेवणं आणि मुख्यतः तो देवळापेक्षा बाहेर सर्व प्राणिमात्रांत, सृष्टीतही आहे ही जाणीव ठेवून वागणं याचा उपयोग जास्त होईल.

*

७. वाटा – पळवाटा

आपण अनेकदा लहान मुलं तक्रारी घेऊन येताना पाहिली असतील. ती अभ्यास-गृहपाठ करून मोकळी होतात, कधी सुट्टी असते. मग त्यांची भुणभुण सुरू होते, मी काय करू ? आपल्याकडंही फारसं समाधानकारक उत्तर नसतं. कुणी त्यांच्यासमोर काही जादा क्लास - कुठं पोहणं, कुठं शिबिरं, कराटे, कलावर्ग, वाचन- अशा कुठल्या तरी गोष्टी शोधून ठेवतं. कुणी लादतं. काहीच नसलं किंवा हेसुद्धा पार पडलं म्हणजे मग मात्र मुलांना करमणुकीची साधनं देण्याशिवाय पालकांकडं मार्ग उरत नाही. मग सध्याच्या काळात टीव्ही, मालिका, सीडी, कॉम्प्युटर गेम, मोबाईल गेम असा मुक्त वावर सुरू होतो. वेळ जाण्यापलीकडं पदरात अर्थातच काही पडत नाही.

यात विचार करण्यासारखं हे आहे की करमणूक, मनोरंजन हे एक बदल म्हणून, कधी कला म्हणून ठीक असलं तरी एक तर ती वेळ काढण्याची फार स्वस्त पळवाट आहे. दुसरं म्हणजे हा मिळालेला वेळ कारणी लावायला कितीतरी विधायक मार्ग असतात, गरजेच्या गोष्टी असतात. त्यांचा वेळ या पळवाटांमुळं खाल्ला जातो. खऱ्या कामाला तयार असलेला मेंदू आणि त्याचा तल्लखपणा उरत नाही. मग मनोरंजनात, सिनेमात जीवन दाखवतात तसं जगायचे फोल प्रयत्न आणि अट्टाहास सुरू होतात. कधी कळत कधी नकळत. पण परिणाम विघातक असतात आणि ते भोगावेच लागतात.

यात मुलांचीच चूक असते असं नाही. पालक स्वतःच ऑफिसमधून आले की टीव्ही सुरू करतात, साधं घरातल्यांना वेळ द्यावा, त्यांची सुखदुःख समजून घ्यावी, स्वतःचा शोध घ्यावा असं त्यांना वाटत नाही. तेच लगेच करमणुकीच्या पळवाटांनी धावत असतील तर मुलांना ते काय वेगळं देऊ शकणार आणि मुलांकडून तरी काय वेगळ्या अपेक्षा बाळगणार ?

बाहेर कधी बागेत नवीन फूल उमललेलं असतं, कधी पानगळ सुरू असते, कधी रणरणत्या उन्हात दगडविटा वाहणाऱ्या मजुरांच्या अंगावरून घाम

निथळत असतो, डोक्यावर थरथरणारं ओझं आणि डोक्यात संध्याकाळच्या चिंता घेऊन कुणी वृद्धा उन्हात चालत जात असते, कुठं दूर उघडे डोंगर पावसाच्या शिडकाव्याची वाट पहात तपःश्चर्या करीत असतात, समग्र जीवन, सारा परमेश्वर असा मोकळ्यावर मांडलेला असतो. पण त्याच्याशी संपर्क नसतो. मग तो संजीवन कसं देणार ?

दुसरा परमेश्वर अंतर्यामीचा. त्याच्या मार्गातलं मन. त्याचे विलक्षण आविष्कार. आत जायची गरज तर फार मोठी. शोधावं तेवढं गवसत असतं. पण त्यासाठी 'शोध' सुरू ठेवावा लागतो. उत्तरांना, निर्माण होणाऱ्या नव्या प्रश्नांना, पुन्हा नव्या उत्तरांना सामोरं जावं लागतं. धैर्यही लागतं, सबुरीही लागते. मोठ्यांनाच हा परिचय नसेल तर हा प्रांत ते मुलांना कसा दाखवणार हा प्रश्न आहे.

पण हे घडू शकतं हे कृष्णजींनी अनुभवलं आहे, दाखवून दिलं आहे. मुलांचं खरं शिक्षण हे त्यांना स्वतःची ओळख स्वतः करून घेण्यासाठी समर्थ करणं हे आहे, हे त्यांनी आवर्जून दर्शवलं आहे. मुलांना विचाराला, आत्मशोधाला प्रवृत्त केलं आहे. त्यांनी हे प्रयत्न जिव्हाळ्यानं केल्यानं, उदाहरण म्हणून मुलांनी विचारलेले प्रश्न पहा - व्यावहारिक दैनंदिन पाहा, साधनेच्या संदर्भातलेही पहा - परमेश्वरप्राप्ती किंवा साक्षात्कार यात वयाचा काही संबंध असतो का, आम्ही आमचं चारित्र्य कसं घडवावं, मी दुसऱ्या धर्माबद्दल चांगलं बोललो की माझे पालक एवढे का चिडतात, आपण स्वार्थी का असतो, आपण खरोखरच सुखी होऊ शकतो का, तुमची शिकवण व्यवहार्य नाही असं आमचे अध्यापक म्हणतात यावर तुमचं काय म्हणणं आहे, मन आणि मेंदू हे एक आहेत की वेगवेगळे, आम्हाला राग का येतो, मृत्यूनंतर आत्मा असतो का, प्रारब्ध म्हणजे काय, आम्ही जरा आजारी पडलो तरी आमचे आईवडील इतकी काळजी का करतात, तुम्ही सुखी आहात का, आम्हाला ऐशआरामी जीवन अधिक का आवडतं...?

असे असंख्य प्रश्न खरे आपल्या जगण्याशी निगडित असतात. ते शोधणं, उत्तरं शोधणं, ती अंमलात आणून पाहाणं आणि खऱ्या, अधिक आनंदी जीवनाचा आस्वाद घेणं, ही किती गरजेची गोष्ट आहे. अनेकांना असे प्रश्न पडत नाहीत कारण आधी ते विचारच करणं टाळतात. त्यात पुन्हा स्वतःशी सामना असतो त्यामुळं त्यापेक्षा गेम नाही तर सीरियल पाहाणं किंवा कुठं तरी हिंडून येणं, खाऊन येणं फार

सोपं असतं. वेळ तर दोन्हींतही जातोच. पण वेळ अमूल्य आहे. कृष्णजी म्हणतात त्यानुसार तो असल्या पळवाटांवर घालवणं उथळपणाचं जीवन आहे, शेवटी पोकळ, दुःखद - स्वतःलाही, इतरांनाही.

स्वतःशी सामना करण्यापेक्षा पळवाट काढणं सोपं असतं ही प्रवृत्ती असल्यानं पुढं साधनेतही तेच घडतं. स्वतः कसे आहोत ते पाहून, शोधून त्यावर उपाय करण्याची खरी गरज असते तर आत्मदर्शनही होतं, ईश्वरदर्शनही. पण त्यात कष्ट पडतात. आपण कसे आहोत, निदान चांगले नाही, दांभिक-पोकळ, अभिमानी आहोत याची आपल्याला आतून थोडी तरी कल्पना असते. त्यामुळं त्या मार्गाला जाणंच नको. त्यापेक्षा यात्रा-पूजा-पाठ-आरत्या-मोठमोठे फोटो-दर्शनं हे बरं वाटतं. पण या पळवाटा असतात. त्या कुठंच नेत नाहीत. फक्त आयुष्य व्यर्थ घालवतात, हे लक्षात आलं तर किती बरं होईल !

आपण स्वार्थी, मतलबी, दुटप्पी इत्यादी आहोत तसे दिसू, ती अस्वस्थता नको म्हणून ते टाळणं म्हणजे आपण भरपूर गोड खाल्लं आहे, कुपथ्य केलं आहे, शुगर वाढलेलीच येणार, डॉक्टरांचं ऐकून घ्यावं लागणार त्यापेक्षा पॅथॉलॉजिस्टकडं जायलाच नको, तपासायलाच नको असं म्हटल्यासारखं आहे. पळवाटेनं रोग थोडाच बरा होतो ? बेसावध राहू तर उलट वाढण्याचीच शक्यता आणि औषधोपचार वेळेत न केल्यानं एखादी जिवावरची हानी वाट्याला येण्याची शक्यता जास्त.

हे जसं व्यवहारात, तसं साधनेत आत्मपरीक्षण ही आत्मदर्शनाची, ईश्वरप्राप्तीची वाट आहे खरी, पण त्यासाठी साधकानं तरी साधनं जरूर वापरावीत पण साधनांचं रूपान्तर आत्मपरीक्षण आणि कृती टाळण्यात तर होत नाही ना, पळवाटा शोधण्यात तर होत नाही ना हे पाहाणं खऱ्या प्रगतीसाठी गरजेचं आहे.

*

८. सत्तेची अभिलाषा

इच्छेचं अधिक परिणत स्वरूप म्हणजे अभिलाषा. मुळात इच्छाच सूक्ष्म आहे. लहानपणापासून हे हवं, ते हवं सुरूच असतं. ते शेवटपर्यंत औषध काय, मृत्यू काय, असा हवा इथंपर्यंत. या साऱ्या इच्छेपासून जी अभिलाषा जोर धरते आहे ती खरं तर स्वामित्वाची असते हे आपल्या क्वचित लक्षात येतं. आपल्याला सत्तेची अभिलाषा म्हणजे साधारण कुठला तरी राजकीय पक्ष, त्यातले नेते, त्यांची सत्तेची पदं मिळवण्याची चाललेली धडपड एवढंच सहज डोळ्यांसमोर येतं. पण 'सत्तेच्या मूळ अभिलाषे'चा हा फक्त एक परिचित, ढोबळ आविष्कार आहे. मूळ विषय खूप व्यापक, खोल व जीवनव्यापी आहे, हे कृष्णजींनी अनेकदा दाखवून दिलं आहे.

आपल्या मनाला येईल त्याप्रमाणं परिस्थिती, माणसं यांना वळण देण्यासाठी, वापरण्यासाठीच आपल्याला सत्ता हवी असते. तुमच्याकडची राजकीय सत्ता ही अधिक ढोबळ असल्यानं बाह्य अधिकाराच्या बळावर रस्ता करून दाखवता येतो, त्यावर पाणी मारता येतं, टँकर दारात उभा राहातो हे सारं आपण पाहातो. एखाद्या कुणा फार उच्चपदस्थाचा दौरा आपल्या भागात येणार असला की दहादहा, वीसवीस वर्षं रखडलेला, मंजूर होऊन पडलेला रस्ता दोन दिवसात गुळगुळीत होतो, चमकायला लागतो. किंबहुना अशी एकदम कुठं सुधारणा, स्वच्छता दिसायला लागली की कुणी पंतप्रधान, राष्ट्रपती येणार आहेत का अशी शंका येते. मग अशा सगळ्यांना वाकवणाऱ्या सत्तेबद्दल सामान्य माणसालासुद्धा अभिलाषा निर्माण होते.

पण आपल्या हे लक्षात येत नाही की रस्ताच नव्हे, आपणसुद्धा इतरांच्या सत्तेच्या अभिलाषेचे बळी बनत असतो. हेही लक्षात घेण्याची गरज आहे की, रस्तासुद्धा गरजेनं झाला असता तर कधीच झाला असता पण आता तो झाला आहे तोही सत्तेच्या अभिलाषेनं झालेला आहे, सत्तेच्या भीतीनं झाला आहे. तो करणाऱ्यांनाही पुढचं उच्च पद डोळ्यांसमोर दिसतं आहे, त्याची अभिलाषा आहे. त्यात या रस्त्यावरून जाणाऱ्या त्या उच्चपदस्थांची मदत होणार आहे, कदाचित त्यांच्या खुर्च्या खाली होऊनसुद्धा ती एके दिवशी पुरी होईल !

अर्थात असं समजायचं कारण नाही की हा काही फक्त राजकारणाचा विषय आहे. मन तेच आहे. वृद्ध वडील दुकानात यायचं केव्हा थांबवतील याची तरुण मुलाला चिंता पडली आहे ती वडिलांना पडणाऱ्या त्रासामुळं नाही तर गल्ल्यावर, सर्व नोकरचाकरांवर, गाड्यावाहनांवर असलेली सत्ता हाती यायची अभिलाषा आहे. घरात सासूबाईंकडून सत्ता दिली जात नसेल तर आपण वेगळं बिऱ्हाड करूया या मागणीमागंही हीच सत्तेची अभिलाषा आहे. कारण मग वस्तूपासून, आवकजावक, येणीजाणी सर्वांवर आपली सत्ता चालण्याची सुनेलाही अभिलाषा आहे. पण पुढं तिची सूनही तेच करणार आहे. कारण तेच मन, तेच सत्तेचं आकर्षण आहे.

मग ते असू नये का ? नसेल तर का असू नये, हे शोधणं आवश्यक आहे. एक तर अशी अभिलाषा आणि मिळवलेली सत्ता ही या दुसऱ्यांवरच्या, काही भूप्रदेशावरच्या, काही परिस्थितींवरच्या आपल्या नियंत्रणामुळं आकर्षक वाटते. पण नियंत्रण कधीच अंतिम नसतं. राष्ट्रपती यायचे ठरले की राज्यपालांची गाडी मागं सरते, यांची खुर्ची काढून त्यांना दिली जाते. दुसरं त्यातून आपल्याला मिळणारं सुख हे एखाद्या इंद्रियांचे उपभोग जसे सुखद वाटतात पण आपल्यालाच दुर्बल करतात-अखेर परावलंबी करतात-असमर्थ करतात तसं हे मन या इंद्रियाबद्दलचंच असतं. सत्ता गेली की सत्तेची अभिलाषा असलेला जसा एकाकी होतो, नैराश्यानं ग्रासतो तसं सारं होत असतं.

त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे कृष्णजी म्हणतात तसं कोणतीही सत्ता माणसाला भ्रष्ट करीत असते. राजकीय सत्ता, पदं, सनदी नोकरीतली पदं, इतर असंख्य क्षेत्रातली पदं-माणसांना किती लाचखोर आणि भ्रष्ट बनवतात याचे कोट्यवधी रुपयांचे आकडे सध्या सर्वांचीच डोकी सुन्न करीत आहेतच. पण एक लक्षात ठेवायला हरकत नाही की सत्ता भ्रष्ट करीत असल्यानं ती सासूची असो, व्यवसायातली असो, नोकरीतली असो ती त्याला बिघडवीत असतेच. ती कदाचित प्रत्यक्ष पैशानं नसेल तर दुसऱ्यांचा अवाजवी वापर, कामाचा ताण देणं, निर्णय लादणं, हट्टीपणानं दुसऱ्यांना त्रास देणं अशा कुठल्याही प्रकारानं असेल.

यात आश्चर्य करण्यासारखं हे आहे की हीच सत्तेची सूक्ष्म अभिलाषा माणसाला परमार्थात, अध्यात्मातही सोडीत नाही. साधनेनं, योगसिद्धीनं येणाऱ्या सत्तेची अभिलाषा किती सूक्ष्म असते याचे असंख्य दाखले आहेत. पण त्याहीपेक्षा

सात्त्विक वाटणाऱ्या ज्ञान, प्रवचनकीर्तन कौशल्य, मठमहंती या साऱ्यांतसुद्धा ही सत्तेची सूक्ष्म अभिलाषा काम करीत असते. नेता केंद्रात किंवा स्वगृही गेला तर आपली वर्णी लागेल असा मनात विचार करीत सध्याच्या त्या नेत्याची भाटगिरी करणारा आणि हे मठपती किंवा पंच यांची जागा मोकळी झाली तर ती आपल्याला मिळेल का याचा विचार करणारा, हे प्रवचनकार हृदयविकारानं गेले तर त्यांच्या जागी आपल्याला बसता येईल का याचा विचार करणारा - यांत फरक काय ? इतकंच काय अशा पदावरच्या व्यक्तींची अगदी सेवा करणाऱ्यांच्याही डोक्यातही हा विचार सुरू असू शकतो. कारण तिथं पुन्हा प्रसिद्धी, काही पद, पैसा, कशावर तरी नियंत्रण - यांचं मनाला अभिलाषा असलेलं सुख खुणावीत असतं.

वरवर पाहाता ही क्षेत्रं व्यावहारिक व आध्यात्मिक अशी वेगवेगळी वाटली तरी मनाचा कारभार, चकवा तोच असतो, हे कृष्णजींनी दाखवून दिलं आहे. आणि त्यामुळं त्यापासून होणारी हानी आणि मनाच्या गुलामीत होणारी दुर्दैवी अखेरही सारखीच आहे, हे स्पष्ट आहे. यात मूळ परमार्थ-देवमार्ग यांचा काडीचा संबंध नाही हे साधकांनी जरूर जरूर शिकण्यासारखं आहे. लौकिकाचं राहू द्या पण निदान या मनाच्या मुक्तीच्या वाटचालीत तरी कुठल्या सत्तेची अभिलाषा आपल्याला आडवाटेला नेऊन वाटमारी करणार नाही ना, हे पाहाणं अगत्याचं आहे. खऱ्या साधकाला तर खूपच !

*

९. व्यावहारिक संबंधांपलीकडं

माणूस तर संबंधांशिवाय राहात नाही. प्रश्न असतो तो फक्त या संबंधांचा ढाचा किंवा प्रकार कसा असतो, त्याची परिणती कशात होते त्याचा. एखादा व्यवसाय घ्या. मालक आणि कामगार असा एक संबंधच त्यात काम करतो. मालकांसमोर उत्पादनाचं काही उद्दिष्ट असतं. ते उद्दिष्ट ते मालक काही स्वतः पूर्ण करू शकत नाहीत. मनुष्यबळाची गरज लागते. त्यासाठी ते काम करू शकणारे कामगार नेमणं गरजेचं ठरतं. इकडं कामगारांना उपजीविकेसाठी पैशाची गरज असते. कामाची कुवत असते. हे काम मिळालं तर त्यामुळं पैसा मिळून ती गरज पूर्ण होते. हा झाला संबंधांचा सरळ व्यवहार.

दोघांच्याही गरजा स्वाभाविक आहेत. पुऱ्या करण्याचे मार्ग सरळ आहेत. फक्त अडचण पुढं निर्माण होते. मालकाला वाटतं यांनी कमी पगारात जास्त काम करावं, कामगारांना वाटतं आपल्याला कमी कामाला जास्त पगार मिळावा. मग त्यासाठी एकमेकांचा वापर सुरू होतो. जो अधिक सबळ असेल, ज्याच्या हातात अधिक सत्ता असेल, ज्याच्याजवळ अधिक कुशलता असेल त्याची सरशी होते. कधी कामगार मालकाला लुबाडतात, त्याचा वापर 'यशस्वी'पणे करतात, कधी मालक कामगारांची पिळवणूक करतात, कामगारांचा 'यशस्वी' वापर करतात.

कृष्णजी आपलं लक्ष इकडे वेधतात की, साऱ्या जगाचे हे सारे संबंध हे गरज आणि वापर यांवर आधारलेले आहेत. तांत्रिकदृष्ट्या आपण वर पाहिलं तसं गरजेपोटी संबंध निर्माण होतात. ही गोष्ट केवळ कामगार-मालक एवढ्यातच नाही, तर आपल्या व्यक्तिगत आयुष्यापासून, कुटुंबात, समाजात, संस्थांत, राजकीय पक्षांत, सरकारी यंत्रणांत - सर्वत्र आधारभूत आणि आवश्यक असेलही, पण या गरजेचं रूपांतर वापरात कधी होतं आणि त्याच्या मर्यादाही कधी ओलांडल्या जातात, समाज व व्यक्तींचं विघटन कधी सुरू होतं हे कळतही नाही.

अगदी साधं म्हणजे घरातले आई-वडील-मुलं हे संबंध घ्या. आई-वडिलांचे संबंध व्यक्तिगत-सामाजिक गरजेपोटी निर्माण झाले. त्यातून समजा आईचा

आणि तिच्या मुलाचा संबंध निर्माण झाला. आता इथंपर्यंत ठीक आहे, पण आता मुलगा ही स्वतंत्र व्यक्ती आहे, ही बाब कित्येकदा लक्षातच येत नाही. आपण स्वतःला व्यक्ती म्हणून जेवढं स्वातंत्र्य अपेक्षित करू, तेवढं स्वातंत्र्यही मुलगा म्हणून त्याला देण्याचं भान राहात नाही. उलट विचार कसे चालतात पहा. तो 'माझा' मुलगा आहे, तो हुशारच झाला पाहिजे, त्यानं अमुकच माध्यमात शिकलं पाहिजे, त्याला एवढे मार्क पडलेच पाहिजेत. तो खेळात, स्नेहसंमेलनांत पुढं आला पाहिजे, चमकला पाहिजे, त्यानं शक्यतो मेडिकलला नाहीतर इंजिनिअरिंगला तरी गेलंच पाहिजे. त्यातही पैसा व प्रतिष्ठा देणाऱ्या शाखेला त्याला प्रवेश मिळालाच पाहिजे. मग त्याचं लग्न ते आपल्या पसंतीच्या, देखण्या मुलीशी झालं पाहिजे, त्याचा विवाहसोहळा जसा मला व्हावासा वाटतो तसा थाटात झाला पाहिजे - ही स्वप्नं जेव्हा आया पाहातात तेव्हा आपल्याला फार वेगळं वाटत नाही. कदाचित सारखं हॅमरिंग किंवा बिंबवण्यामुळं मुलालासुद्धा वेगळं वाटणार नाही. तोही हळूहळू ही सारी स्वप्नं त्याची स्वतःची म्हणूनच पाहू लागेल हेही शक्य आहे.

पण कृष्णजी सुचवतात, हा आता गरज संपून 'वापरा'चा प्रांत सुरू झाला आहे. आई मुळात महत्त्वाकांक्षी आहे. तिला त्याप्रमाणं जगायचं आहेच. पण ते सगळं कुवत कमी पडल्यानं किंवा परिस्थितीनं जमलं नसेल तर 'मुलाचा वापर करून' तिला ते आताही जगायचं आहे. मुलगा व्यक्ती म्हणून स्वतंत्र फुलासारखा उमलण्याऐवजी कधीच साच्यातला निर्जीव पुतळा झालेला आहे. ही दुर्दैवी असली तरी वस्तुस्थिती आहे, हे खरं.

आपण फक्त एक छोटासा संबंध कसा गरज नि वापर यांनी व्यापलेला आहे हे पाहिलं. तेच मालकीण-भांडीवालीचं असेल, तेच शिक्षक-विद्यार्थ्यांचं असेल, नेते-अनुयायी यांचं असेल, तेच मतदार अन् लोकप्रतिनिधी यांचं असेल. नव्हे असतं, हे पाहायला मिळतं. पण यात खरे व्यक्तित्वाचे, पूर्णत्वाचे, निर्मळ, सदैव जिवंत असे विकास खुंटून जातात. अनेक माणसं खऱ्या स्वातंत्र्याला, त्याच्या आनंदाला मुकतात ही दुर्दैवाची व अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. एक स्वतंत्र, समर्थ, विचारशील व्यक्ती म्हणून आपलं ते काम आहे, जबाबदारीही आहे याची जाणीव कृष्णजींच्या अभ्यासानं होते.

आश्चर्य हे की, हाच 'गरज नि विशेषतः वापराचा' व्यावहारिक संबंध

इकडं आध्यात्मिक क्षेत्रात तर आणखीच गोंधळ घालीत असतो. एखाद्याला निवडून यायचं असलं म्हणजे तो माणसांच्या नसून मतांच्या चिंतेत असतो. मस्तकांची संख्याच महत्त्वाची असते. सुजाण, स्वतंत्र, विचारशील मेंदू वगैरे गोष्टी नको असतात, उलट अडचणीच्याच असतात, संख्या महत्त्वाची असते. कारण त्या बळावर सत्ता आणि मग तिचा वापर करून देहसुखं मिळवता येतात. तीच अवस्था अध्यात्मात महंत, बुवा होऊ पाहाणाऱ्यांची असते, हे कृष्णजींनी दाखवून दिलं आहे.

अशा बुवांना-गुरूंना आपलं, आपल्या पंथाचं बळ वाढवायला लोकांची संख्या गरजेची असते, लोकांना कुठंतरी सुरक्षिततेची गरज असते, स्वतःचा स्वतःशी सामना कसा टळेल याची गरज असते, कुणाला काळ्या पैशाच्या भीतीपासून मुक्त होण्याची गरज असते. एकमेक एकमेकांच्या गरजा भागवतात. जे कामगार-मालकात झालं तेच गुरू-शिष्यगणांत होतं. कधी शिष्यसंख्येचा वापर करून गुरू पैसा, प्रतिष्ठा, देहसुखाच्या गोष्टी साधतात, कधी शिष्य गुरूंचा, त्यांच्या नावाचा वापर करून सत्ता, मानमान्यता, संपत्ती, लौकिक साधून घेतात. तो अधिक शहाजोग-प्रवीण असेल तर तो पक्ष अधिक साधतो. मग फरक तो काय ?

म्हणून कृष्णजी सुचवतात त्याप्रमाणं निदान साधकाला व्यवहारात मुळातच खऱ्या गरजा ओळखणं शक्य आहे, कुणाचा वापर आपण करीत नाही ना हे तपासणं शक्य आहे. त्याहीपुढं जाऊन निदान परमार्थात तरी खरी गरज फक्त जिज्ञासा, सावधानता, कृती यांची. त्यामुळं त्यात इतरांची गरजच मुळात नगण्य. ती टाळणं आणि विशेषतः आपण कुणाचा वापर करीत नाही, आपला वापर होत नाही ना हे जाणून राहिलं तर आपला परमार्थ हा या व्यावहारिक साच्यांपासून, त्यांच्या हानींपासून मुक्त राहील, गतिमान राहील.

*

समाजामध्ये अनेक प्रकारची कार्यं सुरू असतात. कुणी गरीब वस्तीत जाऊन स्वच्छता-शिक्षण अशा गोष्टींचं महत्त्व समजावतो, कुणी टंचाई-कुणी पाणी-कुणी प्रबोधन असे प्रश्न हाताळतो, कुणी मागास-आदिवासी भागात काम करतो, कुणी साक्षरतेचं काम करतो - अक्षरशः अगणित प्रकारची कार्यं सुरू असतात. यांत मूलतः निःस्वार्थ, अपार त्याग आणि निरपेक्षता अशा खऱ्याखुऱ्या अलौकिक भावनाही असतात. त्या भावना आणि अशा व्यक्ती हा अत्यंत आदराचा आणि जिव्हाळ्याचा आदर्शवत् विषय आहे, यात शंका नाही.

कृष्णजींचं म्हणणं असं आहे की, जगामध्ये एका बाजूला उपासमारी, रोगराई, शोषण, गर्भश्रीमंतांची गरीबांविषयीची क्रूर अनास्था, माणसांमाणसातलं शत्रुत्व - अशा गोष्टींमुळं आपलं हृदय अस्वस्थ आहे, मन भरून आलं आहे, शुद्ध निरपेक्ष सहानुभूतीनं अंतःकरण द्रवतं आहे - अशा वेळी तुम्ही काम न करता थांबूच शकत नाही. मग तुम्हाला कदाचित अडचणी जाणवत नाहीत, अविरत कष्ट भासत नाहीत, कार्याकडं कुणी पाहातं आहे की नाही याचं भान राहात नाही, कुणी दखल घेईल न घेईल, कौतुक करील न करील असले विचार मनात येत नाहीत. पैशाचा अभाव, शरीर, प्रकृती, हवामान यांच्या प्रतिकूलता जाणवत नाहीत - उलट ती आव्हानं वाटतात, कार्याची कुणी केलेली उपेक्षा, कुणी केलेली निंदा यांची तमा न बाळगता 'स्व' विसरून करता ते खरं समाजकार्य ! त्यातच समाजात खऱ्या परिवर्तनाची बीजं रोवली जातात.

मात्र कृष्णजी ज्या समाजकार्यांविषयी सावध करीत आहेत ते मात्र वेगळं आहे. त्याची सुरुवात, व्याप्ती आणि अर्थातच शेवटही वेगळाच आहे. वर सांगितली ती खरी कार्यं वगळता मात्र जी प्रचंड कार्य घडतात त्यांची सुरुवात जगातल्या उणिवा, दुःख यांच्याबद्दलच्या कळकळीनं झालेली नसते. तुमच्या जीवनात कुठं पोकळी असते, रिकामी जागा असते, भकासपण असतं ते तुम्हाला अस्वस्थ करतं. कधी तुम्हाला कुणी, तुम्ही ज्याच्याशी स्पर्धा करता असा माणूस, असली कार्यं करून

यशस्वी होताना दिसतो, त्याला मिळणारा मान अस्वस्थता निर्माण करतो, कधी तुम्हाला कुणी ते करायला विनंती करतं. आपणच हे करू शकाल असली मानभावी प्रशस्ती तुम्हाला बेसावध करते, अनेकदा स्वतःच्या जीवनात निराशा आलेली असते, त्यातून बाहेर पडायचं असतं, कुणाला समाजकार्यात येणारी प्रतिष्ठा-सामाजिक मान्यता हवी असते, अनेकांना व्यवसाय-प्रपंचाचा कंटाळा आलेला असतो, अनेकांना अशा कार्यांतून गोळा होणारा पैसा दिसतो, अनेक जण एक तर निरुद्योगी किंवा निवृत्त जीवन जगतात. त्यात त्यांना विरंगुळा हवा असतो-अशा असंख्य कारणांसाठी वेगवेगळी समाजकार्यं (?) माणसं हातात घेतात, त्यांच्याविषयी कृष्णजी बोलत आहेत.

विशेष म्हणजे अशाच माणसांची संख्या खूप असते. अगदी प्रथम म्हटलं तसं खरं समाजकार्य करणारे अत्यंत मोजके असतात. पण नंतर सांगितलेल्या साऱ्या तथाकथित कार्यकर्त्यांच्या कार्याच्या सुरुवातीतच फरक आहे हे कृष्णजी लक्षात आणून देत आहेत. कार्याचा उगम कुठं हृदय हालून, मन भरून येऊन, निःस्वार्थ, अपार त्याग यांतून न होता स्वतःच्या कुठल्यातरी सुप्त, अप्रकट महत्त्वाकांक्षा, अडचणी यांतून झालेला आहे. ज्यांच्याबद्दल कार्य गरजेचं आहे त्यांच्यापोटी ही पहिली खरी कार्यं सुरू होतात तशी ही झालेली नाहीत. अनेकांना तर कार्य कुठलंही चालतं, अनेकदा कुठलं कार्य - त्यांची निकड कोणती असल्या प्राथमिक गोष्टींचीही कल्पना नसते. त्यांच्या त्यांच्या सध्याच्या परिस्थितीवर उपाय म्हणून, प्रतिक्रिया म्हणून ही समाजकार्यं होत असल्यानं त्यात जीव नसतो, ती टिकत नाहीत, त्या त्या व्यक्तींची स्वतःची उद्दिष्टं साध्य झाली किंवा ती साध्य होणार नाहीत हे कळलं की, असली समाजकार्यं (?) बंद पडतात.

कृष्णजी म्हणत, असली कार्यंच मुळात स्वस्वरूपापासून पळ काढण्यापोटी जन्माला आलेली असल्यानं किंवा कुणीतरी काहीतरी सांगितलं म्हणून करायला घेतलेली असल्यानं जमिनीवर फांदी नुसती ठेवून ती न रुजावी तशी त्या कार्यांची अवस्था असते. असली कार्यं स्वतःच्या खऱ्या अडचणी, दुःख, रिकामपण - अशांवरच्या प्रतिक्रियांतून आलेली असल्यानं बाहेर कदाचित काही समाजकार्य झालेलं दिसलं तरी ती करणाऱ्या व्यक्तींचे मूळ दुःखद प्रश्न तसेच असतात, त्यांना तसेच भेडसावत राहातात. मूळ आवश्यक उपचाराऐवजी चुकीच्या मार्गानं गेल्यानं शक्तीचा ऱ्हास होऊन प्रश्न आणखीच वाढतात आणि सोडवणं - सुटणं बिकट होऊन बसतं.

मग पुन्हा कुठंतरी निराशा किंवा खोटंखोटं समाधान, भ्रम अशांना तोंड देत उरलेले दिवस काढावे लागतात.

हीच अवस्था अशाच कारणांसाठी 'देवकार्या'कडं वळणाऱ्यांचीही होते, हे साधनी माणसाला लक्षात घेण्यासारखं आहे. आपणही जर स्वतःचं रिकामपण भरायला म्हणून, कुणी काही सांगितलं-लादलं म्हणून काही करायला जाणार असू, कुठल्या सामाजिक प्रतिष्ठा-पैसा असल्या क्षुद्र गोष्टींसाठी देवाकडं वळलेले असू, स्वतःचा कंटाळा घालवायला देवकार्य करीत असू - तर आपण आपला प्रश्न सोडवू तर शकणार नाहीच पण त्यात, मूळच्या उणिवा व दुःखात भर घालू, हा कृष्णजींनी दाखवलेला धोका वेळीच ओळखावा.

अशा इतर कारणांसाठी देवकार्याकडं वळलेल्या लोकांचं त्या त्या ठिकाणी पटलं नाही, कुठला मान, पद तिथं मिळालं नाही, अपेक्षित काम, संधी मिळाली नाही, कुणी तिथं दुर्लक्षित केलं की मग अशांची जी वाईट मनःस्थिती होते, त्यावरून कृष्णजींच्या म्हणण्याचं खरेपण कळून येतं.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं देवासाठी कार्याची सुरुवात कशातून झाली हे पाहावं. मग देवत्वाच्या बाहेरच्या तीव्र, दुःखकर दुष्काळामुळं, देवाच्या जिज्ञासेमुळं, इतरांना खऱ्या देवाची प्राप्ती न झाल्याच्या-मुक्ती न साधल्याच्या तीव्र समवेदनेमुळं जर आपण त्यातल्या समाजकार्याकडं, देवकार्याकडं वळलो असू तर ते ठीक आहे. निरपेक्ष, निःस्वार्थी, अत्यंत प्रेममय, पूर्ण मनोभावानं, भरल्या हृदयानं काही करत असू तर ते देवकार्य, साधन हीच मुक्ती होईल. इतरांना लाभ होईल हे सांगायला नकोच. याचीही सुरुवात आपल्यापासून, आपल्या परिस्थितीतल्या कुठल्या प्रश्नांमुळं झाली नसली तर ते काम अधिक टिकाऊ ठरेल. अशा व्यक्तीला स्वतःजवळ काहीही नसताना, काहीही मिळण्याची शक्यता नसताना जो निःस्पृह, हृदयपूर्वक, देवजीवन जगेल त्याचं जीवन, कृष्णजी म्हणत, खरं आनंदी जीवन असेल आणि ते नुसतं असं खरं जगणं हेच त्याचं खरं समाजकार्य असेल आणि अशीच माणसं जगात खरं परिवर्तन घडवून आणू शकतील !

*

११. खऱ्या बदलाचा मार्ग

सर्वसाधारणपणे मोठ्या माणसांचं विशेषतः आईवडील, आजीआजोबा यांचा लहान मुलांना उपदेश करणं, त्यांच्यात विधायक (?) बदल घडवून आणणं हा एक जन्मसिद्ध हक्क आहे असं आपली समाजपद्धती मानते. वय, अनुभव यांत जर काही सत्य त्यांना गवसलं असेल तर यात तथ्य असेलही. पण कित्येक घरात आपण पहातो ते चित्र असं असतं की आपल्या मुलाचा विचार करताना त्याच्या बरोबरीच्या इतर मुलांचाच जास्ती विचार सुरू असतो. इतरांकडं कोणत्या अनुकूलता आहेत, त्यांची घरंदारं, आईवडील कसे आहेत, त्यांची बुद्धिमत्ता कशी आहे, ती कोणत्या ॲक्टिव्हिटीज करतात, ती पुढं कोण होणार आहेत अशा अनेक गोष्टींचा पालकांचा विचार सुरू असतो. मग त्यातल्या पालकांच्या दृष्टीनं आदर्श (?) गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून आपल्या मुलाचा विचार सुरू होतो.

मग प्रत्येक बाबतीत त्याची त्या दुसऱ्या मुलांशी तुलना. तो इतका वेळ अभ्यास करतो, एवढा वेळ खेळतो, त्याला अमुक एक कला येते, तो कुठल्या कुठल्या स्पर्धेत पहिला आला -असा चांगला प्रत्येक मुद्दा धरून विचार झाला की मग आपल्या मुलाला धोपटायला सुरुवात होते. त्याच्यापेक्षा उलट तू बुद्धिमान आहेस, तुला आम्ही हव्या त्या गोष्टी देतो, खाण्यापिण्याचे लाड करतो, अधिक चांगला, महागडा क्लास लावला आहे. मग तुला त्याच्यासारखे मार्क का पडत नाहीत ? हे एवढंच नसतं तर एकाच वेळी मुलानं त्याच्यापेक्षा जास्त गुण मिळवावेत, जास्त पाठांतर-चित्रकला-खेळ अशा स्पर्धांत जास्ती काही तरी करावं. आधी त्या मुलाच्या साच्यातून आपल्या मुलाला काढण्याचा विचार असतो मग ती अपेक्षा पुढं वाढत जाऊन आपला साचा त्याच्यापेक्षा वरचढ बनवण्याची स्वप्न पाहिली जातात. जणू मूल म्हणजे निर्जीव मातीचा गोळा आहे.

मुळात खरं तर हे अनैसर्गिक आहे. त्यातही आग्रही पालकांकडून हे लावून धरलं गेलंच तर मूल ते करतं. स्वतःत त्या त्या कुणा मुलासारखे बदल घडवतं, हा मातीचा गोळा त्यापेक्षाही चांगला आकार धारण करतो, पण आयुष्यभर तो निर्जीव

गोष्टच राहातो. त्या घडवलेल्या आकारापलीकडं सजीव, विलक्षण समृद्ध अंतर्बाह्य व्यक्ती म्हणून तो जगू शकत नाही. ठरावीक साच्यात जगत राहातो. कुणाची तरी स्वप्नं पुरी करीत राहातो. स्वतःचं व्यक्तिमत्त्व वेगळं घडतं पण खऱ्या अर्थानं जिवंततेचा, चैतन्याचा, उत्साहाचा कुठला प्रत्यय त्याला ना स्वतःला येत, ना त्याच्यापासून इतरांना. मग शौर्य उरतं ते कृत्रिम करमणुकी, माफक व्यसनं, गाड्या घेऊन टूर करून येणं, बाहेर खाणंपिणं, कुठल्यातरी शेअरबाजार-क्रिकेट-कसल्या तरी आयडॉलबद्दल गप्पात आनंद घेणं.

व्यक्ती लहानाची मोठी होते, अशिक्षितची सुशिक्षित होते, साध्या गाडीऐवजी महागडी गाडी येते, फरशीऐवजी मार्बल येतं-पण निसर्गानं, ईश्वरानं अपूर्व निर्मितीची क्षमता ओतून पाठवलेली माणसं खऱ्या अर्थानं का बदलत नाहीत ? संवेदनशील होणं, चांगल्या अर्थानं गतिमान राहाणं, आत्मशोधानं येणारं निरुपाधिक समाधान मिळवणं, इतरांची असंख्य जीवनं उभी करण्याची-सावरण्याची येऊ शकणारी क्षमता मिळवणं - असे कित्येक खरे बदल व्यक्तीत का घडत नाहीत ? प्रत्येकाला निसर्गानं संधी बहाल केलेली असताना !

याचं कारण दाखवून देताना कृष्णजी म्हणतात तुलनेनं आपली प्रगती 'झाल्यासारखी वाटते' पण खरी झालेली नसते. कारण आपली खरी प्रगती 'माणुसकी'ची असते. आपल्या भाषेत, मनुष्यातल्या देवत्वाची असते, हे आपण जाणत नाही. दुसऱ्याशी तुलना करून फार तर माझे दोन गुण (मार्क) वाढतील पण माझ्यातले सद्गुण वाढत नाहीत, माझ्यात कुठल्या दया, करुणा, शांती, चिंतारहितता, आनंद यांची वाढ होत नाही, हे कदाचित कटु असेल पण सत्य आहे. कारण असल्या तुलनांनी वर म्हटल्याप्रमाणे आणखी एक दुसऱ्याच्या साच्यातला लौकिकात यशस्वी पुतळा घडतो. दिलदार, उमदा, शांत, क्षमाशील, आनंदी असा सदैव चैतन्यमय माणूस नव्हे ! म्हणून कृष्णजी सुचवीत की, तुलनेनं घडणारे बदल उथळ, वरवरचे असतात.

इतकंच नव्हे तर त्या साऱ्यांच्या मुळाशी तुलना असल्यानं त्यातून हिंसा वृत्ती, असूया आणि अंतिमतः दुःखच वाढत असतं, हे लक्षात घ्यायला कृष्णजींनी सुचवलेलं आहे. याचा अनुभव आपल्याला येतो. असल्या तथाकथित यशस्वी, हुशार डॉक्टर, इंजिनियर, उच्चपदस्थ, श्रीमंत, उद्योजक अशा अनेकांच्या मनातली

इतरांबद्दलची असूया, शक्यतो दुसऱ्यांबद्दलची दुर्भावना, संधी मिळाल्यास त्यांच्या पुढं जाण्याची सुप्त इच्छा, उपेक्षितांबद्दल-गरिबांबद्दलची अनास्था-यांतून हा सारा उथळपणा सहज कळून येतो.

दुर्दैवानं अध्यात्मातही हे खरं आहे. दुसऱ्या शिष्याबद्दल, त्यानं केलेल्या प्रगतीबद्दल, साधनेबद्दल, त्याच्या निष्ठेबद्दल मनापासून चांगलं बोलणारे किंवा त्याची अशीच आणखी प्रगती व्हावी, त्याच्यात असेच विधायक, खरे बदल घडून यावेत असं मनःपूर्वक वाटणारे किती शिष्य आपल्याला दाखवता येतील ? उलट असं कुणाला काही साधलंच तर त्याच्याबद्दल असूया वाटणारे, जमल्यास त्याच्यातले दोष शोधणारे, त्याचा पाणउतारा करण्याची संधी मिळण्याची वाट पाहाणारे असंख्य भेटतील. तथाकथित गुरू-गुरूंची परिस्थिती यापेक्षा फार वेगळी नाही.

याचं कारण कृष्णजी म्हणतात त्यांना खरा बदल कसा घडतो याची कल्पना नसते हेच खरं. खरे बदल व्यवहारात जसे मुलाला स्वतःला जाणून घ्यायला शिकवण्यानं होतो, आपण त्याची तुलना दुसऱ्याशी करायला लावून-करून होत नाही. खऱ्या बदलाचा मार्ग आपली स्वतःची खरी परिस्थिती - आंतरिक-बाह्य-जी जशी आहे ती तशी नीट, शांतपणे समजून घेण्यातून सापडतो, हे कळणं आवश्यक आहे. आपल्या खऱ्या कुवती, कल, क्षमता, आवडीनिवडी यांच्या आकलनातून खरी आणि योग्य कृती स्वतःच शोधायची असते. तिचं दुसऱ्याच्या कृतीशी कदाचित साम्य असेलही पण ती कृती ठरली ती आपल्या आकलनातून. त्यामुळं तिच्यातून उथळपणाही येत नाही आणि पुढची अशी हिंसक अस्वस्थता किंवा संवेदनशून्यताही येत नाही. उलट खरं चैतन्यमय, आत्मतृप्त जीवन कुणालाही त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणं जगता येतं. त्यासाठी लागणाऱ्या कृतीही मनापासून स्वतःच्या आकलनातून होत असतात. त्यामुळं परिणामांची, परिस्थितीची इतरांशी तुलना करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आपण आनंदी असतो, खऱ्या अर्थानं !

पण त्यासाठी खऱ्या बदलाचा मार्ग तुलनेऐवजी स्वतःला आणि वस्तुस्थितीला समजून घेण्यातून जातो हे कळणं आवश्यक आहे, मग वाटचाल प्रपंचातली असो वा परमार्थातली !

*

आपल्याला आध्यात्मिक किंवा पारमार्थिक जीवन नवीन नाही. आपल्या त्याविषयीच्या कल्पनासुद्धा चांगल्या ठसलेल्या असतात. मनुष्य काही आध्यात्मिक बनणार, तसं जीवन जगणार म्हणजे आता त्याचं प्रापंचिक जीवन सोडणार. वेगळं काही पवित्र वगैरे जीवन जगणार. कदाचित अजून लग्नकार्य व्हायचं असलं तर हा बहुधा संन्याशी राहील किंवा त्यानं लग्न करणं बरोबरच नाही ठरणार. कारण पुन्हा हेच की, त्याला आध्यात्मिक जीवन जगायचं आहे. आध्यात्मिक जीवनाच्या आपल्या कल्पना फार ठोकळ आणि इतक्या दृढमूल आहेत की, त्यामुळंच आयुष्यात संघर्ष वाढत आहेत.

या कल्पना इतक्या जुन्या व लादल्या गेलेल्या आहेत की, कुणाला भले आध्यात्मिक जीवनाची आवड असेल, त्यातलं तथ्यही पटलं असेल तरी त्याच्या नेहमीच्या जीवनाचाच तो भाग आहे हे लक्षात येत नाही. माणूस आध्यात्मिक आहे आणि तो आइस्क्रीम खातो आहे, सामान्य माणसासारखा शर्ट-पॅन्ट घालतो आहे, कधी संगीत ऐकतो-चित्रपट पाहातो आहे, इतर सामान्य माणसांसारखा गादीवर झोपतो आहे, त्याचं लग्न झालं आहे, त्याला एक-दोन मुलं आहेत, त्याचं स्वतःचं इतरांसारखं घर आहे - असं काही आपल्याला पटतच नाही.

अशा तथाकथित आध्यात्मिक व्यक्तीनं पंचा नाहीतर लंगोटी लावून राहावं, निदान साधे पांढरे कपडे घालावेत, कांबळं नाहीतर चटईवर झोपावं, संगीत-चित्रपट-विवाह-स्त्री सर्व वर्ज्य करावं, विचारसुद्धा करू नयेत, कारण ते जीवन वेगळं, हे वेगळं. कृष्णजी बोट ठेवीत आहेत ते जीवनाच्या खऱ्या स्थितीवर, खऱ्या आध्यात्मिकतेवर. ते म्हणत जीवनाचे असे कृत्रिम भाग पाडणं चुकीचं आहे, ते मानसिक संघर्षाला आमंत्रणच देणं आहे. हा अनुभव अशा तऱ्हेनं प्रत्यक्ष जगणाऱ्या कित्येक लोकांना आलेला आहे, येतही राहील. कृष्णजींच्या पुस्तकांतून अशा किती तरी दुर्दैवी व्यक्तींच्या भेटी व त्यांचे वृत्तांत आपल्याला दिसून येतील.

जीवनाचे दोन कृत्रिम भाग पाडून जगायला गेलं तर असहज आणि कृत्रिम

जीवन वाट्याला येतं. प्रथम हे समजून घेऊ की आध्यात्मिक जीवनाला इतकं असं वेगळं स्वरूप का आलं. मनुष्य इंद्रियाधीन होऊ नये, पूर्ण स्वार्थी, विकाग्रस्त होऊ नये, ऐशआरामानं त्याचं नुकसान होऊ नये, तो भोगलोलुप होऊन समाजाचं स्वास्थ्य हरपू नये अशा काहीशा उद्देशानं साधेपणा, विकारांना अटकाव करणारी किंवा अवाजवी स्थान न देणारी विचारप्रणाली मुळात रूढ झाली. त्यात प्रत्येक व्यक्तीगणिक मनाच्या ठेवणी वेगवेगळ्या असतात. एखाद्याला मुळातच विवाह आणि त्यासंबंधित सर्व गोष्टींची खरंच आतून आवड नाही, ओढ नाही, उलट आपल्या सर्वच शक्ती ईश्वरी कामाला वापराव्या अशी प्रबळ प्रेरणा, तीही सहजतेनं असली तर अशांनी संन्यस्त जीवन स्वीकारणं, असा काहीसा ढाचा पुढं आला. इथंवर काही तथ्य त्यात होतं. पण त्यातून जर जीवनाचेच दोन भाग आपण पाडू लागलो तर मग मात्र असहजतेचे प्रश्न निर्माण होतात, पारमार्थिक जीवन, साधकाचं जीवन म्हणजे काय असे मूलभूत प्रश्न साहजिकच निर्माण होतात.

याचा परिणाम असा की, आध्यात्मिक, संन्यस्त अशा जीवनाचा अर्थ फार ताणला गेला. तीच अवस्था प्रापंचिक जीवनाची झाली. प्रापंचिक म्हणजे सर्व सुखोपभोगात बुडून जायला मोकळा असलेला आणि पारमार्थिक म्हणजे थोडी फार खाण्याबिण्याची सहज इच्छा झाली तरी एवढं तेवढं सुखही मनाविरुद्ध जाऊन नाकारणारा असे भाग पडून गेले. ते दोन्हीही हानिकारकच ठरले. प्रपंचात बुडून जाणाऱ्याला इतरांची काळजी उरली नाही, तो कुठल्यातरी आयडॉलप्रमाणं स्वतःला घडवण्याचा अकारण न संपणारा प्रयत्न करीत राहिला. त्याच्या वाट्याला, ते सारं अशक्य असल्यानं सततच मानसिक संघर्ष व अशांती आली.

तिकडं तथाकथित आध्यात्मिक माणसाचेही कुणी आयडॉल आहेत. तो स्वतः कसा आहे, त्याची ती कुवत आहे की नाही यापेक्षा ते होण्याच्या प्रयत्नात त्याच्या वाट्याला तर आणखीच अशांत जीवन आहे. कारण बाहेर साधं राहायचं, कफनी चढवायची, आतून चांगलं खाण्यापिण्यापासून सर्वच नैसर्गिक इच्छा रोज मारून टाकीत असहज जगायचं. जोवर हे अंतर्गत संघर्ष संपत नाहीत तोवर खरी शांतता नाही, कुणी आयडॉलही होता येत नाही. प्रपंचातही परत फिरता येत नाही, अशी अधांतरी परिस्थिती अनेकांच्या वाट्याला येते.

म्हणून कृष्णजींनी ओघात सुचवलेली दोन महत्त्वाची सत्यं साधकांनी जरूर

लक्षात घेण्यासारखी आहेत. पहिलं म्हणजे मुळात जीवन ही एकसंध वस्तू आहे. तिचे असे विभाग करणं अनैसर्गिक आहे. त्यामुळं मानसिक संघर्ष उद्‌भवतात. शिवाय जशी शरीराला खाण्याची, पाण्याची गरज आहे तशाच इतर भावना, काही प्रमाणात वासना आणि समाजभावना यांनाही स्थान आहे. निसर्गानुकूल राहाणं चांगलं. त्यानंही या साऱ्या गरजांचं स्थान वयानुसार आपोआप बदलत असतं. ते बदलत असावं. अशा समजूतदारपणामुळं संघर्ष कमी होतात. आध्यात्मिक म्हणजे काही वेगळं व्हावं लागत नाही. समजूत, करुणा, सहानुभूती, प्रेम - यांनी बनलेलं अध्यात्म हे प्रापंचिक नव्हे सर्वच जीवनाला गरजेचं आहे, जीवन आनंदी करणारं आहे. एखादा स्वभावतःच संन्यस्त असेल तर त्याला त्यासाठी कुठं जावं लागणार नाही, तेच जीवन इथं इतरांबरोबर सहजतेनं जगेल.

दुसरं महत्त्वाचं तत्त्व म्हणजे खरं पारमार्थिक जीवन म्हणजे मानसिकदृष्ट्या संघर्षरहित जीवन. अमुक व्हायचं, अमक्यासारखं व्हायचं, अमुक अमक्यासारखं मिळवायचं असल्या काल्पनिक ध्येयांनी आपली फरपट होते. हे साठ टक्क्यांच्या मुलाला नव्वद टक्के मिळवण्याची अपेक्षा धरून साठांचा आनंद घालवून मानसिक संघर्ष नि निराशा पत्करायला लावल्यासारखं आहे. असं संघर्षमुक्त होणं म्हणजे गंजून जाणं नाही, ध्येयच नसणंही नाही. पण अकारण फिल्मी जीवनाची स्वप्नं बघणंही नाही आणि अकारण महत्त्वाकांक्षेचे ताणही नाहीत.

मग वेगळं आध्यात्मिक वगैरे जगावं, व्हावं लागत नाही. आपल्या साऱ्यांचंच जीवन आपल्या आपल्या ठिकाणी सहज, सुंदर व खऱ्या आध्यात्मिकतेचा सुगंध देणारं जीवन होऊ शकतं. फक्त त्यासाठी खरं पारमार्थिक जीवन कोणतं त्याचा आणि स्वतःचा शोध घेत असायला हवं !

*

१३. भक्ती म्हणजे अदाकारी नव्हे !

देव-धर्म-अध्यात्म या विषयी किती वेगवेगळ्या आणि बहुधा संस्कारबद्ध, चुकीच्या कल्पना माणसं करीत असतात. नुसत्या करतात नव्हे तर तसं ते आयुष्यभर जगतात. शेवटी कुठंतरी जाग येऊन हताश होऊन जातात किंवा खूप काही केल्याच्या भ्रमातसुद्धा त्यांची अखेर होते, हे विस्मयकारक आणि खेदकारक असतं. अनेकदा आपल्या कल्पना वेळीच स्पष्ट न झाल्यानं ते घडतं. कुणा विशिष्ट माणसाची चूक नसते. पण कुणाची चूक नसताना अपघात होऊन अखेर नुकसानीला तोंड द्यावं लागतं तसं होतं. इथं हे प्रमाण खूप मोठं असतं, सार्वजनिक असतं हे कृष्णजी लक्षात आणून देत आहेत.

माणसांची ठेवण मुळात प्रापंचिक असते. मनावरचा संस्कार-ढाचा बाहेरच्या प्रचलित समाजरचनेप्रमाणं विचार करीत जाण्याचा असतो. जी विचारांची स्वतंत्रता व्यवहारात गरजेची असते तीसुद्धा या साचेबद्धपणामुळं उरत नाही. त्याचे अनेक परिणाम होतात. त्यांतला एक म्हणजेच भक्तीच्या, अध्यात्माच्या संबंधातले कार्यक्रम हा आहे. वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम, फंक्शन्स, घरगुती सोहळे करण्याची माणसांना सवय असते. त्याची पातळी सर्वांनी मिळून एकत्र येऊन काही तास-दिवस राहाणं, कुठला सण, उत्सव, लग्नकार्य साजरं करणं अशी असते. याला मनुष्य सरावलेला असतो.

इतरत्र अशी माणसं संगीताच्या मैफिलींसाठीही अशीच मनोरंजन म्हणून जातात, नाटकाला जातात, एकपात्री प्रयोगांना जातात, ऑर्केस्ट्रासारख्या कार्यक्रमांना जातात. लोक तिकिटं काढून आलेले असतात. कधी कुणी एखादा कार्यक्रम आयोजित करतं. पण त्या त्या कलाकारावर आपली कला पेश करणं, अदाकारी करणं, लोकांना जिंकून घेणं, वेळी खूश करणं महत्त्वाचं असतं. त्या कलाकाराचाही तो प्रयत्न असतो आणि प्रेक्षक-श्रोत्यांचीही ती अपेक्षा असते. त्यात येणारी कृत्रिमता खटकणारी असली तरी सर्वांच्याच मनाला अशा पेशकारीची, अदाकारीची बऱ्यापैकी सवय झालेली असते.

तिथं प्रश्न असला तरी तो फारसा येत नाही. वास्तविक तिथंही कार्यक्रम मनापासून, सहजतेनं करणाऱ्या मनाची आणि त्याला सामोरं जाणाऱ्या प्रेक्षकांची खरी गरज असते. पण क्षणभर तो प्रश्न इथं बाजूला ठेवला तरी मुळात हा जो सादरीकरणाचा मनाचा ढाचा तयार होतो, त्यात यशस्वी होणं, होण्याची अपेक्षा इतरांनी बाळगणं - हे ढाचे मात्र पुढं भक्ती करताना कसे आड येतात आणि त्यामुळं कसं नुकसान होतं हे पाहाणं कुणाही साधकाला गरजेचं आहे. कृष्णजी त्यावर विशेष लक्ष द्यायला का सुचवतात तेही समजून घेणं गरजेचं आहे.

आपण प्रत्यक्ष उदाहरण पाहू. एखाद्याचा गायनाचा कार्यक्रम आहे. त्यात सिनेगीतांपासून शुद्ध शास्त्रीय गायनापर्यंत काहीही असू शकेल. पण तो कार्यक्रम संपला की तो विचारतो, कसा काय वाटला कार्यक्रम ? मध्येसुद्धा एखादी जागा घेईल, स्वर लावेल तो इतक्या अपेक्षेनं की कुणी वाहवा द्यावी, टाळी वाजवावी. अनेक गायक, वादक तर टाळी मिळाल्याशिवाय त्या स्वरामधून, रचनेमधून बाहेरही येत नाहीत. पुढं जायला तयार होत नाहीत. तीच नंतरची अपेक्षा, फक्त मध्ये या स्वरूपात व्यक्त होते. हेच एखादा प्रवचनकारही संपल्यावर अपेक्षा करतो, संयोजकांना विचारतो की कसं काय वाटलं माझं प्रवचन ? तेच एखादा अभंग म्हणूनही दाद द्यायची अपेक्षा करतो. मनाचा ढाचा तोच असतो. मग हा कार्यक्रम आणि तो कार्यक्रम यांत फरक उरत नाही. परिणामातही नाही. वास्तविक प्रवचन, कीर्तनानं श्रोत्यांचं चित्त तर धुऊन स्वच्छ व्हावंच पण मुख्यतः स्वतःचं चित्तही धुऊन जावं, स्वच्छ व्हावं तर त्याला खरं भजन, खरं प्रवचन म्हणता येईल. मग ते आध्यात्मिक म्हणता येईल. तसं असेल तर मग असली वर म्हटली तशी विचारणा या कार्यक्रमानंतर होणार नाही. इतकंच नव्हे तर हा कार्यक्रम उरणारच नाही. कारण ती पेशकारी, अदाकारी नाही. ती भक्ती आहे. ती उपासना आहे.

पण हा फरक लक्षात न आल्यानं इतर कार्यक्रम सादर करणाऱ्यानं श्रोत्यांना खूश करायला जावं तसे भजन-प्रवचनवालेही करू जातात, लोकही अपेक्षा करतात. करूद्यात पण मग ती भक्ती नव्हे. भगवंताशी कुणाचाच संबंध उरला नाही. ना भजन म्हणणाऱ्यांचा, प्रवचन करणाऱ्यांचा, ना श्रोत्यांचा. हे तर एकमेकांना खूश करण्याचं प्रापंचिक काम झालं. म्हणून मग वर्षानुवर्षं हे सारं करून-ऐकूनही दोघंही होते तिथंच असतात. म्हणून हा सारा फरक ओळखण्याची कृष्णजींची सूचना खऱ्या साधकाला

पुढं जायचं असेल तर फार उपयुक्त आहे.

याच बाबतीत कृष्णजी आणखी एक गोष्ट सुचवतात तीही लक्षात घेण्यासारखी आहे. ते म्हणतात कलेमध्ये कौशल्य जरूर आहे. त्याची गरज आहे. मी व्हायोलिन हातात घेणार असेन, पियानोला हात लावणार असेन तर ऐकणाऱ्याला खिळवून ठेवील असं कौशल्य जरूर संपादन करावं. पण हे लक्षात ठेवावं लागेल की त्या त्या कलाकाराच्या आयुष्यातला किती थोडा भाग त्या व्हायोलिननं नि पियानोनं व्यापला आहे ! त्याचं बाकीचं आयुष्य तसंच अप्रगत, अकुशल पडलेलं असतं आणि याची त्याला जाणीवही नसते.

इतर वेळी तोच कलाकार मनानं सामान्य किंवा त्यापेक्षाही खालच्या पातळीवर येतो. इतरांचा द्वेष, मत्सर करतो. तापट असतो. कधी व्यसनी असतो. लहरी असतो. अहंकारी असतो. व्यवहार पाळीत नाही. कलाकार कलंदर असतात, विक्षिप्त असतात अशी उभयपक्षी समजूत करून घेऊन ते खपूनही जातं - तसंच आयुष्य घालवलं जातं. पण कृष्णजी म्हणत हे म्हणजे केवढ्या तरी मोठ्या शेतातल्या एखाद्या तुकड्याची मशागत केल्यातला हा प्रकार आहे. कलेपुरतं व्यक्तित्व खोल जातं, उंचीवर जातं. बाकी सारं जीवन उथळ, जमिनीवरचं, सामान्य असतं.

याची जाणीव झाली, याचं खरेपण कळलं तर तीच अवस्था गाण्यापुरतं, प्रवचन, निरूपण, भजनापुरतं उच्च जाण्याला लागू आहे हे लक्षात येईल. मग बाकीच्या जीवनाचीही, त्यांतल्या कृतींचीही तितकीच मेहनतीनं मशागत होईल. मग भक्तीही अदाकारी उरणार नाही. व्हायोलिन वाजवण्यापुरतं जीवन उच्चतर राहणार नाही. सर्वच जीवन तसं होईल. मग लक्षात येईल की, आता अदाकारीचीही गरज उरली नाही आणि कुठलंही संगीतासारखं क्षेत्र काय आणि भक्ती काय दोन उरली नाहीत. सारी जीवनंच उच्च आहेत, एकच आहेत !

*

१४. आध्यात्मिक चौर्य

लहानपणापासून जर आपल्याला कोणती गोष्ट नियमानं शिकवली जात असेल तर ती म्हणजे अनुकरण. दुसऱ्या एखाद्यानं केलेली गोष्ट बघून आपण ती तशी करावी असं शिक्षणच आपल्याला आहे. पहिलंवहिलं शिक्षणही आईवडिलांकडं बघूनबघून होत असतं हे खरं. शब्द, भाषा, उच्चार, अर्थ अशा प्रक्रिया अशा अनुकरणापासून दिल्या घेतल्या जातात. खेळ, कौशल्य अनुकरणातून शिकली जातात. एका छोट्याशा मर्यादेतलं हे 'अनुकरणा'चं प्रकरण पुढं एवढं मोठं असेल अशी कल्पनाही नसते. शब्द शिकून होतात. मग कुणाचं हस्ताक्षर सुमार, कुणाचं चांगलं, कुणाचं उत्कृष्ट असा फरक दिसायला लागतो. मग जागरूक पालक सावध होऊन मुलांना तू त्याच्यासारखं अक्षर काढ म्हणून पिच्छा पुरवतात. त्याच्या हातात बसलेलं वळण काही केल्या सुधारत नाही. बदललं तर चुकूनच. बदललं तर दोघांची अक्षरं एकसारखी होऊन त्यांचा स्वतंत्रपणा जातो. कळण्याची खूण जाते. तसंच राहिलं तर आपण ज्याचं त्याचं अक्षर 'त्याचं म्हणून' ओळखू शकतो. ते त्यांचं स्वतःचं, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचं प्रतिनिधित्व करणारं अक्षर असतं. याचा अर्थ अक्षरं चांगली असू नयेत असं नाही, त्यासाठी प्रयत्न करू नयेत असंही नाही पण अक्षरांतही स्वातंत्र्य असतं, असू शकतं, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

पण या सगळ्यात ज्यांची अक्षरं 'सुधारली' नाहीत त्यांचे आईवडील मात्र अस्वस्थच राहातात. मग इतर मुलांशी तुलना करून ते बाकीच्या गोष्टी शोधू लागतात. मग मुलांचा व्यायाम. तो तू त्याच्यासारखा कर. तो जातो त्याच जिमला जा. त्याच टँकवर पोहायला जा. शाळा शक्यतो तशा हुशार मुलांचीच मिळावी म्हणून ते धडपड करतात. मग त्या त्या बाबतीत त्यांचं, त्यांचं यांनी अनुकरण करावं असा तगादा सुरू होतो. आपला मुलगा 'समजून' घेण्याचं काम कुणीच करत नाही. अशा वेळी कृष्णजींचं एक म्हणणं व्यवहारात आणि साधनेतही जरूर लक्षात ठेवावं की अनुकरण ही चोरी आहे.

एखाद्यानं एखादी गोष्ट केली म्हणून तशी ती करण्याचा आपण प्रयत्न करणं

ही आपल्याकडं ती गोष्ट नसण्याची कबुली आहे. नाही तरी जी गोष्ट आपण चोरायला जातो ती आपल्याकडं नाही म्हणूनच. अनुकरण ही ती ती कौशल्यं आपल्याकडं नाहीत म्हणून त्यांची कॉपी करणं, नक्कल करणं म्हणजे ती चोरणंच आहे. पुढं मोठमोठ्या प्रमाणावर मोठेपणी असला चोरीचा मामला अनुकरणातून सुरूच राहातो. कुणी कुणाच्या गाण्याचं अनुकरण करतो, कुणी कुणाच्या कपड्यांचं-वेषभूषेचं अनुकरण करतो, कुणी कुणाचे कल्पना-विचार चोरतो-स्वतःच्या नावावर खपवतो, कुणी गुरूसारखं वागायचा, प्रयत्न करतो, कुणी तसला वेष-तसला मठ-गादी स्थापन करतो. देवळासारखी देवळं बांधतो, पण हे कुणी ध्यानात घेत नाही की कृष्णजी म्हणतात ही सारी चोरी आहे आणि त्यात तथ्य आहे.

सत्य हे आहे की, माझ्याकडं माझं गाणं नाही, माझे कल्पनाविचार नाहीत, माझं गुरुत्व नाही, माझा देव नाही, माझं देऊळही नाही. आपलं आतलं पोकळपण लपवण्याचा हा त्यांतल्या त्यांत सोपा मार्ग आहे. दुसऱ्यासारखं एखादेवेळेस गाऊन दाखवता येईल, बोलून दाखवता येईल - पण ते तेवढ्यापुरतं असावं. नक्कल ही एक कला आहे आणि तीही आपल्याला येते, एवढं दाखवण्यापुरता त्याचा उपयोग आहे, हे खरं. पण ते एवढं आणि एवढंच ठीक आहे. मुळात आपलं खरं व्यक्तित्व शोधण्याची गरज आहे.

पण हे कधी अशा स्तरावर नसतं. बाजारात कुठलंही दर्जेदार उत्पादन आलं - पेनपेन्सिलपासून अगदी तूपलोणच्यापर्यंत काहीही - की त्याचं अनुकरण सुरू होतं. कुठं गिऱ्हाईक फसावं म्हणून बाह्य आवरणातसुद्धा कोरून तसं बनवलं जातं. कायद्यात सापडू नये म्हणून नाव दिसायला तसं पण स्पेलिंगमध्ये एखाद्या अक्षराचा फरक केला जातो. पण पेन त्या दर्जाचं बनवता येत नाही, लोणचंसुद्धा त्या दर्जाचं बनवता येत नाही.

वास्तविक ही गोष्ट चोरी तर आहेच पण ती आपलं अंतर्गत, मनाचं, कुवतींचं, क्षमतांचं दारिद्र्य दाखवते. त्याचा शोध घ्यायची गरज आहे. असं दारिद्र्य आपल्या वाट्याला का आलं म्हणून जसा एखाद्या दरिद्री माणसानं आपल्या जीवनाचा शोध घ्यावा - चोरीमारी करू नये असं आपल्याला वाटतं तसं अशा प्रापंचिक काय, आध्यात्मिक काय चोऱ्या करू नयेत - अनुकरण करू नयेत असं वाटणं आवश्यक आहे. पुढं योग्य त्या कृती करणं आवश्यक आहे. मग त्या कृती व्यक्तित्वाची खरी

सुधारणा, प्रगती घडवून आणतात. दरिद्री माणसाला जसा कुठला तरी व्यवसाय जमू शकतो. भले तो शरीरकष्टाचा असेल. त्यातही व्यवस्थित काटकसरी राहणीमान ठेवून जमणारा एखादा उद्योग, नोकरी करून कष्टानं हळूहळू चार पैसे तो मिळवू शकतो. आपली परिस्थिती चोरीतून नव्हे स्वकष्टानं, स्वतःच्या कुवतीनं सुधारतो. तसा असा प्रापंचिक माणूस काय किंवा आध्यात्मिक माणूस काय स्वकष्टानं, खऱ्या साधनेनं, स्वतःच्या कुवतीला मानवणारी साधना करून - आपली परिस्थिती सुधारू शकतो.

त्याला संस्कृत कळत नसेल तर प्राकृत ग्रंथ वाचील, तेही नसेल तर बाळबोध, समकालीन ग्रंथ वाचील, तेही नसेल कुणाचं मार्गदर्शन घेईल, आपली कुवत शोधून काढील, त्याला जमणारं शोधून काढील, ते मनःपूर्वक करील तर जरूर प्रगती होईल. साधनेच्या बाबतीत निदान हे अनुकरणाचं चौर्य आपण कटाक्षानं टाळून एका धोक्यापासून मुक्त होऊ. एका उथळपणापासून मुक्त होऊ. सुदैवानं स्वतःचा अभ्यास करण्यासारखं उत्तम साधन नाही. ते तरी चौर्य नाही. स्वतंत्र काम आहे. व्यक्ती स्वतंत्र आहे. आपला अभ्यास आपण स्वतःच करावा. नाहीतरी स्वतःला आपल्या स्वतःपेक्षा अधिक चांगलं कोण जाणतं ? त्यामुळं ते अधिक मूलभूत काम आहे. त्यातून आपल्या क्षमता, चुका, कुवती, गरजा खऱ्या कळतील. मग त्यांचा मेळ घालून आपलं साधन आपण निवडून, ठरवून करू तर ते चौर्य होणार नाही. साधनेची विधायक कृती होईल.

अशा अभ्यासात आपण उगीच कुणासारखं बनण्याचं फॅडही डोक्यातून जाईल, त्यामुळं वाट्याला येणारं दुय्यम प्रतीचं जीवन, ज्याला कृष्णजी एक प्रकारचा भ्रष्टाचारच म्हणत, तेही टळेल. मग खऱ्या शुद्ध साधनेनं अंतःकरण निर्मळ होईल, शुद्ध होईल. स्वतःला जसे आहोत तसे स्वीकारायला तयार होईल. त्या प्रामाणिकपणामुळं देवही आपल्याला आहोत तसे स्वीकारायला तयार होईल. मग जीवन खरं सार्थकी लागेल !

*

१५. दुसऱ्या तुरुंगाकडं

एका मुलानं एकदा कृष्णजींना विचारलं की दुसऱ्या धर्माबद्दल चांगलं बोलतो, तो स्वीकारावा असं मला वाटतं, असं म्हणतो तेव्हा माझे आईवडील माझ्यावर एवढे का संतापतात ? प्रथमदर्शनी येणारं उत्तर कृष्णजींनी दिलंच आहे की, त्यांना स्वतःचा धर्म योग्य वाटतो, ते त्यानं बांधले गेले आहेत. साहजिकच त्यांच्या मुलांनीही तेच करावं असं त्यांना वाटतं. आपल्या मुलांनीही त्या धर्मात सांगितल्याप्रमाणं प्रत्येक गोष्ट करावी असं त्यांना वाटतं, ते आपण करायला तयार नाही म्हणून ते रागावतात, हे उघडच आहे.

मुख्य प्रश्न त्यांनी मुलाला पुढं विचारला आहे की, मुळात तुला धर्माची नेमकी गरज का वाटली आहे, याचा विचार कधी केला का ? एक सोडून दुसऱ्यात जाणं यात फार मोठा प्रश्न नाही. फार विचार करण्यासारखं काही नाही. दुसरा धर्म किंवा नाव हा गौण मुद्दा आहे. याच संदर्भात ते म्हणाले, असले बदल म्हणजे एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगाकडं जाणं आहे, हे आपल्या लक्षात आलं आहे का ? याच्यापेक्षा तो बरा वाटतो हे कदाचित बरोबर असेल पण मुळात त्याचे आपण तुरुंग बनवले आहेत हे लक्षात घेतलं आहे का ?

या साऱ्यात मूळ व्यक्तीचं काय होतं आहे याची आपल्याला कल्पना आहे का ? मनुष्याला मनानं व्यापक, विशाल, उन्नत बनवण्यासाठी काही तत्त्वं चिंतनानं, प्रयोगानं शोधून मुळात समोर ठेवली गेली. ती शोधणारे उदारमानस होते. मनुष्यमात्राच्या, विश्वाच्या कल्याणाचा विचार करणारे होते, सत्यदर्शी होते. पण हळूहळू सोयीसाठी खरी तत्त्वं एकत्र करण्याचे प्रयत्न झाले, ती पाळणारे एकत्र करण्याचे प्रयत्न झाले.

मग मानवी स्वभावाला वाव मिळून त्यांच्यावर हक्क आले, शब्दांना महत्त्व आलं, अर्थ लोपला, त्या त्या गोष्टींमागचा भाव लोपला, बदलक्षमता गेली, काळाशी सांगड गेली, शब्दपंडितांची अज्ञानी लोकांवर पकड आली, ते न मानणाऱ्यांना वेगळं ठरवण्यात आलं, आधी वळवून, मग सक्तीनं अनुयायी करण्याचे प्रयत्न सुरू झाले, अंतर्गत वापर, अन्याय सुरू झाले, फाटफूट, विद्रोह मग एक कडेकोट तुरुंग-

म्हणजे काही विशिष्ट नाव असलेला धर्म झाला. अनेकदा त्यातला आचरणाचा भाग हरवला. शब्द-संघटना-लढाया-कवायतींचा सांगाडा उरला. प्रत्येक धर्माची थोड्याफार फरकानं हीच अवस्था झाली. जगाच्या इतिहासात मग आचरणाची तत्त्वं सांगायला उरली नि धर्मांच्या-कृष्णजींच्या शब्दांत तुरुंगांच्या-नावावर जगातले सर्वांत जास्त संघर्ष अन् रक्तपात नोंदले गेले.

म्हणून कृष्णजींचं म्हणणं थेट, स्पष्ट आणि त्यामुळंच अस्वस्थ करणारं वाटलं तरी विज्ञाननिष्ठ युगाला ते अधिकच विचार करायला लावणारं ठरणारं आहे. मूळ दया, त्याग, क्षमा, शांती, करुणा, सहानुभूती, प्रेम - अशा असंख्य उन्नत तत्त्वांना कुठल्या धर्माचं लेबल असण्याची गरज मुळात शंकास्पद आहे, हे विचार करण्यासारखं आहे. तहानलेला माणूस कुठल्या धर्माचा असतो आणि पाणी घेऊन तहान शमवणारा कुठल्या धर्माचा असतो, ते फक्त माणुसकीच्याच धर्माचे नव्हेत काय ? मग यात श्रेष्ठ-कनिष्ठ नि बदल करण्याजोगं काय उरतं ?

शांती ही वैयक्तिक स्वास्थ्यासाठी जगण्याचं मूल्यच आहे. तिला कुठला धर्म कधी असतो ? मलाच त्या शांतीची गरज आहे. माझ्यात शांती मूलतः आहे. ती मी ज्या कारणांनी बिघडवली किंवा ज्या कारणांनी इतरांकडून बिघडवली जाते, मी बिघडू देतो, ती शोधून दूर करणं हे माझं खरं गरजेचं आचरण आहे. त्यासाठी खरं तर कुठल्या धर्माच्या नावाची गरज नाही.

कृष्णजींच्या म्हणण्यामागचा भाग समजून घेतला तर लक्षात येतं की, खरंच आपण नुसतंच प्रत्येक धर्मात जगावर प्रेम करण्याचे मंत्र म्हणतो, उपदेश करतो, ऐकतो, प्रवचनं ऐकतो पण प्रत्यक्ष कृतीत सर्वत्र दुष्काळच असतो. जगावर राहू दे, घरातल्या जवळच्या माणसावरसुद्धा अनेकांचं मनापासून प्रेम नसतं, शेजाऱ्यावर नसतं-असतो तो साधा एकमेकांच्या गरजेपुरता व्यवहार. तो एकमेकांचा असतो. मग या शाब्दिक धर्माला किती अर्थ उरेल ते आपण जाणू शकतो.

याचा अर्थ असा नव्हे की मुळात धर्मच त्याज्य किंवा टाकाऊ आहे. बिनगरजेचा आहे. त्यातला आचरणाचा गाभा मोठा आहे तो मिळवणं महत्त्वाचं आहे. हे काम कुठल्याही धर्मातल्या प्रत्येक व्यक्तीचं आहे. नाहीतर असंख्य कालबाह्य पद्धती, विचार, अवडंबरं, व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव, उलट क्षुद्र मनोवृत्तींना खतपाणी - असला तुरुंगवास म्हणजे संघटित धर्म असं होऊन बसेल. ज्यात माणुसकी,

समता, सहृदयता, निरपेक्ष प्रेम, विलक्षण समजूत, क्षमाशीलता, त्याग - अशा खऱ्या आचारमूल्यांचा कधीच ऱ्हास झालेला असतो.

आपल्या लक्षात येईल की, हीच गोष्ट पंथ आणि संप्रदायांचीही झाली आहे. त्यातसुद्धा स्वतःचं वेगळेपण जपण्यासाठी उजवीकडची वस्तू डावीकडे, उभी वस्तू आडवी ठेवण्यानं जणु काही देव हाती येणार आहे - असल्या बालिशपणापोटी अनेक पंथ आपापलं वेगळेपण टिकवण्याचे प्रयत्न करताना दिसतात. तेव्हा कोणत्याही साधारण बुद्धिमान माणसालाही हे सांप्रदायिक बदल-वेगळेपण हेही आत्मा हरवलेल्या शरीरासारखं आहे, त्यांतले बदल करायला जाणं-एका पंथातून दुसऱ्या पंथात, संप्रदायात जाणं म्हणजेसुद्धा अशाच एका निर्जीव तुरुंगातून दुसऱ्या निर्जीव तुरुंगाकडं प्रवास आहे, हे लगेच लक्षात येतं.

वास्तविक कृष्णजींनी म्हटल्याप्रमाणं कुठल्याही धर्माचं लेबल न लावता, खरं तर स्वतःचं तटस्थ निरीक्षण करणं, भूतकाळाची ओझी आणि भविष्यकाळाच्या काळज्या यांच्यापासून पूर्ण मुक्त राहून स्वतः वर्तमान जीवनातलं कर्म उत्कृष्ट, मनःपूर्वक करणं हे खरं धार्मिक जीवन आहे. मग त्यात सर्व धर्मभेद दूर झाले, खरा धर्म झाला, मनोयोग झाला, खरं जीवन आलं आणि खरं प्रेमही व्यक्त झालं. त्याची साधकांना ओळख असणं आणि तसं जगणं याची गरज लक्षात येऊ शकेल. अशा मुक्त पण विधायक, जबाबदार जगण्यानं राहणारी नित्य प्रसन्नता, साधकांनाच काय कुणालाही किती महत्त्वाची आहे, हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही !

*

१६. एक समर्थ, अत्यावश्यक नकार

माणसाकडं स्वीकार, नकाराच्या कुवती आहेत. तो त्याचा वापरही करीत असतो. पण त्यामागचा साराच विचार नकळत स्वार्थाचा, सोयींचा असतो. विशेषतः आपल्याआपल्या मनाच्या ठेवणींनुसार हे नकार-स्वीकार सुरू असतात. स्वतःला फिरायला जायचं आहे. बाहेर खायला-प्यायला जायचं आहे. त्यात कुणी तसं विचारलं की, आत्ता त्याची गरज असो, नसो किंवा काही वेळा त्याचा त्रास होणार असो, मनुष्य नकार देत नाही. तुम्ही म्हणता तर जाऊया म्हणतो. पुन्हा त्यांच्यामुळं मी तयार झालो अशी मनाची समजूत करून घ्यायला तयार असतो.

वास्तविक नकार देणं ही एक प्रकारची, एका अर्थानं नकारात्मक वाटली तरी विधायक शक्ती आहे. बराच समाज भ्रष्टाचारात ओढला जात असला तरी भ्रष्टाचाराला नकार देणारे महात्मेच काय, सामान्य प्रापंचिक माणसंही आहेतच ना ! त्यामुळं खऱ्यावर, चांगुलपणावर विश्वास ठेवावा लागतोच ना ? त्या अनुभवामुळंच सत्यानं जगताना होणारा त्रास सहन करायचं बळही प्रामाणिक, सरळ, साध्या माणसांना मिळत असतं.

पण हाच नकार स्वतःच्या चुकीच्या मतांना, आग्रहांना, किंबहुना विचारपद्धतीतल्या दोषांना द्यायची वेळ आली तर ? समजा आपल्यावर अनेक प्रकारचे संस्कार लहानपणापासून चुकीचे होत आले. स्वार्थाचे झाले, संकुचितपणाचे झाले, स्वतःपुरतं पाहाण्याचे झाले, खऱ्या उपकारकर्त्या ईश्वराला विसरून स्वतःच्या नादात जीवन जगण्याचे झाले, त्याप्रमाणं आपण स्वतःही जगलो दुर्दैवानं आपल्या मुलांना, इतरांनाही तेच वळण लावलं - हे सारं आपल्या लक्षात आलं आहे. या संस्कारांची व्यर्थता कळली, खरं जीवन काय ते कळलं, खरं काय करायला हवं होतं ते कळलं. पण हे सारं पूर्वीचं नाकारल्याशिवाय तर बदलणार नाही. अशा वेळी एक समर्थ, बळकट आवश्यक नकार गरजेचा आहे. नेगेशन गरजेचं आहे. तरच हे थांबेल. खरं सुसंवादी, विधायक जीवन सुरू होईल.

पण हे केलं जाईल का ? तर आपल्या लक्षात येतं की ते अवघड आहे.

आपण वर्षानुवर्षं जपून ठेवलेली, आपला जीव अडकलेली वस्तू टाकायला मनानं नकार द्यावा, टाळाटाळ करावी तसं घडतं. एक तर आता आपण बदलण्याची आपल्याला भीती वाटते, इतर लोक काय म्हणतील याची भीती वाटते. नवं जीवन चांगलं असेल तरी तिथं तरी आपण सुरक्षित असू का याची अनामिक काळजी लागते. मग निर्णय लांबवायची, उद्यावर ढकलण्याची प्रक्रिया सुरू होते. शक्यतो आहे त्यातच सुधारणा, बदल करून जगता येईल का अशा पर्यायांचा विचार सुरू होतो. जुनं घर मोडकळीला आलं, गळलं, डोक्यात पडायला आलं, उतरवून नवं उभारायची गरज व कुवत असली तरी नव्याचा खर्च टाळण्यासाठी डागडुजी करून, ठेपे-टेकू देऊन एखादा सीझन काढायची केविलवाणी धडपड करावी तसं हे असतं. मनाला जुन्याचा लोभ आणि नवीन करण्यात रास्तपणे जाणाऱ्या पैशाचा लोभ सुटत नाही. मग धोका आणि फुकटचं कंजूसपणाचं प्रदर्शन होऊन जातं. तीच अवस्था स्वार्थी, संस्कारबद्ध जीवन नाकारताना होत असते.

तीच गोष्ट कुणी केलेल्या जुन्या अपमानांची, नुकसानींची, उण्यादुण्याची आणि त्यांच्या स्मृतींची आहे. कुणाची ती जुन्या मानसन्मानांची, पुरातन काळात जिंकलेल्या लढायांच्या आठवणींची असू शकते. दोन्हीही स्मृतींचा, भूतकाळाचा आज काही उपयोग नसतो. कालौघात ती माणसंही बदललेली असू शकतात, अपमानाचे बदले घेण्यानं नव्या वाईट संबंधांनाच आमंत्रण मिळतं. शौर्याचं म्हणाल तर आज तलवारच काय तांब्याभांडं उचलण्याची ताकद नसते. पण बिनगरजेचा, मृत भूतकाळ निर्धारानं नाकारण्याची गरज असते. तर आजच्या दिवसाचा, संबंधांचा, संधींचा आनंद घेता येणार असतो. पण अशा समर्थ पण अत्यावश्यक नकारालाही अनेक जण तयार होत नाहीत.

हेच भविष्याच्या काळज्यांचं असतं. आजचे प्रयत्न, संधींचा योग्य वापर एवढं पुरेसं असतं. तरीसुद्धा उद्या, परवा, दहा वर्षांनी स्वतःचं किंवा मुलांचं काय होईल याच्या विचारांची ओझी वागवण्यात आजचा सुंदर दिवस हातचा निसटतो. कदाचित त्यामुळं भविष्यकाळ आणखी बिकट होतो. हे कळत असूनही अशा भविष्यकाळात अडकण्याच्या मनाच्या प्रवृत्तीला ठाम नकार देण्याचं कामही अनेकांना जमत नाही. पण या साऱ्यांत कृष्णजी सुचवतात की नुकसान आपलंच असतं. भरून न येणारं असतं.

ते म्हणत की, अशा साऱ्या भूत - भविष्यापासून आणि मानअपमान, आठवणींच्या अकारण ओझ्यांपासून आपण मुक्त होतो तेव्हा आपला गुदमरलेला श्वास मोकळा होतो. खरं स्वातंत्र्य अस्तित्वात येतं. हा एक प्रकारचा विधायक मानसिक मृत्यूच असतो, पण तो मोठा प्रसन्न आणि जीवनदायी असतो. खरं तर संत असोत, साधक असोत वा सामान्य असोत त्यांना तो साधलेला असतो, असं जरूर आढळतं.

आपल्या साधनेतही हे सारं विशेष पूरक आणि लागू नाही का ? आपले कुणी सोबती, संतसांगाती, खरे गुरू असतील तर ते याकडं जरूर लक्ष वेधीत असतात. असली भूतकाळाची ओझी टाकून द्यायला सुचवतात. भविष्यकाळच्या काळज्या सोडून द्यायला सुचवतात. आजच्या सोन्यासारख्या संधीच्या दिवसाचं सहजतेनं, चांगल्यात चांगलं वागून चीज करायला सुचवतात. सारं पटतं. कधीकधी त्यांच्या संगतीत असलं म्हणजे असा वर्तमानातला दिवस तेसुद्धा किती मुक्तपणानं व्यतीत करतात, जगतात आणि त्यामुळं ते कोणत्या आनंदात असतात ते कळतं. स्वतःलासुद्धा त्या आनंदाचा स्पर्श झाल्याशिवाय राहात नाही. त्या निरुपाधिक आनंदाची झुळूकसुद्धा आपल्याला प्रसन्न करते. त्यामुळं त्यासाठी ते म्हणतात तसं किंवा स्वतःला पटतं म्हणूनही वर्तमानात जगायचं ठरतं.

पण मध्येच मनाच्या लक्षात येतं की ही केस हातची जाणार. हा आनंदी होणार, मग आपलं अस्तित्व, आपली पकड सुटली. त्यामुळं मन म्हणतं असं जगणं थोर माणसांनाच शक्य आहे, आपल्याला जमेल पण आज तरी नाही, आपण उद्यापासून असं चांगलं वागायला लागूया. अशा वेळी कृष्णजी म्हणतात हे काम उद्यावर ढकलण्यालाही द्यावा लागतो तो एक समर्थ अत्यावश्यक नकार. कारण काम झालं किंवा निदान सुरू झालं तर ते 'आज'च होणार असतं. उद्या कधीच उजाडत नाही !

*

१७. खरे धोके

माणूस संवेदनशील असतो. अत्यंत कठोर, कोरड्या वाटणाऱ्या माणसाच्या ठिकाणी जमिनीखालून झरा वाहावा तशी एक प्रकारची संवेदनशीलता प्रवाहित असते. आपण अनेकदा पाहिलं असेल की, एखादा कर्ता पुरुष काही वेळा कोरडा, शुष्क असतो. हास्यविनोद, प्रेमळपणा वगैरेंचं त्यांना वावडं आहे की काय अशी शंका यावी, असंच त्यांचं वागणं असतं. स्वतःच्या मुलांनासुद्धा कधी पटकन उचलून घेणार नाहीत, पाठुंगळीला मारणार नाहीत, खेळवणार नाहीत. त्यांचं व्यवस्थित होतं आहे ना याकडं मात्र त्यांचं बारकाईनं आणि करडं लक्ष असतं. पण पुढं त्यांचा मुलगा मोठा होतो. यांचं नातवंड घरी येतं. त्या वेळी त्यांच्यात कधी न दिसलेलं वात्सल्य नि कोमळपणाचा झरा प्रकट होतो. हे कठोर आजोबा आता नातवंडाच्या बाळलीलांत रमतात, त्यांच्या बाबतीत कोमळ होतात. संवेदनशीलता अशी कधी सुप्त, कधी सतत प्रकट असते.

तीच गोष्ट एखाद्या नुकसानीची घ्या. समजा एखादा व्यवहार आहे. त्यात आपल्या पदराला चाट बसणार, तोटा होणार हे लक्षात आलं तर मग मनुष्य त्याबाबतीत खूप संवेदनशील असतो. विशेषतः आर्थिक तोट्याचा चिमटा लगेच कळतो. मनुष्य सावध होतो. वेळी व्यवहार रद्द होतात, करार बारगळतात, इतकंच काय लग्नाच्या बैठका मोडून माणसं परततात. कारण यातला धोका थेट आहे.

पण कृष्णजी सुचवतात की असं दुर्गुणांच्या बाबतीत, विकारांच्या बाबतीत होतं का ? तिथंही तोटा आहे, नुकसान आहे. पण एरवी संवेदनशील असलेला माणूस अशा बाबतीत मात्र जणु काही त्याला कळत नाही, जाणवत नाही असा वागताना दिसेल. उदाहरणार्थ मत्सर घ्या, असूया घ्या. मत्सरानं आपलं मन कलुषित होतं. ती एक दुर्भावना आहे. मत्सरानं स्वतःच्या मनःशक्तीची हानी होते. मत्सरी माणसाचं मन आगीसारखं जळत असतं. ज्या व्यक्तीबद्दल तो वाटतो, ती व्यक्ती समोर आली की आग आणखीच भडकते. फायदा तर काहीच नसतो. उलट त्या व्यक्तीचं नकारात्मक चिंतन सुरू राहिल्यानं आपलाच वेळ फुकट जातो. शिवाय

मत्सर ताब्यात राहिला नाही तर त्या व्यक्तीला बेजबाबदारपणे काही बोललं जाऊन आपले एरवी सुरळीत असलेले संबंध बिघडतात. ती व्यक्ती समजूतदार असेल तर ठीक. ती हे लक्षात येऊन सोडून देईल. पण तेवढी समज नसली, तिथंही स्वतःवर नियंत्रण नसलं तर तिचे संबंध तुटतील. आपल्याला होऊ शकणारी संभाव्य मदत, एक संबंध गमवावा लागेल. साधनी माणसाच्या दृष्टीनं तर ही हानी जास्त मोठी आहे.

हे सारं नुकसान लक्षात येतं. तेवढा मनुष्य संवेदनशील नक्की असतो. एरवी पैपैच्या नुकसानीचा धोका न पत्करणारा मनुष्य या विकारांच्या हानी मोठ्या असूनही ओळखीत नाही. जर ओळखली तर, कृष्णजी म्हणतात तशी फक्त बौद्धिकदृष्ट्या जाणतो. वेळी कबूल करतो. दुसऱ्याला सांगतो. पण ते बौद्धिक आकलन असतं. खरं नि पूर्ण नसतं. म्हणजे असं की कृष्णजी म्हणत तसं रस्त्यानं चालताना वाटेत सळसळत जाणारा नाग आडवा आला तर मनुष्य संवेदनशील असतो, सावध होतो, बौद्धिकदृष्ट्या आकलन होतं, नुकसान कळतं, संभाव्य हानी कळते मग पुढं कृतीला किती वेळ लागतो ? अजिबात नाही. साधाच नव्हे तर आजारी माणूससुद्धा उडी मारील, पळत सुटेल, काठी उगारील - काय शक्य असेल ती कृती करील. कारण त्यानं धोका खरा नि पूर्णपणे ओळखला असतो, त्यामुळं कृतीला कुठलाही विलंब लागत नाही.

असं कुठं विकारांच्या बाबतीत होताना दिसत नाही. जो तो ते चांगलं नाही, करू नये, त्यांच्या आहारी जाऊ नये, ते परमार्थातले अडथळे आहेत, त्यांनी साधक काय, सामान्य माणूस काय, कुणाचीही हानी होते हे सगळं छान समजून घेतो, समजावून देतो. पण म्हणून आजपासून मत्सर सोडला, असूया सोडली, राग सोडला असं काही कुठं होत नाही. काही सन्मान्य अपवाद सोडता इतरांचा दुसरा दिवस पुन्हा विकारांसहच उगवतो. मग त्याला जे कळलं त्याचं काय झालं ?

शोधून काढावं लागतं. विकार नाहीसे होणं मनाला परवडणारं नसतं. कारण त्याचं बरचसं अस्तित्व त्यांच्या जोरावर टिकून असतं. त्याला ते टिकवायचं असतं, विकाररहित होण्यात, निदान विकार ताब्यात येण्यात, मनाला नष्ट तरी व्हावं लागतं, शुद्ध तरी व्हावं लागतं. नाही तर मन तरी माणसाच्या ताब्यात जावं लागतं. यांतलं कुठलंच मनाला परवडण्यासारखं नसतं. हे खरोखर आपल्याला आपलं मन जाणवूनही देत नाही.

उलट मनच वेगवेगळी समर्थनं उभी करतं. कारण आपल्यालाही नकळत विकारांत थोडं सुख मिळत असतं, मग मन म्हणतं सगळं जग स्पर्धेनं, असूयेनं, मत्सरानं भरलेलं असतं. मग मीच कशाला निर्मत्सर व्हावं, मी जगापासून वेगळा पडेन. उद्या मी राग सोडायचा ठरवला तर आपला दरारा राहील का, घरातली धंद्यातली, ऑफिसातली शिस्त बिघडून जाईल, अधिक महत्त्वाचं म्हणजे लोक माझा गैरफायदा घेतील - असे असंख्य विचार मन उभं करतं. मनाचा आणखीन एक मार्गही आहे. ते कुणा गुरूला गाठील आणि विचारील मी राग कसा सोडावा ते सांगा, गुरू कच्चा असला तर बिचारा सांगत बसेल, दोघांचाही वेळ चांगला जाईल, राग सुरक्षित राहील. वास्तविक जाणकार गुरूनं क्षणभर विचारावं की साप आडवा आला तेव्हा आता उडी कशी मारू म्हणून विचारायला आला होतास का ? ते कसं जमलं, तसंच हे जमव.

त्याही पुढचा मनाचा मार्ग म्हणजे राग काय, मत्सर काय, असूया काय एका दिवसाच्या गोष्टी नाहीत. आपल्यावर जन्मोजन्मीचे संस्कार आहेत. ते काय असे एका रात्रीत सुटणार आहेत का ? आपण ते हळूहळू सोडूया. रोज सावध राहून थोडा वेळ राग-मत्सर सोडू किंवा हे सगळं बरोबर आहे फक्त आज आता एवढं कळलं हेच केवढं आहे. आता आपण उद्यापासून कामाला लागू. माणूस फसतो कारण त्याला वाटतं ही साधना आहे. हळूहळू होणार ! पण अत्यंत कुशाग्र, कुटिल मनानं काढलेला, तो प्रश्न पुढं ढकलण्याचा मार्ग आहे. म्हणून असल्या पोस्टपोनमेंटला, चांगलं होण्याच्या उद्यावर ढकलण्याला लोक साधना समजत असतील तर ती फसगत आहे हे कृष्णजी लक्षात आणून देत आहेत. आपण खरा धोकाही ओळखला नाही, मनाची हुशारी व त्याचा खरा धोकाही जाणला नाही.

म्हणून ज्या साधकाला प्रगती करायची असेल त्याला विकारांचा खरा धोका आणि मन साधनेच्या नावाखाली आपली करीत असलेली फसगत जाणणं आणि योग्य कृती करणं गरजेचं आहे.

*

आपण, निदान अलीकडच्या शे-दोनशे वर्षांतल्या पिढ्या तरी, अशा एका वातावरणात वाढलो आहोत की, जास्तीत जास्त व्यवहार लोकशाहीप्रधान-संस्थाप्रधान असा आहे. त्यामुळं कुठलंही काम म्हटलं की संस्था आणि पद, त्याला लागून असलेली प्रतिष्ठा अशा एका ढाच्यातच मन विचार करू शकतं. व्यवहारानं एका तांत्रिक दृष्टीनं ते खरंही आहे. उदाहरणार्थ, एखाद्या संस्थेच्या खात्यावरचा व्यवहार करण्यासाठी लागणारी तरतूद घ्या. त्यात संस्थेच्या वतीनं कुणी कार्यवाह, अध्यक्ष, खजिनदार अशा व्यक्तींच्या सहीचीच गरज असते. त्याशिवाय पैसे काढता येत नाहीत. कुणाला देता येत नाहीत. एखादं कामही करता येत नाही.

साहजिकच मनावर असा नकळत संस्कार झाला आहे की, आधी पद हवं, प्रतिष्ठा हवी तर मग पुढं प्रवास किंवा काम शक्य आहे, नसेल तर कार्य शक्यच नाही. जसं पैशाशिवाय काम होणार नाही, हा विचार बळावला तर मग कुठल्याही मार्गानं आधी पैसा मग काम हा क्रम ठरतो. अनेकदा या नादात फक्त पैसापैसा करण्यात आयुष्य जातं आणि काम राहून जातं हाही धोका आहेच. अशी कित्येक कामं आहेत की जी पैशाशिवाय होऊ शकतात. उलट अशी कित्येक कामं आहेत जी पैशाशिवायच होतात. मला शेजारी राहणाऱ्या थोड्या परस्वाधीन आजोबांना मदत करायची आहे, त्यांच्या घराचा केर काढून द्यायचा आहे. आता या कामाला कुठंच पैसा लागला नाही. आधी काम मगही कामच. उद्देशही साध्य झाला आहे. यात हाही क्षणभर विचार करावा की, माझी बिघडलेली प्रकृती बरी व्हायची आहे तर त्यासाठी नाणं किंवा नोट चावून उपयोग नाही. औषधाची गोळीच खावी लागेल.

इथं आधी काम मग कदाचित ती गोळी आणायला पैसा आणि मग बरं होण्याचं कामच. त्यातही मधला पैसा लागेलच असं नाही. कुणी मला ती गोळी बिनपैशाची देईल, कदाचित ते औषध म्हणजे रस्त्याकडेला उगवलेला एखादा औषधी पालाही असेल. म्हणजे वाटतो एवढा पैसा अपरिहार्य नाही. पण हे सारं विचार करणाऱ्याला. त्याही पलीकडचं उदाहरण घ्या. मी खचलो आहे, धीर देणाऱ्या

मनापासूनच्या चार प्रेमळ शब्दांची गरज आहे. त्याला तसा माणूसच लागेल. कानाशी पैसा खुळखुळ वाजवला तरी मला धीर, सहानुभूती, उभारी येणार नाही. विचार केला तर मग पैशाला त्याचं स्थान असेल पण ते योग्य तेवढंच असेल. अवाजवी असणार नाही. उलट इतर माणुसकीसारख्या अनेक गोष्टींना आवश्यक स्थान मिळेल. जीवन खरं परिपूर्ण होईल. त्यातही पैशाचा हा अवाजवी वावर किंवा तीच एकमेव गोष्ट असा भ्रम झाल्यानं जीवनाला मिळालेली चुकीची दिशाही टळेल, होणाऱ्या हानीही टळतील.

साधारण हीच अवस्था या पदं, प्रतिष्ठा नि कामांची झालेली आहे. यात जसं पैशानं जीवनाला बाजारू, एकांगी वळण दिलं, तोल घालवला तेच या संस्था आणि पदांनी चालवलं आहे, मनानं नकळत ते गृहीत धरलं आहे. यावर कृष्णजी विचार करायला सुचवीत आहेत. अनेकांची आत्ता कल्पना अशी आहे की, कुठली तरी पदं मिळवू आणि मगच कुठलं काम शक्य आहे. मग पदं मिळवण्याची धडपड. ती तर काही अशी चालून येत नाहीत. पुन्हा एक तर पदासाठी म्हणून काही कामच करावं लागतं, नाहीतर उपद्रवमूल्य-न्यूसन्स व्हॅल्यू-लागते. ती गुंडगिरी, दहशतीनं येते. मग विघातक काम. असल्या क्रमानं जावं लागतं. ज्यांना पदाशिवाय काम शक्य वाटत नाही, त्यांना आश्वासनं देऊन पद मिळवणं एवढंच काम उरतं. त्यांना पुढं पदाचं, प्रतिष्ठेचं वारं लागलं की काय होतं हे आपण पाहातोच. लोकांनाच उलट त्यांच्याकडं कामांसाठी खेटे घालण्याचं काम करावं लागतं. कारण ते पदामुळं आलेल्या उपभोगात तरी मग्न असतात, नाही तर पद टिकवण्याच्या कामात तरी. याला असलेले सन्मान्य अपवाद सोडले तरी कृष्णजींच्या दृष्टीनं कामासाठी खरोखरच पदांची, एखाद्या प्रतिष्ठित संस्थेची गरज खरी आहे का ? हा वरवर विचित्र वाटणारा प्रश्न मनाला विचारण्याची गरज आहे. कारण मन साचेबद्ध आहे. त्याला कुठलंही काम संस्था किंवा त्यात पद असल्याशिवाय करणं शक्य नाही अशी समजूत करून देण्यात आलेली आहे.

आपण थोडा इतिहास पहावा. अनेक कर्मयोगी, कर्मवीर, महात्मे होऊन गेले - ज्यांनी केलेली कामं काळावरसुद्धा ठसा उमटवतील एवढी मोठी आहेत, ते कोणत्या पदावर होते ? ज्या संतसत्पुरुषांनी आत्मप्राप्ती करून घेतली आणि उद्‌बोधनासाठी, जगाच्या प्रबोधनासाठी आयुष्यं कळवळ्यानं निरपेक्षपणे वेचली ते कुठल्या पदावर होते ? कुठल्याही नामांकित संस्थेला लाजवील अशी कामं त्यांनी

केवळ कामाच्या प्रेमामुळं, मानवतेच्या कळवळ्यानं केली. त्यांच्या आयुष्याचे सबंध कार्यशील प्रवास कुठल्याही पदाविना झाले, हे निखळ ऐतिहासिक सत्य आहे. पदावरचा माणूस काम करू शकेल यात दुमत नाही पण कुठल्याही पदाशिवायही काम करता येतं हेही एक सत्य जरूर आहे. ते शोधायला हवं, बरोबर असलं तर मनाला बजावायला हवं. त्याची गरज अशासाठी आहे की, त्यामुळं मनाचा एक चुकीचा ढाचा मोडेल, एक चुकीची समजूत टळेल. खऱ्या कार्याचा मार्ग मोकळा होईल. कामाचं प्रेम असलेल्या कुणालाही मग काम करता येणं शक्य आहे. यामुळं उलट इतर अनेक चांगल्या गोष्टी घडतील. पदांसाठीची धडपड, वेळी साठमारीही थांबेल. पदं मर्यादित असल्यामुळं थोड्यांनाच काम करण्याची संधी आहे, हा अकारण गैरसमज टळेल. पदं मिळवण्याच्या कामात जाणारा वेळ वाचून तो कामं करायला उपलब्ध होईल. त्यामुळं असंख्य माणसं खरं काम करू शकतील.

यात असलेला मनाचा विरोध अशासाठी असतो की, त्याला मुळात कामांचं प्रेम नसतं, सेवेचं प्रेम नसतं, त्यागाची तयारी नसते, शिवाय पदाबरोबर येणाऱ्या पोकळ प्रतिष्ठेची आवड असते, हे लक्षात घ्यावं लागेल. या साच्यातून बाहेर पडलं की काम करायला जग मोकळंच पडलं आहे. कामांची जरूर आणि औचित्य तर अबाधित आहे.

हेच अनेकांचं साधनेतही होतं. कुठल्या आध्यात्मिक मानल्या जाणाऱ्या पंथ, प्रणाली, संस्थांवर काम केल्याशिवाय, निदान त्यांचं सदस्य झाल्याशिवाय साधनाच होणार नाही असं ते समजतात. हे केवळ वरच्यासारख्या बद्ध मनाचा खेळ झाला. देवत्वाचं स्मरण करायला, चांगलं वागायला कुठलंही सदस्यत्व नि पद लागत नाही. उलट सदस्य होण्यानं संस्थेच्या चौकटीत काम करण्याचं बंधन येतं. इथं तेही नाही. तुम्ही जमेल ती खरी साधना करायला मुक्त असता.

सर्वांत मोठं सामाजिक कार्य हे स्वतःत विधायक बदल घडवण्याचं. तो प्रवास हे प्राथमिक काम. ते करायला जसं पदं म्हणजे पाय लागत नाहीत कारण स्वतः स्वतःत बदलाचा प्रवास करायला जसे लौकिक पाय लागत नाहीत, तसं पुढं जगातल्या खऱ्या परिवर्तनाचं काम करायलाही कुठलं पद लागतंच असं नाही. मग लक्षात येतं की, 'पदाविना प्रवास' शक्य आहे ! साधनेतही !

*

१९. दंभाचं वय

माणूस वयानं मोठा होत जातो. त्यानं काही मोलाचं काम केलं तरी, नाही केलं तरी. त्याचं खरं कर्तृत्व त्यात असेल तर ते एवढंच की, मृत्यूला आमंत्रण देणारी कुठली गोष्ट त्यानं आपण होऊन केली नाही, किंवा तो जगण्यासाठी खातपीत, धडपडत राहिला. नाही तर अगदी खरं पाहाता, निसर्ग त्याला जगवीत असतो हेच खरं म्हणावं असे अनेक प्रसंग येऊन जातात. अनेक बेसावध अपघात, प्राणांवर बेतणारी व्यसनं, दुर्दैवी उपासमारी - या आणि अशा अनेक गोष्टी घडूनही माणूस अनेकदा जिवंत राहाताना दिसतो. अनेकदा यांतलं काहीच घडलेलं नसताना तो अचानक अनाकलनीय पद्धतीनं लाईट जावेत, ज्वाळा विझावी तसा जातानाही दिसतो. तेव्हा माणसाच्या वयानं मोठा होण्याचं काय कौतुक करावं ?

पण विशेष म्हणजे माणसाला त्याच्या वयाचं कळत-नकळत मोठंच कौतुक असतं. अगदी सूक्ष्म स्मरण असतं. कुणी अलौकिक कर्म करणारा भेटला तरी त्याला प्रथम त्याचं वय विचारावंसं वाटतं. तो वयानं लहान निघाला तर त्याला आतून खूप बरं वाटतं. मग बाहेर तो म्हणतोही की, माझ्यापेक्षा तुम्ही बरेच लहान आहात. त्याच्या मनाला या कार्यांच्या व्याप्तीचं आलेलं दडपण कमी करण्याचा तेवढा एकच मार्ग असतो. त्याचं मन लगेच तो मार्ग काढून मोकळं होतं. पण हा एक बालिशपणा नव्हे काय ?

हे एवढ्यावर थांबत नाही. पुढं तो ते सावरून घेतो आणि म्हणतो तुम्ही त्यामानानं फार लवकर वयात हे सारं कार्य साध्य केलं ! अर्थात शब्दांत जोर नसतो कारण त्याला मनाचा नि हृदयाचा पाठिंबा नसतो. उलट असंही घडतं की, तो कुणी बरोबरीचा, विशेषतः वयानं मोठाही निघतो. त्यावरही मन लगेच प्रतिक्रिया देतं की, तरीच तुम्हाला हे साध्य झालं. त्यासाठी एवढी वर्षं लागणारच, नाहीतर पुढं म्हणायचं असतं की, आम्हाला हे नसतं का साध्य झालं !

कृष्णजी म्हणत की माणूस वयानं वाढतो पण तो त्याचबरोबर दंभानं वाढत जातो. आता अशा अलौकिक गोष्टी लहान वयात करणाऱ्याला दिलेली दाद ही

मनाची दांभिकता दर्शवीत नाही का ? कारण मनात खरं तर मत्सर असतो, स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल निराशा असते आणि बाहेर चांगलं न म्हणावं तर ते ठीक दिसणार नसतं म्हणून मग आत एक अन् बाहेर एक करायची वेळ येते. हीच दांभिकता दुसरं काय ?

कल्पना करा घरात एखादा कुळाचार चालू आहे. कुठल्यातरी देवाच्या नैवेद्यावर रोज नवीन पक्वान्न झडतं आहे. काही समजुतीप्रमाणं एखाद्या दिवशी काही पाच-दहा प्रकारच्या भाज्या, पाच-दहा प्रकारचं गोडधोड करणं चाललेलं आहे. कुणी तरूण, जिज्ञासू मुलानं याची काय गरज आहे किंवा हे कशासाठी करायचं, असा प्रश्न सहज केला तर 'खरं सांगू का, मलाही ते माहीत नाही !' अशी खरी प्रामाणिक प्रतिक्रिया किती मोठ्यांकडून येते ? जवळपास नाही. मुळात ती येत असती, त्यांना त्याचं उत्तर शोधूनही सापडलं नसतं तर त्यांनी त्या गोष्टी केल्याच नसत्या. पण आता याला असं उत्तर मिळण्याऐवजी 'त्या पूर्वापार पद्धती आहेत. तसंच करायचं असतं, तुम्ही उगीच काही तरी आडवेतिडवे प्रश्न विचारता. अलीकडची पिढी फार शहाणी आहे.' मग जी गाडी सुरू होते ती त्या त्या घराप्रमाणं कुठंही जाते. वास्तविक मनाला आतून शंका असते, अनेकदा पटलेलं असतं की हा म्हणतो ते बरोबरच आहे. देवाच्या नावावर, कुठं अन्नदानाच्या नावावर, नैवेद्याच्या नावावर आपले स्वतःचे स्वतःच लाड चाललेले आहेत. पटतं आहे म्हणून बंद करावं, तर कुठला आजार, अपघात, अपयश यांची भीती त्रस्त करते आहे, बरं तसंच राहावं तर आतला सत्याचा आवाज न ऐकता जगणंही मुश्कील असतं. मग दंभाचा मार्गच उरतो. तोच सर्वत्र लोक चालताना दिसतात. पण यात होणारी हानी त्यांचीच असते, त्यांना आयुष्याच्या रूपानं निसर्गानं दिलेली संधी खऱ्या मुक्ततेच्या कामी न लागता अशा दांभिकतेत आयुष्य दवडणाऱ्यांचीच असते, ही वस्तुस्थिती तर बदलतच नाही.

कृष्णजींनी उदाहरण देताना एकदा म्हटलं आहे की, माणसाला लागलेली ऐशारामी जीवनाची चटक माणसाला हळूहळू विषप्रयोग करून नष्ट करावा तशी नष्ट करीत असते हे आपण लक्षात घेऊ का ? उदाहरणार्थ साध्या खुर्चीत बसून मूळ काम होत असताना मनुष्याला चैनीची चटक लागली , खोट्या प्रतिष्ठेच्या सापळ्यात अडकायला झालं, पैशाचा खरा विनियोग कळेनासा झाला की माणूस, बसणारा अक्षरशः रुतून जाईल असे अतिमऊ सोफे, खुर्च्या घेतो. पण यात कृष्णजी सुचवतात की, परिणामी शरीराला सुख वाटतं पण मन मात्र अशा सोफ्यात झोपी जातं.

जगात लठ्ठ माणसांच्या शरीरात चरबीचे अनावश्यक आणि त्यांना अकार्यक्षम करणारे थर जमतात तसे असल्या आरामानं आणि जीवनपद्धतीनं, चुकीच्या शिक्षणपद्धतीनंही चरबीचे थर मनावर जमून ते अकार्यक्षम, बेसावध होतं. मग असले दंभासारखे प्रश्नच त्याला समजून घेता येत नाहीत. एखाद्या अशा आरामापासून मुक्त, सावध आणि शिकणाऱ्या विद्यार्थ्यानं भेदक प्रश्न निर्माण केला की शिक्षकांना तो समजू शकत नाही, त्यांना तो शिकवण्यात अडचण वाटते. वयानं म्हणजेच दांभिकतेनं ते मोठे असल्यानं ते म्हणतात, 'उगीच अडथळे आणू नका, विनाकारण अभ्यासक्रमाच्या बाहेरच्या गोष्टी नकोत, चला पुढं काय शिकायचं ते बघूया.' अधिक दांभिक असतात ते अवसान आणून म्हणतात, 'वा प्रश्न छान आहे, मार्मिक आहे. फक्त त्यासाठी इतर सर्वांचा वेळ घ्यायला नको. तुम्ही नंतर मला स्टाफरूममध्ये भेटा.' मग वरचाच उपदेश ते त्याला खाजगीत करून 'नीट अभ्यास करायला !' सांगतात, असं आढळेल.

हीच बरीचशी अवस्था अनेकांच्या साधनेची असते. मग लोक दीक्षेचं, प्रथम गुरूंची गाठ केव्हा पडली, त्यामुळं मी कसा सीनियर आहे वगैरे सांगायला लागतात. ते आहे तिथंच असतात. पण मान्य करण्याचा मोकळेपणा नसतो. खऱ्या प्रगतीची तयारीही नसते. ज्या दीक्षेनं, गुरूभेटीनं स्वतःच्या शोधाला, देवशोधाला सुरुवात झाली नाही, खरं साधन सुरू झालं नाही तिचं वय सांगण्यात काय अर्थ असतो ? पण बाह्यतः कसं सावरावं हा प्रश्न भेडसावतो. मग वादात जसं काहीच दाखवण्यासारखा मुद्दा उरला नाही म्हणजे वय दाखवतात, 'मी तुझ्यापेक्षा चार पावसाळे जास्त पाहिले आहेत', असं म्हणतात. म्हणजे, म्हणून मीच बरोबर असं दंभानं म्हटलं जातं, तसं निदान साधनेत तरी होऊ नये एवढी दक्षता घेतली तर साधनेत तरी हा दंभ आपला घात करणार नाही.

कारण साधना घडली नसली तरी माणसाला वय असतं आणि दंभही ! आणि दोन्हीही रोज नकळत वाढत जातात, धोकादायकपणे !

*

२०. सूक्ष्म गुलामगिरी

हरेक मनुष्य स्वातंत्र्याचा मोठा भोक्ता आहे. अगदी सामान्य, गरीब माणसालाही तुला वाटेल ते देतो पण तू पशूचं जीवन पत्करशील का ? असं विचारलं तर तो तयार होणार नाही. माणूस नकळतपणे ओळखून असतो की, पशूचं जीवन ही गुलामगिरी आहे. सक्तीनं पूर्वी काही लोकांना गुलाम म्हणून वागवलं जाई, अगदी नजराणे म्हणून दिलं जाई, विकलं जाई. तशी वेळ आली तरी जाणारा काही खुशीनं जात नसे. कधी तरी चांगलं काम करून आपण यातून सुटून जाऊ, स्वतंत्र होऊ, या आशेपोटीच माणूस गुलाम व्हायला तयार होतो. परिस्थिती, गरीबी, बेकारी, दुबळेपण, शोषण यांचे बळी म्हणूनच त्या गुलामगिरीकडं पाहिलं जातं. आजही. त्यामुळंच तर प्रत्येक प्रांतात स्वातंत्र्यासाठी लढे सुरू असतात. गुलामगिरीविरुद्ध संघर्ष सुरू असतात. इतकं स्वातंत्र्याचं मोल माणसाला आहे.

आश्चर्य हे आहे की, स्वातंत्र्याचं मोल, इतकं मूल्य असलेला माणूस काही गोष्टींची गुलामगिरी मात्र सहजपणे पत्करतो. कृष्णजींनी समोर आणलेली, व्यवहारात नेहमी आढळणारी एक गोष्ट घेऊ. ती म्हणजे व्यसन. एखादं विडी-सिगरेटसारखं व्यसन घ्या. आपल्याला इथं त्यावर टीका करायची नसली, भलावणही करायची नसली तरी कृष्णजींच्या या सांगण्यानं या विषयावर कोणता प्रकाश पडतो याचा शोध जरूर घ्यायचा आहे. ज्यांना व्यसन प्रतिष्ठेचं वाटतं त्यांची पुरती फसगत झालेली आहे, हे त्यांनी ओळखून असावं. असे सन्मान्य व्यसनबहाद्दर सोडून देऊया.

पण कृष्णजी लक्षात आणून देतात की, एकदा माणसाला आपणच लावलेल्या आगीमुळं मिळणाऱ्या सिगरेटसारख्या धुराची लज्जत वाटली तर खरा धोका हा आहे की, तिचं रूपान्तर सवयीत होईल. आज प्रथम निदान चूक वाटतं आहे, त्याचा तब्येतीवरचा विपरीत परिणाम दिसतो आहे, ते सुधारण्याची नक्कीच शक्यता आहे. खरं तर सोडण्याचाही प्रश्न नाही, त्याची आपल्याला जरूर नाही हे कळताच ते आपोआप थांबणार आहे. पण एकदा सवयीत रूपान्तर झालं की मात्र अशा गोष्टीचा प्रश्न निर्माण होणार आहे. कारण एवढा स्वातंत्र्याचा भोक्ता असलेला आणि त्यामुळं

स्वतःला श्रेष्ठ समजणारा माणूस सवयीच्या ताब्यात जायला मुकाट्यानं तयार होतो. कृष्णजी म्हणत सवय ही एक गुलामगिरी आहे, हे त्याच्या लक्षात येत नाही का ?

प्रश्न सवयीच्याही पुढचा आहे. माणसाला देव, खरं समाधान, सौंदर्य, खरं प्रेम कशात आहे ते शोधायला अत्यंत सूक्ष्म विचार करू शकणारं मन आणि बुद्धी लागते. ती या व्यसनांनी आणि सवयींनी बोथट होऊन जाते, अशक्य होऊन बसते. हे अत्यंत संवेदनशील माणसाचं-भावनाप्रधान नव्हे-काम आहे. ज्याला तीक्ष्णपणे ऐकू येतं त्याला रस्त्यावरचा आवाज, जिन्यातली पावलं जशी सहज ऐकू येतात त्यामुळं त्याला त्याचा उपयोग होतो, कृती करायला सोपं पडतं. तशी सूक्ष्मता आपल्या प्रत्येकाकडं गरजेनुसार असूनही आपल्या व्यसनांच्या गुलामगिरीमुळं आपण ती गमावून बसतो. हे सहजी लक्षात येत नाही.

म्हणून काही माणसं देव, सत्य, प्रेम, करुणा, समाधान असले शब्द निघाले तर अगदी मख्ख बसून राहिलेली दिसतात. त्याचं कारणही अनेकदा अशा अनेक गुलामगिरींनी त्यांची मनं बोथट झालेली असतात, हे असतं. त्यामुळं ती असले सूक्ष्म विषय जाणून घेऊ शकत नाहीत. त्यावर त्यांना कोणती प्रतिक्रिया देता येत नाही. ती तटस्थ राहातात. संवेदनशील असतील, सूक्ष्म विचार करू शकत असतील तर मतभेद होतील, चर्चा होईल पण निदान त्या माणसांना हा विचार तरी कळेल. कारण तेवढी सूक्ष्मता मनाला, बुद्धीला असेल. पण असल्या व्यसनांनी ती सारी आपण गमावतो, हे कृष्णजींचं म्हणणं लक्षात आलं तर तत्क्षणी व्यसनांचं फोलपण जाणवेल. ती गुलामगिरी आहे, हे लक्षात आलं तर डोक्यावरचं हानिकारक ओझं फेकून द्यावं तसं ते टाकलं जाईल.

त्यासाठी हा प्रश्न समजून घेणं अगत्याचं आहे. हीच अवस्था माणसांच्या मतांची आहे. माणसाची काही मतं असतात. ती काही संस्कारानं, काही अनुभवानं, काही वाचनातून, काही इतरांच्यामुळं आलेली असतात. खरं तर त्याला एक तांत्रिक मूल्यही असतं. पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन आज वागताना, व्यवहार करताना आपल्याला सोपं पडावं एवढंच त्याचं मूल्य असतं. पण अनेक जण त्यांचे गुलाम असतात. ते काहीही झालं, अगदी वस्तुस्थिती समोर आली, मताला छेद देणारा, ते असत्य ठरवणारा अनुभव आला तरी आपली आपल्या मतांची गुलामगिरी सोडायला माणसं तयार होत नाहीत. स्वातंत्र्याचं एवढं प्रेम असणाऱ्या त्याच माणसानं हे

करावं, हा केवढा विरोधाभास आहे. आता मतं, मतं राहात नाहीत, त्यांचे आपण गुलाम झालो आहोत, हे लक्षात घेतलं तरी खूप आहे.

कृष्णजींचा संघटना, संस्था, संप्रदायांना विरोध आहे, त्यात तथ्य आहे. ते याही मुद्द्यावर की चार पटणाऱ्या चांगल्या गोष्टी आढळतात म्हणून माणूस ते स्वीकारतो. पण अनेक न पटणाऱ्या गोष्टीही मग संघटनेच्या नावावर त्याच्यावर लादल्या जातात. त्या अनावश्यक असतात. अनेकदा कुणा व्यक्तीच्या स्वार्थापोटी आलेल्या असतात. कधी त्यामागं पैसा किंवा तशा वस्तू गोळा करण्याचा उद्देश स्पष्ट असतो. तो या माणसाला स्पष्ट दिसतो. कळतो. तरीही त्या संप्रदायाचा, संघटनेचा गुलाम झालेला तो माणूस त्याला विरोध करीत नाही. वास्तविक ही गुलामगिरी परिणामी एक तर मनात संघर्ष, विसंवाद निर्माण करते. बाहेर दंभ आणि अखेर आपला ऱ्हास घडवते. यातून अखेर सामाजिक अवनती येते ती वेगळीच. त्यात पुन्हा पुढच्या पिढीवर चुकीचे संस्कार. असं हे सांप्रदायिक, संस्थात्मक गुलामगिरींचं स्वरूप राहातं.

वास्तविक स्वातंत्र्यगीत गाणारा आणि ज्यानं खरंच ते गावं असा हा पृथ्वीवरचा विलक्षण माणूस ! पण व्यसनं, मतं, प्रतिष्ठा, पैशाचा लोभ, मोठेपणा, मानमान्यता - अशा असंख्य गोष्टींचा गुलाम आहे, हे जर त्याच्या वेळीच लक्षात आलं तर बरं नाही का ? हे जितकं लवकर कळेल तितका आयुष्याचा काळ आणि शक्तीचा अपव्यय वाचेल. खऱ्या संवेदनशीलतेनं, सूक्ष्मपणे ज्या अवर्णनीय, गुणातीत ईश्वराचा शोध घ्यायचा, निरपेक्ष, प्रेममय वर्तणूक करायची, खरी करुणामयता अंमलात आणायची - त्यासाठी आपल्याला लागणारी स्वतःची अंतर्बाह्य स्थिती माणूस यामुळं साधू शकेल. याची प्रत्येक खऱ्या साधकालाही आत्यंतिक गरज आहे !

*

२१. मुक्ततेची विधायक तयारी

माणसं तशी जिज्ञासू असतात. त्यांना बऱ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. लहानपणापासून असलेली ही जिज्ञासेची प्रेरणा तशी जवळजवळ जन्मभर कायम असते. फक्त लहानपणची जिज्ञासेतली निरागसता पुढं कितपत राहते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आपणसुद्धा आपल्याला ज्याविषयी जाणून घ्यावंसं वाटलं ते लहानपणचे प्रश्न, त्यांच्या विषयांचं स्वरूप आणि आत्ताची आपली त्या बाबतीतली परिस्थिती यांचा आढावा घेतला तर हा विषय चटकन लक्षात येईल.

आधीच्या जाणण्याला केवळ जिज्ञासेचं स्वरूप असतं. विषयांचं बंधन नसतं. विचारण्यात तळमळ असते, समजून घेण्यात उत्सुकता असते, दिशा योग्य वाटली तर प्रत्यक्ष कृती करण्याची तत्परता असते. सांगणाऱ्याबद्दल मनापासून प्रेम, आदर असतो. त्यामुळं अशी शंका, प्रश्न विचारणं मुक्त मनाची तयारी घडायला फार उपयोगी पडतं. पुढंपुढं मात्र चित्र बदलतं. प्रश्नांच्या मागं स्वार्थाच्या प्रेरणा असतात, अज्ञान उघड होऊ नये ही काळजी असते, समजून घेण्यापेक्षा सांगणाऱ्याची परीक्षा घेण्याचा हेतू असतो. विचारतानाही मला हे सारं जणू माहिती आहे फक्त तुमची माहिती तुम्ही सांगा, असा नकळत भाव असतो. त्यातही आपली भूमिका, मत याला अनुकूल असंच सांगण्याची अपेक्षा असते. त्यामुळं फार काही विधायक पदरात पडत नाही. मत बदलण्याची शक्यता कमी झालेली असते. कृतीची लवचिकता तर वयाबरोबर आणखीआणखी कमी होत जाते.

ही तर विचारणाऱ्यांची परिस्थिती झाली. पण उत्तरं देणाऱ्यांची परिस्थिती जास्तच चिंताजनक आहे. कृष्णजींच्या दृष्टीनं ती जास्तच गंभीर आणि मुक्ततेच्या आड येणारी आहे. त्यांचा अभिप्राय आहे आणि आचरणही आहे की, जिज्ञासू रहा. प्रत्येक प्रथा, विचार, संस्कार, बद्धतेला, सांगण्याला प्रश्न करा. स्वतः विचार करा. शंका विचारा. वैचारिक स्पष्टता असावी म्हणजे योग्य कृतीला आपण स्वतंत्र आणि समर्थ होतो.

पण आपल्याकडे काय, इतरत्र काय अशी फारशी संस्कृती नाही. उलट

शिक्षकांना, आईवडिलांना, धर्माचार्यांना, कुठल्या गुरूंना प्रश्न विचारणं, शंका विचारणं फारसं आवडत नाही. ते थोडंसं उद्धटपणाचं मानलं जातं. अनादराचं मानलं जातं. अपेक्षा अशी असते की, सांगितलं त्याप्रमाणं सगळं करावं. का ?, कशासाठी ?, म्हणून विचारू नये. व्यक्तिगत प्रश्न तर अजिबात विचारू नयेत.

वास्तविक आपणच एका बाजूला म्हणतो की, का हे कळलं तर मनुष्य एखादी गोष्ट अधिक मनापासून व नीट करू शकतो. आज्ञापालनाला अर्थ असला तरी ते कधी तरी आणि स्वतःच्या मर्यादा ओळखून मग असतं. म्हणजे त्यात आधी ही समजून घेण्याची प्रक्रिया पुरी झालेली असते. असं असेल तर प्रश्न विचारायला हरकत नसावी. प्रश्न विचारणाऱ्यानं जसं केवळ काही तरी विषय उपस्थित करायचा आणि पुढं गंमत बघत बसायचं म्हणून विचारू नये, तसं सांगणाऱ्यानंही माहीत असलं तर सांगावं, नसलं तर आवही आणू नये आणि वेळी क्षमापूर्वक उत्तराच्या शोधासाठी स्वतःही त्यात सहभागी व्हावं.

हे चांगलं असूनही घडताना दिसत नाही याचं कारण अनेकदा माणसं अनेक गोष्टी करतात, पण त्या तशा का याचा विचार करण्याची परंपरा राहिली नाही . त्यामुळं अनेकदा ते त्यांना माहीत नसतं आणि मग अज्ञान उघड होण्याची अकारण भीती वाटते. कारण पुरातन काळी उपनिषद संवादात स्पष्ट परवानगी आहे की, यथेच्छ प्रश्न विचारा मी जर उत्तर देऊ शकत असेन तर अवश्य देईन, नसेल तर नाही. याच वृत्तीनं पुढं कृष्णजी म्हणतात तसं त्या त्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात सहभागी व्हावं. हा तर अधिक चांगला पर्याय आहे.

स्वतः कृष्णजींना किती तरी प्रकारे प्रश्न विचारले गेले आहेत. मुद्दाम विचारलेला एखादा केवळ बौद्धिक प्रश्न नसला, खराच शोध घेण्यासाठी केलेला प्रश्न वा विनंती असली तर मग त्यांनी न कंटाळता आयुष्यभर उत्तरं दिली आहेत. त्यांतले काही प्रश्न तरी निदान अवश्य पहावे असे आहेत - तुम्ही स्वतः सुखी आहात की नाहीत ? तुमचं भारतीयांविषयी मत काय आहे ? एखादी गोष्ट एकदा खोटी-असत्य-चुकीची आहे असं कुणी ज्यावेळी पाहातो त्याच वेळी ती गळून पडते. त्यासाठी वेगळं काही करावं लागत नाही, असं तुम्ही सांगता. प्रत्यक्षात माझं व्यसन मी चूक, असत्य पाहातो तरी ते सुटत नाही, मग हे कसं काय ? तुम्ही सांगता त्या गोष्टी आम्ही अंमलात कशा आणाव्यात ? जगात देव खरंच आहे का ? तुमच्यात आणि आमच्यात

कोणता फरक आहे ? तुम्ही ज्या इतक्या गोष्टींबद्दल चर्चा करता आहात त्या तुम्ही कुठून शिकला ?

हे सारे तर त्यांना स्वतःला उद्देशून विचारलेले प्रश्न झाले. त्यांनी स्वतःविषयक प्रश्नांना किती जपून, थोडक्यात पण प्रामाणिक उत्तरं दिली आहेत तेही शिकण्यासारखं आहे. त्यात हे विशेषत्वानं आढळतं की, एवढं आत्मज्ञान असूनही त्याचा यत्किंचित अहंकार किंवा मोठेपण त्यांच्या कुठल्याही उत्तरांत दिसून येत नाही. हेही शिकण्यासारखंच आहे. तेच करावं असं नाही. पण त्यांनी काय केलं आणि का केलं ते विचारणाऱ्याचं कौतुक आहे आणि सांगणाऱ्यांचंही धैर्य, शांती आहे.

याशिवाय जो माणसाचा खरा केंद्रस्थानी असलेला प्रश्न - त्याचं हे बद्ध मन आणि दुःख आणि कधी सुखाचा भ्रम - अशा विषयांबद्दल तर ते अक्षरशः आपण पहाताना थकून जाऊ इतक्या अगणित प्रकारे सर्वांसाठी उत्तरं शोधीत आले आहेत. संभाषणात सहभागी झाले आहेत. ते शक्यतो मुळातूनच वाचावं, निदान उपलब्ध अनुवाद तरी.

आपण त्यातून एक नक्की घेऊ शकतो की, अशा तऱ्हेनं प्रश्न विचारणाऱ्यानं, संवाद साधण्यानं मनं मुक्त व्हायची तयारी कशी करावी, मनाचे चकवे कुठं आहेत, सावधान कुठं राहावं, सदैव शिकत कसं राहावं, सदैव नम्र कसं राहावं, सदैव सर्वांना समुचित आदर देऊन कसं जीवन जगावं. त्यावरून आपापल्या दिशाभुली टळतील, भ्रम-धोके टळतील, शक्तीचे ऱ्हास टळतील, आपलं आकलन आणि वाटचाल शक्य होईल !

*

२२. अपूर्व मदत

कोणतंही काम हातात घेतलं आणि कितीही समर्थ मनुष्य असला तरी त्याला अनपेक्षितपणे येणाऱ्या, त्याच्या आटोक्याबाहेरच्या गोष्टींना तोंड द्यावं लागतं. अनेकदा जे काम हातात घेतो त्यातसुद्धा त्याला मुळातच स्वतःच्या शक्तीच्या मर्यादांमुळं किंवा कामाच्या व्याप्तीमुळं मदतीची गरज लागते. व्यावहारिक गोष्टींत तर हा मदतीचा प्रश्न आपण सर्वजण अनुभवतो. काही कार्यक्रम असो, कुठं घर घ्यायचं असो, काही सरकारी काम असो - कुणाच्या ना कुणाच्या तरी मदतीनं ते घडू शकतं. असे अनेक प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात येतात की, तो मदतीसाठी कुणा ना कुणाकडं जातो. तो कुणी माणूस त्याला मदत करतो. न उचलणारं ते ओझं असतं, कुणाचा तरी हात त्याला लागायला लागतो. मग ते थोडं हलकं होऊन माणूस ते पेलू शकतो.

इथपर्यंतच्या व्यवहाराच्या मदतीबद्दल आपण पाहिलं. कृष्णजी दाखवून देतात ती अडचण पुढं आहे. ती आपल्या स्वभावातला एक सूक्ष्म पैलू दाखवते. पुढं हाच पैलू जेव्हा साधनेच्या संदर्भात पुढं येतो तेव्हा अधिक सखोल प्रश्न निर्माण होतो. कसं ते पाहू. समजा वर म्हटल्याप्रमाणं आपलं एखादं काम एखाद्या कार्यालयात आहे. आपण कुणाला भेटलो, त्यांनी मदत केली. काम झालं. त्यांचे आभारही मानले. प्रश्न पुढं निर्माण होतो. मनानं ही स्मृती नकळत नोंदली जाते. मन तो माणूस लक्षात ठेवतं. एक वेळ मदत विसरून जाईल.

पुन्हा अडचण आली की, त्यानं केलेल्या मदतीची एक वेळ आठवण होणार नाही, पण व्यक्तीची हमखास होते. त्या ठिकाणी ते कुठं बसले होते, त्या बिल्डिंगची, त्यांतल्या टेबलाचीसुद्धा होते. मग पुन्हा त्याच जागी जाऊन आपण मदत मागावी असं मन सांगतं. नकळत माणूस त्याच व्यक्तीचा शोध घेतो. कारण आता एक अवलंबित्व आलेलं असतं. तीच गोष्ट एखाद्या वेळी बरं करणाऱ्या डॉक्टर, वैद्य, वैदूबद्दलही होते. वास्तविक असं काही असतंच असं नाही. त्या वेळी तीच माणसं, तेच काम, तीच मदत होईलच असं नसतं. पण मनाला सुरक्षित मार्गावरून जायची

आणि यशस्वी व्हायची, सुखाची अपेक्षा असते. मग तो पुन्हा जुनाच मार्ग चोखाळू इच्छितं. ते सोपं वाटलं तरी ते तसंच असावं असं नाही. अनेकदा नसतंही. जसं त्या माणसाची बढती होते, तो निवृत्त होतो, जसं ते डॉक्टर गावाला गेलेले कळतात, कदाचित अति यशामुळं ते आता पेशन्ट नीट तपासत नाहीत, पैशाच्या नादाला लागले असले तर अकारण महागडी औषधं देतात, सर्व गोष्टींनी तिथला गुण कमी झालेला असू शकतो.

म्हणून मुळात मदतीचा जिथपर्यंत विषय आहे, तोपर्यंत तो खरा आहे हे मान्य करूनही कृष्णजी म्हणतात की, तुम्ही जुन्या किंवा एकाच ठिकाणी मदतीची अपेक्षा करणं हे मनाला बळी पडण्यासारखं आहे. मग अनेकदा मदत होत नाही. निराशा येते. पूर्वीच्या मदतीबद्दलही कृतज्ञता उरत नाही. त्यापेक्षा खरं तर असं मदतीसाठी जुन्याच वळणानं जायची काय गरज आहे, याचा विचार करावा असं ते सुचवतात. उलट त्यांचं म्हणणं तर असं आहे की, खरी गरज असेल तर गरजेची मदत ही कुठूनही होतच असते. त्यासाठी आपण मनाला बळी पडण्याचं कारण नाही. एकदा कधी कुणी काम केलं, कुठला खटला जिंकून दिला, कधीतरी गुण आला म्हणून आयुष्यभर उपयोग दिसत नसला तरी तिथंच जायचा आग्रह धरणारं, आपलं नुकसान करणारं मन बळकट होत असतं. त्यांचं म्हणणं समजून घेण्यासारखं आहे की, मदत गरजेची असेल तर ती कधीही, कुठूनही आणि कुणाकडूनही होऊ शकते. एखादा कुणी नवा माणूसही तुमचं काम करू शकतो. याची खात्री बाळगणं आवश्यक आहे. त्यात आपलाच लाभ आहे. कारण मदतीची हाक खरी असेल तर मदतही हाकेच्याच अंतरावर असते. फार फिरतीची, वणवण करण्याची, उगाच साचेबद्धपणे कुठं जाण्याची गरज नसते.

यात खरी मदत, खरी हाक अशासाठी म्हटलं की तरुणपणी तुम्हाला एखादा आजार झाला नि औषध मिळून बरे झाला तर त्यात निसर्गानंसुद्धा मदतीच्या खरेपणाची खात्री केलेली असते. पण अशा बरा होण्यात निसर्ग आणि कर्तव्यपूर्तीची गरज दोन्हीही सरळ असतात. पण तेव्हा बरा झालो म्हणून असाच आजार म्हातारपणी झाल्यावरही मदतीसाठी तिथंच गेलो आणि केवळ जगण्याची धडपड म्हणून, स्वार्थ म्हणून गेलो तर मग मदत होत नाही, गुण पडत नाही. अशा वेळी आपली मदतीची गरज खरी नाही. निसर्गक्रमानं आपण आजारानं मृत्यूला सामोरं जाणंच योग्य होतं, हे

ओळखता येतं. अकारण कुणाला दोष दिला जात नाही. निराशही व्हायला होत नाही.

याच मदतीच्या विषयाचं अधिक परिणत स्वरूप म्हणजे साधकाच्या दृष्टीनं आध्यात्मिक मदतीचं. मनाच्या मूळ स्वभावाची कल्पना आल्यामुळं आता हा प्रश्न निदान समजून घेणं सोपं होईल. तिथंही मनुष्य मदतीसाठी, आकलन स्पष्ट होण्यासाठी मार्ग-धोके समजून घेण्यासाठी कुणा व्यक्तीकडं जातो. वर सांगितलं तशी गरज खरी असेल तर त्या व्यक्तीकडून मदत होते. पण मन लगेच त्याच्यावरच अवलंबून राहायचं नकळत ठरवून टाकतं. तशाच पद्धतीनं त्यांनी परत सांगितलं पाहिजे, उलट इतर कुठं मी जाणार नाही, कुणाचं ऐकणार नाही अशा हट्टी भूमिका माणसाला घ्यायला हे सदोष मन भाग पाडतं. मग त्या व्यक्तीची अधिकारशाही मानली जाते. कदाचित त्यामुळं आपलं शोषण होऊ शकतं, नुकसान होऊ शकतं. प्रगती खुंटू शकते. परावलंबन तेही एकाच ठिकाणी निर्माण होतं.

वास्तविक ही मदतही, जर गरज खरी असेल तर कृष्णजींनी सुचवल्याप्रमाणं कुठंही, कुठूनही, कुणाच्याही माध्यमातून होऊ शकते. आपण जितके मदतीला उत्सुक आणि मोकळे असू तितकी मदतही वेगवेगळे आणि आश्चर्यकारक प्रकार धारण करते. आपण मात्र घ्यायला तत्पर व समजूतदार पाहिजे. अशी मदत बालकाच्या निरागस हास्यातून, कुणाच्या बोलण्यातून, पक्ष्याच्या गाण्यातून, गवताच्या पात्यापासून, उघड्या आकाशाच्या दर्शनापर्यंत आणि कुठल्याही व्यक्तीकडून, व्यक्तींकडून, संतांच्याकडून होऊ शकते. आपण मात्र या सार्वजनिक अपूर्व मदतीसाठी कुठल्याही पूर्वग्रहांपासून मुक्त राहून छोटासा संदेश टिपायलाही तत्पर असलं पाहिजे, मग अडचण ती कुठली ?

*

दुःखी आणि परिस्थितीबद्दल तक्रार करणारे तर आपल्याला सर्वत्र आढळतात. एक प्रकारचं असमाधान, अतृप्ती, अस्वस्थता अशामुळं हे होतं. पण कृष्णजींना सुचवायचा आहे तो एक महत्त्वाचा फरक. ते ज्या अर्थानं डिसकंटेट हा शब्द वापरतात त्याला आपण असमाधान म्हणू. ते तसं लहानपणापासून माणसाला अनुभवायला येतं. त्यात एक प्रकारची गैरसोय, त्रास, उणीव - अशा गोष्टी असल्यानं ते कुणाला नकोसंही वाटतं. असंतुष्ट असणं हे अनेक कारणांनी अनेकांच्या वाट्याला येत असलं तरी त्याची विधायक दिशा लक्षात येत नाही. तिचा थोडा विचार केला तर आपल्याला गरजेचा आहे.

आधी म्हटलं तसं असमाधान व अस्वस्थता जवळजवळ सर्वांना आहे. मुख्यमंत्री झालं तरी केंद्रात जायला अजून मिळालं नाही, केंद्रीय मंत्रीपद मिळालं तरी महत्त्वाचं 'खातं' मिळालं नाही, खातं मिळालं तरी पंतप्रधान होता आलं नाही, पंतप्रधान होता आलं तरी निर्णय दुसऱ्या कुणाच्या हातात आहेत - कुठल्या कारणानं मनुष्य असमाधानी असेल हे सांगता येत नाही. लग्न होत नाही म्हणून, झालेलं दुःखाचं, अपेक्षाभंगाचं ठरलं म्हणून, कुटुंबात पैसा भरपूर पण सतत वाद-वितुष्टं म्हणून. कला आहे पण संधी नाहीत म्हणून, भरपूर संधी आहेत पण तब्येतीची साथ नाही म्हणून - एकूण हजारो प्रकारे शेवटी असमाधान सर्वांना साथ देतं, कुणाचं दिसून येतं, कुणी सांगतं, कुणी सोसतं - एवढाच फरक.

पण खरं तर असमाधान, अस्वास्थ्य एवढं नुसतंच वाईट असतं तर कदाचित त्याची योजना निसर्गानं मनात केली नसती. असमाधानाला दुसरी बाजू आहे. आपण त्याला घाबरतो हा खरा प्रश्न आहे. त्यातून इतर किती तरी प्रश्न नि पळवाटा निर्माण होतात. काही लोक ते टाळण्यासाठी कुठं उथळ करमणुकी, रंजनं, व्यर्थ गप्पा, पत्ते खेळणं, क्लबात जाणं, त्याही पुढं जाऊन एका दिशेनं कुठं सिगरेटचा धूर काढीत बसणं, नाही तर मोठी व्यसनं अशा पळवाटा काढतात. दुसऱ्या बाजूनं

मग बाहेर अविरत भ्रमण करीत राहणं, घरात शक्यतो थांबायचं नाही, असं करतात. काही लोक जरा चांगल्या पळवाटा शोधतात. यात्रा-वेगवेगळे गुरू-पंथ-कुठल्या तरी कार्यात स्वतःला गुंतवणं - असे असंख्य मार्ग नि पळवाटा शोधतात. यात हे सारं वरकरणी वाईट दिसो, आध्यात्मिक वाटो, चांगलं दिसो - मूळ असमाधानाचा प्रश्न सुटलेला नसतो. ते ते काम थांबलं की असमाधानाचं भूत परत मानगुटीवर बसतं.

त्यापेक्षा असमाधानाचा, कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे असं कृष्णजी सुचवीत. ते म्हणत की, माणसाला मुळात असमाधान घडतं ही चांगली गोष्ट आहे. हे म्हणणं थोडं धक्कादायक असलं तरी रास्त आहे. कारण असमाधान आहे म्हणून काही करण्याची प्रेरणा (इनिशीएटिव्ह), उत्साह आहे. फक्त या काही करण्याच्या दिशा म्हणजे पळ काढणं किंवा कुठं पांघरूण घालणं, असमाधान विसरण्याचे प्रयत्न करणं नव्हे. तिथं गडबड आहे, ऱ्हास आहे, पण असमाधानामुळं शोधाची प्रेरणा घेतली गेली तर ही जिज्ञासेची ज्योत आयुष्यात अनेक विधायक गोष्टी घडवून आणू शकते. अनेक शाश्वत सत्यांचा अनुभव देऊ शकते. कुणी तुम्हाला म्हणतं म्हणून तुम्ही काही कार्य करणं वेगळं आणि तुम्हाला प्रेरणा झाली आहे, ती निखळ सत्याच्या शोधाची आहे, कुठल्या प्रतिष्ठेसाठी नाही की रिकामा वेळ भरून काढण्यासाठी नाही - म्हणून तुम्ही एखादं काम हातात घेणं वेगळं. त्यासाठी असं वरवरच्या कुठल्या उणिवा नि प्रपंचातल्या मागण्या पुऱ्या न झाल्यानं आलेलं उथळ असमाधान उपयोगाचं नाही. खरंखुरं,जिज्ञासा जागृत करील, कामासाठी स्वतः होऊन पुढं होण्याची प्रेरणा देईल असं असमाधान गरजेचं आहे. मनासारखं न झाल्यानं उथळ असमाधानी सामान्य माणूस आणि मूलभूत प्रश्नांची उत्तरं मिळत नाहीत म्हणून खरा असमाधानी शास्त्रज्ञ यांतला फरक लक्षात घ्यावा.

कृष्णजी म्हणत अशा खऱ्या असमाधानामुळं, खऱ्या अस्वस्थतेमुळं शोधाची तीव्रता निर्माण होते. त्यातून खरी सर्जकता निर्माण होते. आपण सर्जनशील व्यक्तित्व म्हणजे कुठं कविता लिहिणं, चित्र काढणं, गाणं म्हणणं - इतकं साधं साचेबद्ध करून टाकलं आहे. खरी सर्जनशीलता ही मुळात स्वतः होऊन पुढं होण्याच्या प्रेरणेतून आलेली असते आणि ती प्रेरणा, परिस्थितीविषयीच्या सखोल असमाधानातून आलेली असते. यामुळं आपण पुढं होऊन धडपडणाऱ्याला दिलेला मदतीचा हात ही सर्जनशील कृतीच असते. झाडांना लागलेली तहान पाहून, डहाळ्यांच्या कोमेजलेल्या पानांनी

अस्वस्थ होऊन कुणी न सांगता स्वतः विहिरीतून घागर काढून झाडांना घातलेलं पाणी ही सर्जनशील कृतीच असते. इतकंच काय ज्याच्याकडं कुणी पाहाणारही नाही अशा कुणा दुर्लक्षित, उपेक्षित माणसांच्या वेदनांनी अस्वस्थ वाटून आपल्या अंतरंगातला आनंद नि भाव व्यक्त करणारं प्रेमळ, निरागस हास्य - हीसुद्धा सर्जनशील कृती असते. अशा हजारो कृतींची शक्यता कुणालाही आयुष्यभर आहे आणि त्यांनी निर्माण होणारा आनंद व स्वास्थ्यही कुणालाही मिळण्यासारखं आहे. पण त्यासाठी या प्रापंचिक, उथळ असमाधान नि अस्वास्थ्यातून मन निघू दे. मग राहील ते खरं अस्वास्थ्य, त्यातून कृतींचा शोध व उस्फूर्तता, मग सहज कृती. आनंद दूर नाही.

कृष्णजींचं तर म्हणणं आहे की, आयुष्यातल्या वेगवेगळ्या, खऱ्या, खोल असमाधानांचा, अस्वास्थ्यांचा शोध घेत चाललेला हळूहळू सत्याकडं जातो. उगाच कुठल्या क्लबातही जात नाही, वरवरचा देवधर्मही करत नाही. तो पूर्ण समाधान, सत्य यांच्या शोधाकडं जाणाऱ्या अशा छोट्या पण अर्थपूर्ण कृती करीत करीत परिपक्व होत जातो. त्याच्याकडं तक्रारी नसतात. सरळ, शक्य असलेल्या स्वतःच्या कृती असतात. कुठल्या संघटना नसतात, संस्था नसतात पण कार्य असतं. जगाला त्याच्या एकट्यामुळंसुद्धा विसावा असतो. त्याला पूजा-आरत्या-पाठ-पारायणं अशा वरवरच्या गुंतवणुकींची गरज उरत नाही. तो थेट एखाद्या भुकेलेल्याला कुणी न सांगता खाऊ घालतो, शक्य असेल तर कुणा गरजूची विचारपूस करतो, कुणाचे अश्रू पुसतो, कुणाच्या मोडकळीला येऊ पाहाणाऱ्या प्रपंचाला स्वतः होऊन शक्य तो आधार देतो, कुणाला त्याच्या पायावर उभं करतो, कुणाला अक्षरओळख करून देतो, कुणाला धीराचे स्वतःच्या अनुभवातून आलेले चार शब्द ऐकवतो. या साऱ्या कृती अधिक सर्जनशील असतात. मग त्या, ज्या मूळ असमाधान-अस्वस्थता-शोध यांतून आल्या त्यांना कमी कसं लेखता येईल ?

खऱ्या साधकांच्या हे लक्षात येईल की आपला तथाकथित परमार्थ या विचारांपासून किती दूर आहे ! वास्तविक अशा सरळ वाटेनं अनेक सर्जनशील गोष्टी घडतात. कृष्णजी म्हणत अशालाच परमेश्वर सापडण्याची शक्यता आहे कारण परमेश्वर ही सर्वांत सर्जनशील स्थिती आहे !

*

एखाद्या लहान मुलावर संस्कार केले जातात. त्यात सर्वांत पहिला स्वतःच्या शरीराकडे बोट दाखवून 'मी' चा. तो हळूहळू त्यात तयार झाला की, मग 'त्याची' खेळणी, त्याच्या वस्तू, त्याची माणसं - असा सारा 'माझं' चा प्रवास सुरू होतो. थोडा शिकला की, उरलेला प्रवास तो अशा थोड्याशा संस्कारानंसुद्धा तयार होऊन पुरा करतो. मग आपण त्याला 'शहाणा बाळ' समजतो. आपल्या या कल्पना किती पक्क्या असतात नाही का ? आपल्याला समाजाचे तसेच संस्कार असल्यानं त्यात काही चूक वाटत नाही. पण पुढं याच कल्पना चांगल्या काँक्रीटच्या होऊन त्याच्या आयुष्यात आणि त्याच बरोबर त्याच्या संपर्कात येणाऱ्या किती तरी माणसांच्या आयुष्यात केवढा गोंधळ घालणार आहेत, हॅवॉक करणार आहेत याची कल्पनाही या पालकांना येत नाही.

तो मुलगा त्यांच्या दृष्टीनं शहाणा ठरतो तो खरं तर तो 'मी', 'माझं' किती ठामपणे करू शकतो यावर. तो त्याची वस्तू, पेन्सिलपाटी, पेन, खेळणं यांना कुणाला हात लावू देत नाही, स्वतःच्या वस्तू नीट कपाटात ठेवतो, कपाटं उघडी टाकत नाही, आपल्या अभ्यासाच्या वह्या जपून ठेवतो, इतरांकडून महत्त्वाचे प्रश्न-उत्तरं काढून घेतो पण आपला अभ्यास कुणाला सांगत नाही, आपल्या घरी कुणाला खेळायला बोलवत नाही, वेळ पडली तर त्यांच्या घरी मात्र जातो. या साऱ्या गोष्टी हुशारीच्या ठरतात. मग हळूहळू एक आत्मकेंद्रित व्यक्ती तयार होते.

उपद्रव केव्हा होतो की हा 'मी'चा बाळ मोठा झाला आणि त्याच्या 'मी'त फक्त तो, त्याची करियर, प्रमोशन, बिझनेस, त्याची सुखं, सोयी, मतं, माणसं एवढंच बसतं हे ठामपणे जाणवायला लागलं की ! त्याच्या महत्त्वाकांक्षेसाठी, स्वतःसाठी तो जेव्हा आईवडील, त्यांची सोय-गैरसोय, मतं - यांचा अनादर करायला लागला की, मग त्रास वाटतो. ही परिस्थिती काही वेळा इतकी टोकाची असते की, करियर करीत परदेशात गेलेला बाळ आता म्हाताऱ्या, परावलंबी आईवडिलांकडं

बघायलासुद्धा तयार होत नाही. तिथून फारतर चेक पाठवतो. येणं परवडत नाही. कामं फार आहेत म्हणतो. कधी इथंच कुठं राहातो पण तुमचं पटत नसलं तर तुम्हीच वेगळं राहा असं आईवडिलांना सांगतो. कधी बायकोला घटस्फोट द्यायला तयार होतो. तेव्हा पस्तावा होतो. आम्ही एवढं केलं पण हा असा कसा वागतो म्हणून आईवडील इतरांना विचारतात. पण त्यांनीच लावलेलं रोप चांगलं वाढून त्याचा बळकट वृक्ष झालेला असतो.

या साऱ्यांत आपण पाहिलं ते एका कौटुंबिक पातळीवरचं. पण बाहेर संस्था, संघटना, पक्ष आणि अगदी देवसुद्धा - यांच्यारूपानं काही फार वेगळं चाललेलं नसतं. संस्था स्वतःच्याच सदस्यांचं हित पाहाणार. त्यात पुन्हा अंतर्गत महत्त्वाकांक्षेचे संघर्ष. त्यात इतर संस्थांशी संघर्ष, स्पर्धा, वेळी लढाया, चढायासुद्धा. अगदी कामगारांचं हित जपायची प्रतिज्ञा करणाऱ्या दोन संघटनांच्यामधून विस्तव जात नाही. जी व्यक्ती म्हणून महत्त्वाकांक्षा आहे, स्वामित्वाची इच्छा आहे, तीच इच्छा, फक्त संघटना म्हणून आहे. कामाचं श्रेय घेण्यावरचे संघर्ष वगैरे तर याचीच बाह्य रूपं आहेत. साधा कामगारांना न्याय द्यायचा, पगार वाढवून द्यायचा हे खरं असलं तरी त्यात वेळी ती कंपनी बंद पडली तरी चालेल हे म्हणायला तयार होतात. अशा या मीच्या महत्त्वाकांक्षेच्या फांद्या भयाणपणे वाढतात. त्यात अनेक कुटुंबांची वाताहात होते, हा कुठंही आढळणारा अनुभव आहे. त्यात संघटनेत वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि भ्रष्टाचार एकत्र आले तर संघटनांपेक्षा पदाधिकाऱ्यांचंच भलं होतं. आपल्याला कल्पना येत नाही पण असेच देश-देश या पातळीवरही पुन्हा तीच महत्त्वाकांक्षा, तेच माझं-तुझं फार मोठ्या पातळीवर आणि उदात्तीकरण करून चालतं. इथं आईवडिलांचा बळी जातो, तिथं अडाणी कामगारांचा, तिकडं लष्कर आणि निरपराध लोकांचा - कृष्णजी तळमळीनं विचारीत मूळ प्रवृत्तीत काय फरक आहे ? हा तर फक्त प्रमाणाचा फरक आहे.

यात ते म्हणत ते लक्षात घेण्यासारखं आहे की, ही पृथ्वी ही आपली सर्वांची आहे - तुमची किंवा माझी नव्हे - याचा विसर आहे. छोट्या पातळीवर हे घर, या वस्तू, ही माणसं आपण सर्व एकमेकांचे आहोत, हे सर्व सर्वांचं आहे. कुणी कुणाला बाहेर काढणं हा विचार कसा शक्य आहे ? महत्त्वाकांक्षा जीवनातलं प्रेम आटवून टाकते. छोट्या पातळीवर ते आटलेलं प्रेम नकोशा म्हणून हाकलून देण्यात

येणाऱ्या गर्भातल्या अर्भकाचं असेल, पुढं भावंडांचं असेल, आईवडिलांचं असेल, पत्नीचं असेल. पण ते खरं गरजेचं असलेलं प्रेम या महत्त्वाकांक्षेचा बळी ठरतं. आपण केवढा अन्याय केला आहे आणि मानवी जीवन किती निकृष्ट केलं याची कल्पना येत नाही. स्वतःवरच बळी व्हायची वेळ आली तर कदाचित हे कळतं. छोट्या पातळीवर छोटे देश, महत्त्वाच्या भूमी, तेलसाठे, वेगवेगळ्या बाजारपेठा - अशा गोष्टी ताब्यात ठेवायचे प्रयत्न करतात.

याला उत्तर अर्थातच काही व्यवस्थाच नसणं हे नाही, पण हे खरं सर्वांचं आहे हे मानणाऱ्या, माणुसकी जपणाऱ्या, प्रेम देणाऱ्या व्यक्ती घडवणं हे आहे. त्यांच्याकडून फक्त तांत्रिकदृष्ट्या या तत्त्वावरच्या संस्था निर्माण होतील. तर चित्र बदलेल. मग एका बाजूला अति पैसा आणि दुसऱ्या बाजूला अति दारिद्र्य असलं असंतुलन दिसणार नाही.

कुठल्याही साधकाला या साऱ्या आयुष्यातल्या प्रश्नांना पर्याय नाही. पण यातला महत्त्वाकांक्षेचा, मी-माझंचा प्रश्न त्याच्या साधनेतही येऊ नये. आपल्या लौकिक जीवनात तरी त्याला जर सावध केलं तर त्या बाबतीत सावध राहून आपल्यापुरते असल्या चुकीच्या जीवनपद्धतीचे दोष टाळता येतील. परमार्थाच्या दृष्टीनं कृष्णजींनी लक्षात आणून दिलेला या संदर्भातला एक मुद्दा शेवटी जाता जाता लक्षात घेऊ की, आनंदी, परमार्थी जीवन, आपल्या भाषेत संतत्व, हीसुद्धा महत्त्वाकांक्षा नसावी, आपल्याला त्या संतजीवनाबद्दल मनापासून निरपेक्ष प्रेम वाटतं म्हणून त्याची कास धरावी. अन्यथा त्या प्रवासात महत्त्वाकांक्षेतले घोटाळे व परिपाक तेच राहतील याबद्दल आपण सावध राहू या ! प्रापंचिक काय पारमार्थिक काय जीवनाचं निर्मळ रोप मी-माझं नि महत्त्वाकांक्षेचं नसतं, श्रेष्ठमूल्यांच्या खऱ्या प्रेमाचं असतं !

*

२५. गुरू नको, सांगाती हवा

अनेकांनी ऐकलेलं असतं की, कृष्णजी गुरू मानीत नाहीत. कुणी कुणाचा गुरू नसतो. गुरूची गरज नसते. आपण स्वतःच स्वतःचं गुरू व्हावं. अशामुळं एक नकारात्मकता या विषयात अनेकांच्या मनात असते. त्याचा विपरीत अर्थ असाही घेतला जातो की, त्यांचा गुरुकल्पनेला विरोध असून कृष्णमूर्तींना मानणाऱ्यानं, ऐकणाऱ्यानं कुठल्या गुरूकडं, गुरूमार्गाकडं जाणं हा जणू अपराधच आहे. हाही विषय थोडा नीट समजून घेतला तर साधकांना - जीवन साधकांनाही उपयोगी ठरेल.

कृष्णमूर्तींचा विरोध आहे तो 'गुरू'च्या नावाखाली चाललेल्या गुरुबाजीला, दंभाला, ढोंगाला तर आहेच पण त्यात डोकावणाऱ्या आणि व्यक्तीचं जीवनस्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या अधिकारशाहीलाही आहे. गुरू म्हणून कसलेही गैरफायदे, लाभ घेण्याला आहे. मी म्हणतो म्हणून माना, प्रश्न विचारू नका - असं म्हणणाऱ्या हुकूमशाहीला आहे. गुरुपदाचा वापर करून अचाट संपत्ती लाटणाऱ्यांना आहे. स्वतःच्या संरक्षण व्यवस्था, लष्करं सांभाळणाऱ्यांना आहे. स्वतःला कळलेलं नसताना इतरांना समजावून देण्याची जबाबदारी घेण्याचं आश्वासन देणाऱ्यांना आहे. तुम्ही इथं यायला लागा तुमची सगळी कामं होतील, तुम्ही दुसरीकडं जाऊ नका, दुसऱ्यांचं ऐकू नका म्हणणाऱ्यांना आहे. सर्व काही कळत असल्याचा आव आणणाऱ्यांना आहे. ढोंगी, बुवाबाजी, अंधविश्वास पसरवणाऱ्यांना आहे. स्वतःकडे येणाऱ्यांचं ऐकूनही न घेणाऱ्यांना, इतरांना तुच्छ समजणाऱ्यांना आहे. अशा अनेक भूमिका कृष्णजींच्याकडून घेतल्या गेल्या आहेत.

पण आपल्या लक्षात येईल की, यात कुणीही प्रामाणिक, सत्यशोधक, खरा साधक असलेल्या व्यक्तीला चुकीचं वाटावं असं काहीच नाही. म्हणून गुरू नको म्हणजे असले गुरू नको. मदत तर व्यवहारात साधं घर बांधायला मजूर-गवंड्यांपासून सर्वांची घ्यावी लागते. तर मनाचा शोध घ्यायला पूर्ण समर्थ एखादाच असायचा. सर्वसाधारणपणे अशी मदत मनाचा शोध, सापळे, घटना, शुद्धता, नाश

मग खऱ्या देवाच्या कल्पना-वस्तुस्थिती, हे सारं समजून घ्यायला मदत लागणार नाही, असं कसं होईल ? पण ती घेण्यात स्वतः घेणाऱ्यानं काही कष्ट घेतलेले आहेत, पुढंही स्वतः शोध घेत राहाण्याची त्याची तयारी आहे. मदत करणाऱ्याचीही भूमिका बरोबरीनं, जिज्ञासेनं, शोधात सहभागी व्हायची आहे. कृष्णजींच्या अगणित संवादात ते म्हणताना आढळतात 'चला आपण प्रश्नाचा, विषयाचा शोध घेऊया.' यात प्रवासात सोबत करण्याची भूमिका आहे. तयार उत्तरं पुरवण्याची, आदेश देण्याची नाही. गैरफायदा घेण्याची नाही, दुसऱ्याला परावलंबी वा दुबळं बनवण्याची तर अजिबात नाही.

यासाठीच कृष्णजींनी कुठल्या प्रश्नाची थेट उत्तरं दिलेली नाहीत. ते म्हणत तयार उत्तरांमुळं लोकांना विचार न करण्याची, न शोधण्याची सवय लागते. ते सावध राहात नाहीत, नुसते अनुयायी होतात. जीवन तर हरघडी बदलत असतं, विविध-व्यापक असतं. मनुष्य त्याला योग्यपणे सामोरा जायला स्वतः समर्थ व्हायचा असेल तर त्याला प्रश्न करा, विचार करू द्या, शोधू द्या. तयार मार्ग देणं म्हणजे एखाद्याला भूक लागली म्हणून, गरीब म्हणून, आयुष्यभर आयतं जेवायला घालून परावलंबी करण्यासारखं आहे. त्याऐवजी त्याला आज जरूर जेवायला देऊ, मदत करू पण शक्यतोवर शिकवून, विद्या देऊन, व्यवसायशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभं करणं जसं श्रेष्ठ आहे तसं आहे. उलट खोट्या गुरूंना आपल्यावर किती लोक अवलंबून आहेत, आपले अनुयायी किती आहेत याचंच मोठं कौतुक असतं. त्याला साहजिकच कृष्णजींचा विरोध आहे. त्यांनी स्वतः तसं कधी केलं नाही.

ते म्हणत गुरूकडे अवश्य जावं पण ते स्वतःच्या, ईश्वराच्या शोधाच्या मदतीसाठी जावं. तेसुद्धा मला सगळं कळतं म्हणणाऱ्याकडं जाऊ नये, जो शिकतो आहे, सतत तत्पर आहे, सावध आहे, नम्र आहे त्याच्याकडं जावं. गुरू म्हणजे रिकामी खुंटी नव्हे जिच्यावर आपले प्रश्न अडकवून आपण मोकळं व्हावं. उलट गुरू ते की जे तुम्हाला त्यांना शोधताना सापडलेल्या गोष्टीही खुंटीवरून उतरवून सोडवायला देतात. तुम्हाला सोबत, मदत करतात पण तुम्हाला खोटी सुरक्षितता देणं नाकारतात. तुम्हाला स्वतःला कृतीला, विचाराला, सावधतेला तत्पर करतात. असे गुरू माझं अनुकरण करू नका म्हणतात. तुम्ही तुमच्या मार्गाचा शोध घ्या. त्यात मी मदत करतो, असं म्हणतात.

गुरूंच्या बाबतीत अनुकरण धोकादायक आहे, करू नये. तसंच गुरूंच्या एखाद्या शब्दाला चिकटून बसणंही. कारण शब्द म्हणजे वस्तुस्थिती नव्हे. वस्तुस्थिती, प्रत्यक्ष जीवन ही प्रवाही गोष्ट आहे. काही दिशा, मदत म्हणून, स्पष्टता यावी म्हणून अशा खऱ्या गुरूंनी काही शब्द तेव्हा तेव्हा वापरले असतीलही. पण शेवटी त्या शब्दांच्या सांगाड्यापेक्षा त्यांना जे म्हणायचं असेल तेच महत्त्वाचं असतं. त्यांना काय म्हणायचं आहे, त्याची मदत माझ्या आजच्या शोधाला होत असेल तर ती घ्यावी. कारण ते शब्द कालचे, वस्तुस्थिती, परिस्थिती कालची, शंभर वर्षांपूर्वीची असते ती आता मृत असते. कदाचित भान, दिशा, सत्याचं प्रतिबिंब - उपयोगी पडेल ते घ्यावं, असा त्यांचा अभिप्राय आहे. कारण अशा तऱ्हेनं अनेक गुरूंचे शिष्य शब्दांच्या सांगाड्यात अडकून आजच्या नव्या, वेगळ्या, सुंदर वर्तमानाचा आनंद गमावतात. क्षणभर हा विचार करून पाहावा की, तेच कुणी खरे सोबती, गुरू आज जिवंत असते तर काय म्हणाले असते, मग खरी मदत होऊन सत्याची वाटचाल सुरू होते, असं लक्षात येईल.

जी गोष्ट अनुकरण, शब्द यांच्या नुकसानीची आहे तीच गुरूंकडं जाऊन होणाऱ्या आपल्या स्वातंत्र्याच्या नुकसानीची आहे. येणाऱ्या व्यक्तीचं स्वातंत्र्य अबाधित ठेवूनही त्याला मदत करता येते. पण त्याला ती मदत करणारी व्यक्ती खरी मुक्त लागते. ती तुम्हाला मुक्त करीत नाही. पण तुम्हाला विचारांचं, शोधाचं, सांगितलेलं न पटलं तर न ऐकण्याचं स्वातंत्र्य देते. पण अपरिपक्व गुरूंना शिष्य स्वाधीन व्हायला हवे असतात. जे खरे गुरू आहेत ते शोध घ्यायला जरूर मदत करतील. उलट येणाऱ्या व्यक्तीला बांधणाऱ्या, साचेबद्ध करणाऱ्या अनेक गोष्टी दाखवून देऊन स्वतंत्र व्हायला मदत करतील. प्रथम यात असुरक्षितता वाटेल पण अंती स्वतःचा शोध लागून व्यक्ती स्वयंपूर्ण आणि आनंदी बनेल, मुक्त होईल. म्हणून खऱ्या गुरूंकडं जाऊन व्यक्तीचं मानसिक स्वातंत्र्य उलट अधिकच वाढतं. कृष्णजींनी सुचवलेल्या गुरुविषयक उपयुक्त विचारणीय चिंतनाचं हे सार कुठल्याही साधकाला आपल्या या बाबतीतल्या कल्पना स्पष्ट करायला, फसगत टाळायला, खरा गुरुमार्ग चालायला आणि खऱ्या प्रगतीला उपयोगी ठरेल !

*

२६. नव्या युगाचा देव

आणि आता देव ! अनेकांना माहीत असतं ते कृष्णजींनी देव मानला नाही. धर्म-जाती-संघटना-व्यवस्था सर्वांना विरोध केला. त्यांनी गीता, उपनिषदं, कुराण, बायबल काही कधी वाचलं नाही. पण हे जरी खरं असलं तरी हेही खरं आहे की, कृष्णजींनी माणूस-त्याचं विलक्षण मन-आणि मेंदू यांचं जिवंत पुस्तक नुसतं वाचलंच नव्हे तर अभ्यासलं होतं. ते त्यांनी वाचून ठेवून टाकलं नाही तर अगणित लोकांच्या बरोबर ते, तेच पुस्तक तो महाग्रंथ अनेकदा अनेक अंगांनी अभ्यासला. त्यात कालाधीन काय नि कालातीत काय याचा शोध घेतला, तो आमरण.

मुळात जसं 'गुरूं'बद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केले, त्यांतून आपल्याला उलट खऱ्या गुरूंचं, गुरुत्वाचं, कार्याचं, निर्दोष मदतीचंच दर्शन झालं. तीच अवस्था 'देवा'बद्दलची आहे. कारण जगभर वेगवेगळ्या प्रकारे मानला गेलेला, औत्सुक्याचा असलेला, अनेकांचं जीवनध्येय असलेला हा 'देव' त्यांना प्रश्नोत्तरांतून अनेक ठिकाणी भेटलेला आहे. अगदी लहान मुलांच्या निरागस प्रश्नांपासून ते मोठमोठ्यांच्या पक्क्या झालेल्या भूमिकांपर्यंत सर्वत्र.

त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की, नेहमीप्रमाणं आधी प्रचलित कल्पनांत कोणते दोष आणि का शिरले आहेत ते लक्षात घ्यावं. त्यातही सुरुवातीलाच हे लक्षात घेतलेलं बरं की, कृष्णजी, तत्त्वज्ञानात जसा देव या विषयाचा अभ्यास केला जातो त्या अर्थानं कधी करीत नाहीत. म्हणजे देव आहे हे सिद्ध करणारे मुद्दे, युक्तिवाद कोणते आणि देव नाही हे सिद्ध करणारे युक्तिवाद कोणते मग त्यावर टिप्पणी वगैरे वगैरे. त्यांचा 'देवाचा विचार' हा पूर्ण जीवनवादी आहे.

त्यांचं म्हणणं असं की, आज देव तुमच्या जीवनात कसा काय वावरतो आहे ? तर त्याला जिवंतपण कुठं नाही. आहेत त्या मूर्ती, वेगवेगळे उपचार, आग्रह, अवडंबरं प्रत्येकाच्या प्रथा, त्यातले पराकोटीचे वाद, प्रत्येक ठिकाणचे स्वार्थ आणि इस्टेटी, पैसा, संपत्ती आणि अंतस्थ हेतू अशा अनेक प्रकारे 'देवस्थान'ची अवस्था

काय आढळते ते आपणच शोधावं. थोडे दोष असायचे, म्हणत म्हणत व्यवस्था नि स्थानं हळूहळू देवावरच अतिक्रमण करीत आहेत. याला मूर्तिपूजा मानणारेही अपवाद नाहीत अन् न मानणारेही नाहीत. ती ती ठिकाणं एखाद्या व्यावहारिक सत्तांसारखी पैशाची, धर्मसत्तेची - केंद्रं झाली आहेत.

असं कुणी म्हटलं की काही चांगली वाटणारी कामं पुढं केली जातात. कुणी भिकाऱ्यांना अन्न वाटलेलं दाखवतात, कुणी दवाखाने चालवलेले दाखवतात, कुणी गावं दत्तक घेतलेली, कुणी मोफत शिक्षणं, कुणी विद्यार्थ्यांना कपडेवाटप, शैक्षणिक साहित्य वाटप, कुणी श्रमदानं - अशा गोष्टी पुढं करून आपण देवकार्यच नव्हे तर समाजकार्यसुद्धा करतो आहोत असं दाखवतात. ही कार्यं चांगली असतील पण एखाद्या लोभी व्यापाऱ्यानं, व्यावसायिकानं गिऱ्हाईकांना लाखो रुपयांना लुबाडावं आणि मग वर्षातून एकदा यात्रेत पाच-दहा हजारांचा दानधर्म करावा आणि त्याच्या पावत्या नि फोटो दाखवावे तसं असतं. अगदी क्वचित अपवाद सोडले तरी याला कुठल्या धर्माचा, देव सांभाळणाऱ्यांचा अपवाद नाही, हे लक्षात येतं.

याच्याशीही आपल्याला फारसं कर्तव्य नाही. मुळात व्यक्ती म्हणून आपणच देवाकडं का जातो, पूजा का करतो, कशी करतो, कुठले आचार करतो, का करतो हे सारं समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. कितीतरी माणसं देवाकडं सुरक्षिततेसाठी जातात. त्यांना भविष्याची, संकटांची भीती वाटते. मग त्यावर उपाय म्हणून ते देवाला जातात. पूजा करतात तीही भीतीपोटी. कारण तसं नसतं तर खरोखर पूजेत भाव आला असता. खऱ्या कारणानं जमली नसती तर भीतीनं पुढं मनाची उलाघाल झाली नसती. एखादं देवाचं काय ते कुलाचार किंवा काही करायचं राहिलं किंवा पटत नाही म्हणून सोडावं वाटलं तर बरोबर असेल तर सहजतेनं, धैर्यानं सोडलं गेलं असतं. पण ते 'करणं पटत नाही, सोडणं परवडत नाही' यावरून आपली देवाची भेट भीतीनं होते हे लक्षात येतं.

कृष्णजींचं म्हणणं नेमकं इथंच वेगळं आहे. सुरक्षितता, भीती यांसाठी देवाकडं जाणं - डोक्यावर ओझं घेऊन जगणं आहे. हीच भेट खरोखर प्रेमानं घडली तरी किती वेगळी राहील, किती आनंदाची ठरेल ? हीच गोष्ट ग्रंथ-व्यक्ती-पद्धतींच्या अधिकारशाहीची असते. त्यांना प्रश्न केले तर चालत नाहीत. वास्तविक चालावेत. काही गोष्टी चुकीच्या असतील, कालबाह्य असतील, काहींची गरज

उरली नसेल तर ती त्या जिज्ञासेतून समोर येईल - आणि याचंही खरेपण आपल्याला कळतं. पूर्वी विरळ लोकवस्ती, संपर्काची साधनं नाहीत. लोकांना वेळ भरपूर. लग्नाच्या वऱ्हाडाला प्रवास करून आल्यावर सीमेवर घ्यायला जाण्यापासून जवळजवळ आठवडाभर चालणारा विवाहविधी आजच्या धकाधकीत मुंबईसारख्या शहरात करू गेलं तर काय होईल ? आता फक्त गरजेच्या गोष्टी फक्त पाच-सहा तासांत होतात आणि व्यवहार चांगला चालतोच नाही का ? म्हणून कृष्णजींची शोधनाची कल्पना मूलभूत आहे. अत्यंत लवचीक आहे. व्यवहार्य आहे.

आता अगदी थोडक्यात लक्षात घेऊ की, त्यांचा या मंदिरातल्या देवाला विरोधच आहे का, तर नाही. फक्त ती मूळ देवाची सावली आहे त्यावरून मूळ देव शोधण्यासाठी ती आहे. नाही तरी सगुणनिर्गुणाचं नातं असंच आहे. फक्त कृष्णजी अत्यंत वैज्ञानिक, तार्किक पद्धतीनं त्यातून काळ वजा करतात. भूतकाळ तर मृत आहे. भविष्य अज्ञात आहे. हाती राहातो तो वर्तमान. त्यात आपण कुणीही असलो तरी त्या वर्तमानातच जगत असतो. त्याबद्दल कुणालाही शंका नाही, कुणाच्या विश्वास-अंधविश्वासाचा प्रश्न नाही, त्या अर्थानं पाहिलं तर वर्तमान कुणात उच्चनीच-श्रेष्ठ-कनिष्ठ भेद करीत नाही, अन्याय-शोषण करीत नाही. कुठली आशा दाखवत नाही. कुणाचा फायदा घेत नाही. तो तसा वर्तमान म्हणून स्वरूप बदलत नाही. त्यात भ्रमाला स्थान नाही. त्यांत संचय-गैरवापर पळवाटा नाहीत. त्यात फक्त पूर्ण नांदतं. क्षणात जात असल्यानं दुर्भावनांचं पोषण नाही. सर्व प्राणिमात्राला तो सारखाच आहे. श्वास किंवा चैतन्यासारखा हा वर्तमान-फक्त जो खऱ्या अर्थानं 'आहे' असं म्हणता येतं, असा हा सकारात्मक, पवित्र वर्तमान हाच नव्या युगाचा देव आहे ! त्याच्यासारखं भेदभावरहित, निर्वासन, निर्मत्सर, तत्पर, जिवंत होऊन जगणं, खरं प्रेमानं जगणं-जे अन्याय करू शकत नाही, शोषण, संचय, दुटप्पीपणा, कुणाचा वापर करूच शकत नाही, हे प्रेममय वर्तमान सावधपणे जगणं हाच देव आणि तशा कृती करणं हीच त्याची खरी पूजा !

*

२७. आपण काय करू या ?

आपल्याला गाडी चालवताना चुकल्याची शंका आली तर आपण गाडी साईडला, रस्त्याकडेला थांबवतो. उतरतो. मैलाचे दगड, लागणाऱ्या खुणा पाहातो. अशा वेळी शांत रहाणं ही पहिली कृती, कारण त्याशिवाय तटस्थ निरीक्षण ही महत्त्वाची गोष्ट करताच येत नाही. गोंधळलेला माणूस लगेच आणखी कृती करायला जाईल तर गोंधळ वाढतो. दोऱ्याच्या गुंड्याचा गुंता झाला, कुठं तरी गाठ बसली तर अधीरपणे इकडून तिकडून टोकं ओढण्यापेक्षा प्रथम दोन मिनिटं काय झालंय, कुठं चुकलंय, ते बघायला घेणारा मनुष्य प्रथम काहीच करताना दिसत नसला तरी तोच पुढं सारा गुंता सोडवू शकतो.

तसं कृष्णजींशी संवाद साधताना होतं. आपलं बऱ्याच बाबतीत-व्यवहारात, साधनेत - बरंच काही चुकलं आहे, गोंधळ झाला आहे लक्षात येतं. पण अशा वेळी कृष्णजी म्हणत तसं अनेकदा प्रथम कृती थांबवणं, शांतपणे आपले अनुभव त्यांच्या प्रकाशात ताडून पाहाणं हीच आवश्यक कृती असते. मग पटलं तर योग्य कृती करणं हे मूळ रस्त्यावर येण्यासाठी गरजेचं असतं. आपलंच बरोबर आहे असं वाटलं तरी कृष्णजी तसं वागायचं स्वातंत्र्य देतातच, हे तर त्यांचं वैशिष्ट्य आहे. त्यांचं म्हणणं ऐकावं, अगदी सत्य असलं तरी, अशी त्यांची अधिकारात्मक अपेक्षा मुळीच नाही.

इथंही कदाचित आपलं असं होऊ शकतं. कारण लहानपणापासूनचंच काय, हजारो वर्षांचे धर्म, विचारप्रणाली, जीवनपद्धती तपासल्या जातात. त्यांतलं फोलपण लक्षात येतं. त्यावेळी खऱ्या प्रामाणिक साधकात मोठी खळबळ माजते. इतकंच काय अस्वस्थता येऊन त्यांचं वाचणं नकोसं वाटतं. आपण जपून ठेवलेल्या चिंध्या किंवा खोट्या नोटा का असेनात त्या हिरावल्या जातील असं वाटतं. पण निदान अडून बसलेल्या पाटातला बराचसा कचरा नि बोळे निघून पाटाचं पाणी प्रवाही होतं एवढं खरं. आपल्या दुःखांची, निराशांची, खरी कारणं समोर येतात. अनेक प्रकारचे चुकीचे प्रवास, अनेक ठिकाणचे दंभ, फोलपणं कळतात, फसवणुकी टळतात.

सावध प्रवास सुरू होतो.

आधी म्हटलं तसं जीवनाचे लौकिक-पारलौकिक, व्यावहारिक-धार्मिक, प्रापंचिक-पारमार्थिक असे भाग पाडणं चुकीचं आहे हे लक्षात येतं. पण अंमलात यायला अवघड जातं. कारण परमार्थाचा, अध्यात्माचासुद्धा प्रपंच करायची आपल्याला एकवेळ सवय असते किंवा एखादा तास शांत, समजूतदार, त्यागी, प्रेममय असं आध्यात्मिक राहाणं आपल्याला सवयीचं असतं मग पुन्हा एरवी आपण कितीही ॲरोगन्ट-असमंजस, अशांत, अन्यायी, लोभी रहायला उलट मोकळे होतो, तसं इथं होता येत नाही. कारण जीवन एकसंध आहे. एक तर आपण आध्यात्मिक असू किंवा नसू, एवढाच पर्याय उरतो. देवाची नेमानं पूजा करायची आणि मुलांना बदडायचं हे कृष्णजींकडं गेलं की जमत नाही, जमू नयेच. एक वेळ पूजा नाही झाली तरी चालेल उगाच खोटं आध्यात्मिक होण्याला काही अर्थ नसतो. ते माणसाच्या जीवनात कोणतंच परिवर्तन घडवून आणू शकत नाही.

तीच गोष्ट कृष्णजींच्या खऱ्या निरुपाधिक देवकल्पनेची आहे. वर्तमान म्हणजे आज जो आहे तो खरा देव - हे म्हटलं आणि ते पवित्र आहे म्हटलं तर मग ही युद्ध, अन्याय, अत्याचार हेही वर्तमानच - तो खरा देव का ? अशा बौद्धिक शंका, वेळी अडवाअडवी केली तरी कृष्णजी सहज लक्षात आणून देतात की, तुम्ही जर वर्तमान - व्हॉट इज - हे पवित्र, देव मानलं, खऱ्या अर्थानं तर उलट तुम्हाला या गोष्टी करताच येत नाहीत. कारण जसा काळा मनुष्य वर्तमान म्हणून पवित्र तसा गोराही वर्तमान म्हणून पवित्र. एकमेकांना नावं ठेवता येत नाहीत, काळ्यागोऱ्यांचा, वर्ण नि द्वेषाचा, संघर्षांचा प्रश्नच उरत नाही. उद्‌भवला तर आपण सारा वर्तमान खरा देव पवित्र समजत नाही. पती पवित्र आहे पण पत्नीही वर्तमान त्यामुळं तीही पवित्र, असं हे गणित म्हटलं तर अवघड वाटलं तरी ते सुटत जातं. उलट किती तरी अवडंबरं नि उपचार यांपासून मुक्त करणारा हा देव आहे. त्याला अपेक्षित आहेत त्या आपल्या पवित्रतेला अनुकूल, फक्त प्रेममय कृतीच ! इतकी वैज्ञानिक, सध्याच्या काळाच्या पुढं जाऊन पुढंही पुरणारी खऱ्या देवाचा शोध ही कृष्णजींनी मानवतेला दिलेली अपूर्व देणगी आहे.

आज आपण जे कुणी हे वाचण्याच्या निमित्तानं, कृष्णजींचं म्हणणं समजून घेण्याच्या निमित्तानं एकत्र संवाद करतो आहोत किंवा आपापल्या ठिकाणी पृथ्वीच्या

पाठीवर कुठंही खऱ्या अर्थानं एकत्र आलो आहोत त्याचं खरं कारण कृष्णजी म्हणत, गरज, व्यवस्था, समाज, कल्पना, धर्म, भीती असं खरं कुठलंच नाही. त्यांनी आपला संबंध येतही असतो. पण आपल्याला चांगल्या अर्थानं एकत्र ठेवणारं खरं काही असेल तर ते शुद्ध प्रेम आहे. तेच प्रत्येकाच्या अंतरंगात एखाद्या शुद्ध निर्मळ झऱ्यासारखं प्रवाही आहे. त्याच्यावरचा हा चुकीच्या संस्कार, कल्पना, इच्छा, बेसावध कृतींचे परिणाम यांचा पाचोळा स्वेच्छेनं, मनःपूर्वक दूर केला तर खऱ्या, निरपेक्ष, शुद्ध, प्रेममय जाणिवेचा हा झरा अविरत प्रवाहित आहे, तो एकमेकांना एकत्र ठेवतो आहे हे लक्षात येतं. त्यावर आधारलेली, अशा अंतरंगातून आलेली प्रत्येक कृती जपून, सावध, मनःपूर्वक, कुणाला न दुखावणारी, कल्याणकारी असते हे कृष्णजींना अभिप्रेत तथ्य वेगळं सांगायला नकोच.

जगाच्या पाठीवरल्या कुठल्याही प्रदेशात राहणाऱ्या पण तळमळीच्या जिज्ञासूंना खऱ्या, निरुपाधिक देवमार्गाची, योग्य, शुद्ध, नीतिमान कृतींची प्रेरणा देणारा आणि त्यांच्या चित्तावरची कितीतरी अनावश्यक ओझी फेकून द्यायला समर्थ करणारा हा कृष्णजींच्या संवादधनाचा ठेवा आहे. त्याचा आपण आपल्याला कळणाऱ्या साधनेच्या, सामान्य व्यावहारिक जीवनाच्या भाषेत अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. आपल्या नेहमीच्या जीवनाला तसंच साधनेला सावधानतेचं व विलक्षण परिपक्वतेचं परिमाण हा अभ्यास देतो. हा प्रत्यक्ष अनुभव येतो.

या भाषेत ईश्वर हा बाहेरही कदाचित दूरचा पल्ला असेल. कदाचित अंतर्यामी, कदाचित पूर्ण वर्तमानात राहाण्याच्या भाषेतही दूरचा पल्ला असेल. पण कृष्णजी म्हणत, कितीही दूरवरच्या प्रवासाची सुरुवात अत्यंत जवळ असते. इथंही तसंच आहे. या शोधाची सुरुवातही आपल्या स्वतःच्या ठिकाणी-विचार-मतं-कल्पना-संस्कार-आचार अशा आपल्या आत्मपरीक्षणातच या शोधाची अत्यंत जवळची सुरुवात आहे. मग जग त्याप्रमाणं बदलेलच. म्हणून तेवढी जवळची सुरुवात करण्याचा निर्धार हा शोध घेताना अखेरीस आपण करूया !

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

जिज्ञासू साधकांसाठी
जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा
सोपा अभ्यास ...